यासाठी विष्णुने आपली बहीण हिचे लग्न राजा शंकराशी करण्याचा विचार केला आणि लग्नाचा प्रस्ताव पाठविला. राजा शंकराचा सेनापती "महिशासूर" होता, तो आर्यांची चाल समजून गेला होता, त्याने नाकार दिला. महिशासूर अडचण बनला होता, तर आर्य पुत्री पार्वतीने महिशासुराला मारण्यासाठी त्याला आपल्या प्रेमजाळ्यात फसविले आणि खून करण्यासाठी आठ दिवसांत प्रयत्न शोधत होती. नवव्या दिवसी जसा मोका मिळाला, धोक्याने त्रिशूलद्वारे हत्या केली, आणि शंकराजवळ दासिचे काम करून सेवा करू लागली. हळूहळू पार्वतीने आपल्या सुंदरतेने शंकराला पण आपल्या वशमध्ये केले आणि योजनाबद्ध पद्धतीने राजा शंकराला नशेची लत लावून दिली. याप्रकारे नशेचि सवय होऊन राजा शंकराला राज पाठाचा मोह भंग झाला. नंतर आर्यांनी त्यांचे पण राज्य चालवले आणि नशेने आपले शरीर गरम झाले असे म्हणून, हिमालय पर्वतात राहण्याची सल्ला दिली, ज्याला आज कैलास पर्वत म्हणतात.

याप्रकारे दोन राज्यांवर आर्यांचा अधिकार झाला. नंतर रावणाचे राज्य हडपण्यासाठी युद्ध छेडून दिले. विभीषणाच्या दोगळेपणाच्या कारणाने छलाने रावणाला पण मोठ्या प्रयत्ना नंतर शेवटी मारून टाकल्या गेले.

याप्रकारे तिन्ही राज्यांमध्ये आर्यांनी आपला ताबा मिळवीला. आर्यांनी स्वतःला देव आणि भारतातील मूळनिवासि (द्रविड) लोकांना असूर, राक्षस, दानव म्हटले.

या प्रकारे 1500 वर्षांपर्यंत चाललेल्या युध्दा नंतर द्रविड पूर्णपणे हारून गेले. हेच युद्ध इतिहासामध्ये "देवासुर संग्राम" या नावाने प्रसिद्ध आहे.

देवासुर संग्रामाच्या नंतरच जाती व वर्ण व्यवस्था बनविल्या गेली. आर्यांनी अर्थवांना ब्राम्हण, रथाईस्टांना क्षत्रिय, आणि वस्थारीय जातिला वैश्य (बनिया) घोषित केले आणि भारतातील मूळनिवासी (द्रविड) यांना शूद्र घोषित केले. शूद्रांमध्ये दोन वर्ग बनविले; जेवढे लोक लढले त्यांना "अच्छूत शूद्र" म्हटले आणि बाकीच्यांना *सछुत शूद्र" घोषित केले. तसेच समाजिक एकता तोडण्यासाठी त्यांनी केवळ शूद्रांचीच जाती बनविली.

आज ह्या जाती लागोपाठ 6743 या संख्येत आहेत. यांची यादी गुगलनेटवर पाहू शकता. ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य यांची काही जाती नस्तात. त्यांचा केवळ वर्णच असतो. जसे शर्मा, दुबे, चौबे, श्रीवास्तव, द्विवेदी यांचे आडनाव आहे जाती नाही. विश्वास नसेल तर चतुराईने विचारून बघा.

या देवासुर संग्राममध्ये ज्या लोकांनी लढून जंगलात शरण घेतली आणि युद्ध चालू ठेवले. ते वन शरणागत शूद्र - आदिवासी (संवैधानिक ST वर्ग) म्हटले, आणि जे लढून हारून त्याच समाजाच्या बाहेर राहू लागले, ते अच्छूत शूद्र (संवैधानिक SC वर्ग) म्हटले, आणि बाकी वर्ग शूद्र सछुत शूद्र (संवैधानिक OBC) म्हटल्या गेले.

ज्यांनी जसा संग्राम केला त्यांना तसेच घृणीत कार्य दिल्या गेले.

रामायण, महाभारत, चार वेद, उपनिषद, पुराण त्याच काळात लिहिल्या गेलेले ग्रंथ आहे. यापेकरे जाति ह्या द्रविडांची सामाजिक एकता तोडण्यासाठी बनविल्या गेल्या आहेत आणि देवी-देवता धार्मिक गुलाम बनविण्यासाठी बनविले गेले आहेत.

आपण देवी देवताच्या रूपात सर्व आर्यांची पूजा करीत आहोत. हे सर्व देवी-देवता खोटे आहेत. हे जर खरे असते, तर सर्व विश्वात देवी देवता मानले असते. भारतातच का? याप्रकारे शिक्षणाचा अधिकार ब्राम्हणांनी घेतला. क्षेत्रियांनी राज्य करायचा, वैशांनी धनाचा अधिकार घेतला आणि शूद्र (द्रविड) मूळनिवासियांना तिन्ही वर्णांची केवळ सेवा करण्याचे काम दिल्या गेले. ज्याला आपण कुठे ना कुठे वाचले असेल.

यानंतर महाविर स्वामींनी जाति व वर्ण व्यवस्थेचा विरोध केला होता. 583 इ. स. पूर्वात पण जास्त सफळ नाही झाले. नंतर गौतम बुद्धांनी 534 इ. स. पूर्व बौद्ध धम्माला मानव जातीच्या निसर्ग प्रकृतीप्रदत्त धम्म शोधला; जो शास्वत

धम्म आहे. ज्याने संपूर्ण विश्वातील मानव जातीचे कल्याण शोधून काढले. जाति व वर्ण व्यवस्थेला पूर्णपणे समाप्त करून टाकले होते. गौतम बुद्धांनंतर मौर्य वंशामध्ये चंद्रगुप्त मौर्य, अशोकाने बौद्ध धम्माला नवीन उंची दिली. अशोकाच्या मुला-मुलीने अनेक देशांत बौद्ध धम्माचा प्रचार-प्रसार केला. जे आजच्या वेळी 100 हून अधिक देशांनी बौद्ध धम्माला स्वीकारले होते. काही थोड्या रूपात तर काही पूर्ण रूपात. मौर्य वंशाचे शेवटचे बौद्ध राजा बृहदस्थ याने चुकी केली! त्याने सेनापतीच्या रूपात ब्राम्हण पुष्यमित्र शुंग याला घोषित केले. शुंगणे सर्व ब्राम्हणाला सेनेमध्ये भर्ती केले आणि सेनेच्या समोर शेवटचे बौद्ध राजा बृहदस्थ यांची हत्या केली तसेच 84000 स्तूप तोडल्या गेले.

पुष्यमित्र शुंगचा शासनकाळ 32 वर्षे (184 इ. स. पूर्व - 148 इ. स. पूर्व) आहे. लाखो बुद्धांना कापून टाकले गेले. एक बौद्ध शिर कापून आणण्याचे पारितोषिक 100 नग सोन्याचे सिक्के ठेवल्या गेले. भारताची भूमी रक्ताने रक्तरंजित झाली होती. बऱ्याच व्यक्तींनी दुसऱ्या देशात जाऊन आपले जीवन वाचविले. सर्व बौद्ध ग्रंथ घराघरातून शोधून जाळून टाकल्या गेले. ज्या देशात बौद्ध धम्माने जन्म घेतला त्याच देशातून समाप्त झाला. आज भारतात जे पण बौद्ध ग्रंथ, त्रिपिटक आणले गेले, ते सर्व अन्य (बाहेरच्या) देशातून आणले गेले आहे.

नंतर पुष्यमित्र शुंगाने मनुस्मृती लिहिली. ज्यामध्ये शूद्रांचे सर्व मानवीय अधिकार हिसकावून घेतल्या गेले. रामायण, महाभारताला नंतर नव्या रूपाने तिखट-मिठ लावून लिहिल्या गेले. तेव्हापासून 2000 वर्षा पर्यंत शूद्र (SC/ST/OBC) शिक्षण आणि धनाचा अधिकार मिळाला नव्हता.

या मधेच बहुजन नायक छत्रपती शिवाजी महाराज यांनी तसेच छत्रपती शाहू महाराज यांनी काही वर्षे महाराष्ट्रा मध्ये राज्य केले; परंतु पेशवे ब्राम्हणांनी छलंकपट करून अंत केला आणि नंतर पेशवाई आली. अनेक संतांनी संत कबीर, गुरुनानक, रविदास, गुरुघासिदास, संत तुकाराम अनेक महापुरुष झाले, ज्यांनी भक्ती मार्गाने लोकांना सत्याचा अहसास करून दिला. परंतु नैतिक शक्ती - शिक्षण; राजनैतिक शक्ती - मतदान देण्याचा अधिकार; सैनिक आणि शरीरिक शक्ती - कुपोषणाच्या कारणाने द्रविड क्षिण होऊन गेला होता.

ब्राम्हण पेशवाई मध्ये अच्छुतांची स्थिती अगदी दैनीय होऊन गेली होती. या वेळी अच्छुतांना गळ्यात मडके आणि कमरेला झाडू बांधून चालावे लागत असे. ते 12 वर्षांपर्यंत चालले होते. 1 जानेवारी 1818 मध्ये 500 महार सैनिकांनी एकूण 28000 पेशवाईला युद्ध करून समाप्त केले. ज्यामध्ये 22 महार सैनिक शहीद झाले होते.

मोगल राजांनी पण ब्राम्हणांशी सांठ-गांठ करून भारताला गुलाम बनविले आणि ब्राम्हणांच्या मर्जीने शूद्रांना शिक्षण नाही दिले. परंतु जहांगीरच्या शासन काळात थॉमस मुंरो आले होते. येथील विचित्र स्थिती पाहून ते दंग झाले होते, त्याच्या नंतर डच, पोर्तुगाली, फ्रांसीसी, इंग्रज आले आणि कंपनी स्थापन करून भारताला गुलाम बनविले.

थॉमस मुंरो यांनी सर्वांना शिक्षण देणे सुरु केले. ज्यामध्ये पाहिले व्यक्ती महात्मा ज्योतिरावं फुले यांनी शिक्षण घेतले. जे माळी समाजातील अन्य मागासवर्गीय वर्गातील आहेत. शिक्षण घेतल्यानंतर त्यांनी आपली पत्नी

सावित्रीबाई फुले यांना शिकविले. याप्रकारे सावित्रीबाई फुले संवर्ण-महिला, शूद्र-महिला, अतिशूद्र-महिला यांमध्ये शिक्षण घेणाऱ्या पहिल्या महिला बनल्या. हे आर्य आपल्या पत्नीला पण शिक्षण देत नव्हते, कारण त्यांच्या पत्न्या पण द्रविड महिलाच होत्या. यासाठी म्हटल्या गेले की, ढोल, अडाणी, शूद्र, पशु, नारी; हे सर्व शिक्षेचे अधिकारी. शूद्रांना शिक्षण 19साव्या शेतकामध्ये 1840 च्या आसपासून मिळणे सुरु झाले. सर्व शूद्रांनी (द्रविड) इंग्रजांच्या शासन काळातच केली.

रामास्वामी पेरियार, डॉ. आंबेडकरांच्या जिवनकाळात किती छुवाछुत होती, कुणापासूनच लपले नाही. डॉ. आंबेडकर अच्छूत समाजातील पाहिले व्यक्ती आहे, ज्यांनी पहिल्या वेळी मॅट्रिक पास केले, पदवीधर झाले, M.A. केले. देशा विदेशातील अनेक पदव्या प्राप्त केल्या.

डॉ. आंबेडकरांसारखा संघर्ष आज पर्यंत कुणी नाही केला. अच्छूत म्हटल्या जाणाऱ्या अस्पृश्य समाजाला तलावातील पाणी पिण्याचा, मंदिरात प्रवेशाचा अधिकार नव्हता. चौदार तलावातील पाणी पिण्याचा समूहिक प्रयत्न डॉ. आंबेडकरांनी पहिली वेळ केले. ज्यामध्ये अस्पृश्यानं सोबत खूप मारपीट केली गेली. जवळजवळ 20 अस्पृश्य यामध्ये जखमीं झाले होते. नंतर काळाराम मंदिर प्रवेश केला. बाबासाहेबांनी काही सभापण घेतल्या, काही समित्यांची निर्मिती पण केली.

25 डिसेंबर 1927 ला मनुस्मृतिचे दहन केल्या गेले होते. हाच तो ग्रंथ आहे, ज्यामध्ये शूद्रांना नर्कासारखे जीवन जगायला तानाशाही आदेश जरी केले होते.

देश स्वतंत्र होणार होता, त्यावेळी बाबासाहेबांपेक्षा कोणी मोठा विद्वान नव्हता. यासाठी संविधान लिहिण्याचे काम बाबासाहेबांना मिळाले. आज अस्पृश्यांना, शूद्रांना, महिलांना, जे पण अधिकार मिळाले आहेत, तो कोणत्याही वर्गाचा असो सर्व बाबासाहेबांच्या कठीण प्रयत्नाने शक्य झाले आहे. याला SC/ST/OBC मायनॉरिटी मानो अगर न मानो; हे त्यांच्यावर अवलंबून आहे.

अनुसूचित जाति कल्याण आयोग, अनुसूचित जनजाति कल्याण आयोग, अन्य मागासवर्गीय कल्याण आयोग, धार्मिक अल्पसंख्यांक कल्याण आयोग (SC/ST/OBC/Minority) यांच्यासाठी बनविल्या गेले आहे. आपल्याला संविधानामध्ये संवर्ण कल्याण आयोग कुठे नाही मिळणार. का? जरा विचार करा का की संवर्ण आधीच सर्व दृष्टीने समर्थ आहेत. हे संविधान भारतातील मूळनिवासी (द्रविड) यांचे हित व संपूर्ण विकासासाठी बनविल्या गेले आहे. सर्व महत्वाचे अधिकार संविधानात दिल्या गेले आहेत. परंतु माहित नाही की मूळनिवासी (द्रविड) यांनी आज पर्यंत संविधान उघडून बघितले नाही आणी संवर्णांबरोवर संविधानाला विना वाचून चुकीची आणि बदला घेण्याच्या गोष्टी करतात. तेथेच अन्य देशातील राष्ट्रपती, PM, अधिकाराचे जानकार याला जगातील सर्वात महान संविधान म्हणतात.

बाबासाहेबांनी संविधान लिहून मूळनिवासी (द्रविड) यांना अर्धी आजादी दिली आहे, आणि अर्धी आजादी ज्या शिवशी आमचे द्रविड बंधू एकत्र येणार त्या दिवशी संपूर्ण आजादी मिळणार. आज व्यापारामध्ये 95%, शिक्षणात 75%, नौकऱ्यांमध्ये 75%, जमिनीमध्ये 90% या आर्यांचाच हक्क आहे. बंधुंनो जरा ध्यान द्या, SC.

/ST/OBC/Minority या लोकांना किती % व्यापारामध्ये हात-पाय जमविले आहे? 85% मूळनिवासी (द्रविड) केवळ ग्राहक बनले आहेत, दुकानदार तर मुख्य रूपाने संवर्णच आहेत. मोठे-मोठे उधोग, कंपनी, मोठी-मोठी दुकाने सर्व प्रकारची दुकाने कोण चालवीत आहेत? ध्यान द्याल तर सर्व समजून घ्याल. पण दुःखाची गोष्ट आहे की, आपले भाऊ दूरचा विचार करित नाहीत. आज शीख, बौद्ध, इसाई, मुस्लिम पण द्रविड आहेत.

मुगल काळात आपल्याच द्रविड बंधुंनी ब्राम्हणांच्या हिंदू धर्माला निच म्हणून मुस्लिम धर्म स्वीकारला. इंग्रजांच्या शासनकाळात आपल्या द्रविड बंधुंनीच इसाई धर्म स्वीकारला आणि शिखांनी आपला वेगळा धर्म बनविला.

या कारणाने सवर्ण लोक कधी शिख दंगा, कधी इसाई दंगा, कधी मुस्लिम दंगा, कधी बौद्धांवर हमले करित राहतात. ही सर्व यांची विचारपूर्वक केलेली साजिश असते.

आजादीच्या 67 वर्षानंतर आज 2014 मध्ये जशी बीजेपीची सत्ता बहुमताने आली, लक्षपूर्वक पाहा काय होत आहे? धर्म-धर्म बोलत आहेत. भारताला हिंदुस्तान करण्याचे कारस्थान चालले आहे. सिख हिंदू होते, घरी परत या. अस्या गोष्टी करीत आहेत. यांचे मंत्री बोलत आहेत- साध्वी, नाथुराम गोडसे देशभक्त आहेत. जे आपल्या गांधीला तीन गोळ्या झाडतो. 4-5 मुलांना जन्म द्या- एक यांना द्या, एक सिमेवर द्या, उरले ते आपण ठेवा. किती सम्मान करतात? महिलांचा विचार करा!

आता तर सर्वांना हिंदू बनविण्याची धमकी दिली जात आहे, तर अल्पसंख्यांक कुठे जाणार?

या कारणाने तर बाबासाहेबांनी अल्पसंख्यांकांना काही विशेष अधिकार दिले होते. कारण की बहुसंख्यांक यांच्यावर दबाव टाकू नाही शकणार. गितेला राष्ट्रीय ग्रंथ घोषित करायचे म्हणतात. कारण की पुन्हा युद्ध करू शकणार. एवढे सर्व चुकीचे बयान देत आहेत आणि मोदी चे तोंड बंद आहे का?

द्रविड भावांनो! आता एकत्र या. ही वेल संकटांनी भरलेली आहे. जर विलग राहणार, तर लक्षात ठेवा; एवढ्या दिवसापर्यंत ब्राम्हणवादाने मारले, आता पुंजीवाद मारणार आणि वर्ग संघर्षाची स्थिती निर्माण होणार.

शिक्षणाचे भगवेकरण करून आपल्या मेंदूला मारण्याचे काम करीत आहे. सरकारी सेक्टर मध्ये खाजगीकरण, FDI, PPP, ठेकेदारी करून आपल्या आरक्षणाला मारून टाकल्या जात आहे. आपली पुढील पिढी दाण्या दाण्याला त्रस्थ होणार. भिखपण मिळणार नाही. जागे व्हा मूळनिवश्यांनो.

कलिंगच्या शांति स्तूपाचा सुवर्ण महोत्सव Golden Jubilee of Kalinga Shanti Stupa

सम्राट अशोक यांच्या कारकिर्दीतील शेवटचे युद्ध जेथे झाले तो प्राचीन प्रांत कलिंग हा सद्यस्थितीत आंध्र प्रदेश,ओरिसा आणि छत्तीसगड राज्यात विभागला गेला आहे. इ.पू. तिसऱ्या शतकात युद्ध झाल्यावर तो भाग मौर्य राजवटीच्या अंतर्गत आला. कलिंग म्हणजे भारताच्या पूर्वेकडील किनारी प्रदेश होय. आताच्या ओरिसामधील गंजम जिल्ह्यात तो भाग येतो. बाभूनेश्वर, बंगाल, बांगलादेश या नावांचा उगम बौद्ध संस्कृती वरूनच झालेला आहे. कलिंग येथील लोक बऱ्याच शास्त्रात तरबेज होते. जहाज बांधणीचा त्यांचा मोठा व्यवसाय होता. समुद्रकिनारा जवळ असल्यामुळे मोठी बंदरे होती. तिथून परदेशात व्यापार चालत असे. त्यामुळे या भागात भरभराट होऊन येथील उत्कर्ष झालेल्या वसाहतीला उत्कल म्हणत.


या प्रांतात असलेल्या धौली टेकड्या दया नदीच्या किनाऱ्यावरती आहेत. भुवनेश्वर पासुन हे ठिकाण ८ कि.मी. अंतरावर आहे. येथील टेकड्या सोडल्या तर बाकीचा भूप्रदेश सर्व सपाट आहे. इथेच सम्राट अशोक यांचा शिलालेख आहे. आणि हीच जागा कलिंग युद्धाची जागा म्हणून मानली गेली आहे. कलिंग युद्ध हे मौर्य सम्राट अशोक व कलिंग राजा अनंता (सुरथा) यांच्या मध्ये झाले. युद्धा नंतरची परिस्थिती पाहून सम्राट अशोकांना पश्चाताप झाला. अंतःकरणात दया-करुणा दाटली आणि त्या नदीचे नाव सुद्धा दया झाले. तसेच युद्धामध्ये धुरळा उडाला आणि अनेकांची धूळधाण झाली म्हणूनच इथल्या टेकड्यांना धौली नाव पडले, असे समजले जाते. युद्धानंतर धम्माच्या आश्रयास गेल्यावर येथेच धौलीच्या आसपास सम्राट अशोकांनी अनेक चैत्य, स्तूप,स्तंभ आणि विहार उभारले. संपूर्ण उत्कलवासी बौद्धमय झाले. आपल्या राष्ट्रगीता मध्ये येणारी ओळ 'द्राविड उत्कल बंग' यातील उत्कलं म्हणजेच इथला प्राचीन कलिंगवासी बौद्ध समाज होय.

कलिंग युद्धानंतर अस्वस्थ झालेल्या सम्राट अशोक यांनी धौली येथे शांती व करुणेचा पुरकार करणाऱ्या बुद्धांच्या धम्माचा मार्ग अनुसरला. म्हणूनच या ठिकाणी जपानि संस्था "कलिंग निप्पॉन बुद्ध संघ" आणि "जपान बुद्ध संघ" ओरिसा राज्य यांनी 1972 साली सम्राट अशोक यांचे प्रतिक म्हणून मोठा स्तूप उभारला. या शुभ्र पढऱ्या स्तुपास शांतिस्तूप किंवा शांतिपॉगोडा म्हटले जाते. यावर्षी या स्तुपास पन्नास वर्षे पूर्ण होत आहेत. त्या अनुषंगाने ओरिसा राज्याने 28 ऑक्टोबर 2022 रोजी मोठा समारंभ करण्याचे आयोजित केले आहे. जगातील जवळजवळ 150 वरिष्ठ बौद्ध भिक्षुंना या कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी आमत्रित करण्यात येणार. शांतीस्तुपाचा सुवर्ण मोहोत्सव मोठ्या प्रमाणावर बौद्ध गाथा व सूत्रे यांचे पठाण करून साजरा कण्यात येणार आहे. तसेच त्यानिमित्ताने भुवनेश्वर ते धौलीपर्यंत शांति पदयात्रा देखील काढण्यात येणार आहे.

याबाबत ओरिसाचे मुख्य सचिव ए. सी. मोहापात्रा यांच्या अध्यक्षेतेखाली नुकतीच एक बैठक झाली. यात शांतिस्तुपाचा सुवर्ण मोहोत्सव साजरा करण्याबाबत काही निर्णय घेण्यात आलेत. तत्पूर्वी या स्तुपाची डागडुजी व

रंगरंगोटी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. यासाठी ₹1.87 कोटीचा निधीपण देण्यात आला आहे. शांतिस्तूपाच्या भोवताली प्रदक्षिणा मार्ग देखील बांधण्यात येणार आहे. या शांतिस्तुपाच्या दुरुस्तीचे काम पाहण्यास जपान वरून प्रमुख भंतेजी व काही अभियंते आले होते. त्यांनी कामाची प्रत्यक्षपाहणी करून राज्य सरकार करीत असलेल्या दुरुस्ती कामाबद्दल समाधान व्यक्त केले. सम्राट अशोक, कलिंग युद्ध आणि त्यांनी स्वीकारलेला बौद्ध जीवनमार्ग यांची आठवण म्हणून उभारलेल्या या शांतिस्तुपास मी नमन करतो. तसेच या स्तुपाचा सुवर्ण मोहोत्सव साजरा करण्याचा कार्यक्रम आखल्याने मी ओरिसा राज्याचे विशेष आभार मानतो. कारण या पृथ्वीवर मानवाला जगण्यासाठी शांतिच्या मार्गाची नितांत आवश्यकता आहे, याची आठवण हा स्तूप कायम करून देत आहे.

- संजय सावंत



सम्राट अशोक, कलिंग युद्ध आणि शांतिसाठी स्वीकारलेला
बुद्धांचा धम्म यांचे प्रतीक असलेल्या या धौलीच्या स्तूपास माझे
मनोभावे वंदन.

बौद्ध धर्म श्रीलंका की संस्कृति और इतिहास का एक महत्वपूर्ण हिस्सा शामिल है, यही कारण है कि पूरे देश में कई बौद्ध मंदिर देखे जाते हैं। एक उल्लेखनीय मंदिर कैंडी में टूथ का मंदिर है, जो कि भगवान बुद्ध के पवित्र दांत अवशेष का घर है।

कालातीत कहानियां और आकर्षक तथ्य इस आंसू के आकार के द्वीप राष्ट्र को घेरते हैं जो अपने समय-सम्मानित और रंगीन इतिहास में बहुसांस्कृतिक विरासतों के लिए गर्व मेजबान है जो दुनिया के कुछ सबसे प्राचीन धर्मों को भविष्यवाणी करता है। विभिन्न मान्यताओं के बड़े और छोटे मंदिरों ने जो समय की लंबी परीक्षा को रोक दिया है, देश को डॉट करते हैं।

बड़ा या छोटा, हर मंदिर अतीत, आंतरिक कलात्मक विवरण और खूबसूरत नक्काशी की किंवदंतियों का घर है जो प्राचीन परंपराओं और रीति-रिवाजों का प्रतिनिधित्व करते हैं जो आज भी मौजूद हैं। इनमें से प्रत्येक मंदिर श्रीलंकाई संस्कृति में एक आकर्षक अंतर्दृष्टि प्रदान करता है, और हालांकि उनमें से कुछ सहस्राब्दी से अधिक पुराने हैं, खंडहर और स्तंभ अभी भी रहस्य की भावना पैदा करते हैं और उन लोगों के लिए आश्चर्य करते हैं जो उनके पास जाते हैं।

डंबुला गुफा मंदिर

डंबुला गुफा मंदिर, जिसे डंबुला के स्वर्ण मंदिर के रूप में भी जाना जाता है, श्रीलंका में सबसे बड़ा और सबसे सुरक्षित संरक्षित गुफा मंदिर परिसर है। यह यूनेस्को की विश्व धरोहर स्थल है जिसमें स्थान पर 80 गुफाएं हैं। मुख्य आकर्षण पांच गुफाओं में फैले हुए हैं, जिन्हें गौतम बुद्ध के जीवन को चित्रित करने वाली नक्काशी, मूर्तियों और चित्रों के साथ जटिल रूप से डिजाइन किया गया है। परिसर 153 बुद्ध मूर्तियों और मूर्तियों का घर है जो मार, राक्षस और बुद्ध के पहले उपदेश की प्रलोभन की कहानियों को बताते हैं।

एकोनविसाव्या शतकातील बौद्धधम्माचे योद्धा पोकला लक्ष्मी नरसु यांना 14 जुलै मृत्यू दिनानिमित्त विनम्र अभिवादन.

पी लक्ष्मि नरसु हे व्यक्तिमत्व एकोणविसाव्या शतकातील थोर विभूती, विद्वान व बौद्ध धम्म प्रचारक होते हे यावरून सिद्ध होते की, नाबासाहेब आंबेडकरांनी त्यांची पुस्तक "इन्सेस ऑफ बुद्धिझम" या पुस्तकाचे 18 मार्च 1948 ला पुणरमुद्रित प्रकाशन केले व त्या पुस्तकाची प्रस्तावना स्वतः या पुरमुद्रित पुस्तकात बनासाहेब आंबेडकरांनी लिहलेली आहे. नरसु बद्दल बाबासाहेब आंबेडकर लिहतात की, प्रोफेसर नरसु हे एक मूर्ती विधवंसक होते, ते एक समाजसुधारक होते. प्रोफेसर नरसुने भारतात जाती व्यवस्थे विरोधात आपल्या पूर्ण ताकदीने युद्ध लढले आहे. हिंदू धर्माच्या जाती कुप्रथेने जे अत्याचार होत होते, त्या विरोधात नरसु यांनी विद्रोहाचा झेंडा उभा केलेला होता व हे सर्व नरसुनी अठराव्या शतकातील शेवटच्या काळात केलेला आहे.

बाबासाहेब आंबेडकर नरसु बद्दल लिहितात, नरसु हे बौद्ध धम्माचे मोठे प्रशंसक होते. बौद्ध धम्मावर नरसु हे दर आठवड्यात प्रवचन देत असत. प्रो. नरसु हे जातीप्रथा, बालविवाह, विधवा विवाह याविरोधात कार्यरत प्रथम रांगेतील व्यक्ती आहेत. त्यांच्या एका भावाने अठराव्या शतकातील शेवटच्या काळात स्वतः विधवा विवाह करून एक आदर्श उपस्थित केलेला आहे. बाबासाहेब म्हणतात की, मागील काही काळापासून भारतातील वेगवेगळ्या भागातून लोकांनी मला बौद्ध धम्मातील एका उत्कृष्ठ ग्रंथाबद्दल माहिती मागितली. त्या सर्वांना प्रो. नरसु यांच्या "इसेन्स ऑफ बुद्धिझम" या ग्रंथाची शिफारस केलेली आहे. नाबासाहेब म्हणतात की, आज जे काही बौद्ध धम्मावर ग्रंथ आहेत त्यातील सर्वश्रेष्ठ ग्रंथ "इसेन्स ऑफ बुद्धिझम" आहे.

प्रो. नरसु यांनी अनेक ग्रंथ इंग्रजीत लिहिलेले आहेत. त्यांच्या पुस्तकांचे हिंदीत अनुवादहि झालेले आहेत. इसेन्स ऑफ बुद्धिझम 1907 मध्ये प्रकाशित झाला. त्याची द्वितीयावृत्ती 1911 मध्ये अनागरिक धम्मपाल यांनी काढली तर; तृतीयावृत्ती 1948 मध्ये बाबासाहेब आंबेडकरांनी काढली. व्हॉट इस बुद्धिझम 1916 ला, अ स्टडी ऑफ कास्ट 1922, रिलीज ऑफ मॉडर्न बुद्धिस्ट व बुद्धिझम इन अ नटशेल या प्रो. नरसु यांच्या सर्वश्रेष्ठ रचना आहेत.

प्रो. नरसु यांनी एकोणविसाव्या शतकातील सुरुवातीला तथागत बुद्धांचे चरित्र व शिकवण यावर आधारित एक बुद्धिवादी द्रुष्टिकोनातून "इसेन्स ऑफ बुद्धिझम" या धम्मग्रंथाची निर्मिती केलेली आहे. या धम्मग्रंथात प्रो. नरसु यांनी ऐतिहासिक बुद्ध, बौद्ध धम्म आणि बुद्धिवाद, बौद्ध धम्म आणि नीतिमत्ता, बौद्ध धम्म आणि जातीवाद, बौद्ध धम्म आणि स्त्री, चार आर्य सत्य, बौद्ध धम्म आणि कायाक्लेश, बौद्ध धम्म आणि निराशावाद, आर्य अष्टांगिक मार्ग, जगाचे कोडे, व्यक्तिमत्व, मृत्यू आणि मृत्युचा उपरांत व दान या तेरा पाठातून या धम्मग्रंथात बुद्धांनी सांगितलेला धम्म बुद्धिवादी दृष्टिकोनातून स्पष्ट केलेला आहे.

या ग्रंथातील प्रस्तावनेत प्रो. नरसु लिहितात की, बौद्ध धम्मामध्ये सुरुवातीच्या काळापासून बौद्धधम्मात असे अनेक संप्रदाय निर्माण झालेले आहेत की त्यांची स्थापना ही "प्रत्येक गृहस्थ हा अर्हत" होऊ शकतो यावर आधारित आहे. बौद्ध धम्म हा इतका लवचिक धम्म आहे की, नेपाळमधील वज्राचारी (विवाहित) लोकांना समाविष्ठ करतात व श्रीलंका मध्ये स्थवीर (अविवाहित) हे बौद्ध धम्माचा प्रचारक म्हणून भिक्खू म्हणून कार्य करतात. नरसु लिहितात की, जगातील सर्व विचारशील लोकांचा बौद्ध धम्म आकर्षण निर्माण करीत आहे. आजचा बौद्ध धम्माचा मुख्य प्रश्न हा आहे की, बौद्ध धम्म आधुनिक सभ्येतेच्या पुढे उभा राहू शकतो काय?

प्रो. नरसु या धम्मग्रंथातील "ऐतिहासिक बुद्ध" या पाठात लिहितात की, "ज्या व्यक्तीने बोधी प्राप्त केली त्याला बुद्ध म्हणतात." चित्त मधील चैतसिक त्यातील नैतिक आदर्श स्थिती जो कोणीही व्यक्ती स्वतःच्या मानवी प्रयत्नाने प्राप्त करतो त्याला बोधी म्हणतात व ही बोधी कोणीही मनुष्य प्राप्त करू शकतो. (प्रत्येक व्यक्ती या आदर्श स्थितीतून जाऊन बुद्धत्व प्राप्त करू शकतो.) याप्रकारे प्रो. नरसु यांनी, बाबासाहेब आंबेडकरांदी "द बुद्ध अँड हिज धम्मा" हा धम्मग्रंथ लिहून बौद्ध धम्म समजण्यासाठी त्यावेळी एक सर्वश्रेष्ठ ग्रंथ निर्मिती केली होती व त्याची दाखल स्वतः बाबासाहेब आंबेडकरांनी घेतली यातच प्रो. नरसु यांची महत्ती आम्हाला कळते.

प्रोफेसर नरसु यांचे सर्व जीवन चरित्र प्रस्तुत करणे कठीण आहे. त्यांच्या जीवनाबद्दल जे ही माहिती मिळते ती बाबासाहेबांनी "इसेन्स ऑफ बुद्धिझम" मध्ये लिहिलेल्या प्रस्तावनेत व धम्मानंद कौसंबी यांनी लिहिलेल्या आत्मचरित्र यावरून. नरसु यांनी "साऊथ बुद्धिष्ट असोसियशन" ची स्थापना सी अयोध्यादास यांच्यासोबत केली. या संस्थेद्वारे 1910 मध्ये भारत सरकार द्वारा बौद्धांची वेगळी जणगणना करण्यात आली. त्यावेळी 18000 बौद्ध धम्मिय मद्रास राज्यात होते.

प्रो. नरसु यांचा जन्म इ. स. 1661 मध्ये एका संपन्न कुटुंबात झाला. त्यांचे वडील पोकल चेल्लम नयनायागारु हे मद्रास उच्च न्यायालयात एक नामांकित वकील होते. नरसु हे उच्चशिक्षित होते व भौतिकशास्त्र मध्ये पदवीधर होते व त्यासोबत रसायनशास्त्र मध्ये त्यांचे प्रभुत्व होते. अठराव्या व एकोणवीसाव्या शतकातील बौद्ध धम्मातील महान विभूतीचे मृत्यू 14 जुलै 1914 ला झाले. आज या महान बौद्ध प्रचारकास विनम्र अभिवादन.



Prof. P.L. Narasu

तुमच्यापैकी किती जणांना भारताच्या विभाजनाबद्दल माहिती आहे? भारताची फाळणी किती वेळा झाली? *ब्रिटिश राजवटीने 61 वर्षांत सात वेळा*.

1) *अफगाणिस्तान* 1876 मध्ये भारतापासून वेगळे झाले.

2) 1904 मध्ये *नेपाळ*

3) 1906 मध्ये *भूतान*

4) 1907 मध्ये *तिबेट*

5) 1935 मध्ये *श्रीलंका*

6) *म्यानमार* (बर्मा) 1937 मध्ये. आणि ...

7) 1947 मध्ये *पाकिस्तान*

अखंड भारताची फाळणी:

पुर्वी अखंड भारत *हिमालया पासून हिंदी महासागरापर्यंत आणि इराणपासून इंडोनेशियापर्यंत विस्तारलेला होता.* 1857 मधे भारताचे क्षेत्रफळ *83 लाख* चौरस किलोमीटर होते आणी सध्या *33 लाख* चौरस किमी आहे. वर्ष 1857 ते 1947 या कालावधीत भारताचे बाह्य शक्तींनी अनेक वेळा तुकडे केले. पूर्वीच्या भारतापासून विभक्त झालेले भाग:

1) 1876 मध्ये अफगाणिस्तान, 2) 1904 मध्ये नेपाळ, 3) 1906 मध्ये भूतान, 4) 1907 मध्ये तिबेट, 5) 1935 मध्ये श्रीलंका, 6) 1937 मध्ये म्यानमार आणि 7) 1947 मध्ये पाकिस्तान.

श्रीलंका:

ब्रिटीशांनी 1935 मध्ये श्रीलंका भारतापासून वेगळी केली. श्रीलंकेचे जुने नाव *सिंहलदीप* होते. सिंहलदीप हे नाव नंतर सिलोन असे ठेवण्यात आले. सम्राट अशोकाच्या काळात श्रीलंकेचे नाव *तामपर्णी* होते.

सम्राट अशोकाचा मुलगा महेंद्र आणि मुलगी संघमित्रा बौद्ध धम्माचा प्रचार करण्यासाठी श्रीलंकेत गेले होते. श्रीलंका हा अखंड भारताचा एक भाग होता.

अफगाणिस्तान:

अफगाणिस्तानचे प्राचीन नाव पाली भाषेत *उपगणस्थान* होते आणि अफगाणिस्तान हा एक बौद्ध देश होता. तो भारताचा एक भाग होता.

1876 मध्ये रशिया आणि ब्रिटनमध्ये एक करार झाला. करारानंतर, अफगाणिस्तान एक स्वतंत्र देश म्हणून स्वीकारला गेला.

म्यानमार (बर्मा) :

म्यानमार चे (बर्मा) हे प्राचीन पाली शब्दात नाव होते. 1937 मध्ये म्यानमार म्हणजेच बर्माला स्वतंत्र देशाची मान्यता इंग्रजांनी दिली. प्राचीन काळी बौद्ध राजा आनंदवर्ताने येथे राज्य केले होते.

नेपाळ :

नेपाळ प्राचीन काळात *देवघर* म्हणून ओळखले जात होते. भगवान बुद्धांचा जन्म लुंबिनी येथे झाला ते नेपाळ मधे आहे. 1904 मधे इंग्रजांनी नेपाळला एक स्वतंत्र देश बनविले. काही वर्षांपूर्वीपर्यंत नेपाळच्या राजाला नेपाळ नरेश म्हटल्या जात असे. नेपाळमध्ये 81% बौद्ध आणि 9% हिंदू आहेत.

सम्राट अशोक आणि समुद्रगुप्त यांच्या काळात नेपाळ हा भारताचा अविभाज्य भाग होता. 1951 मधे नेपाळचे महाराजा त्रिभुवन सिंह यांनी भारताचे तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांना नेपाळचे भारतात विलीनिकरण करण्याचे आवाहन केले पण जवाहरलाल नेहरूंनी हा प्रस्ताव नाकारला.

थायलंड :

थायलंडला 1393 पर्यंत स्याम/सयाम म्हणून ओळखले जात होते. स्याममधील बौद्ध विहारांचे बांधकाम तिसऱ्या शतकात सुरु झाले होते. आजही या देशात अनेक विहार व स्तूप आहेत. थायलंडची राजधानी बँकॉक मधे शेकडो बुद्धांची विहारे आहेत.

कंबोडिया :

कंबोडिया पाली नाव कंबोज पासून आले आहे, हा अखंड भारताचा भाग होता. भारतीय वंशाच्या कौंडिन्य शक्य वंशाने पहिल्या शतकापासूनच येथे राज्य केले. येथील लोक बुद्ध यांची पूजा करायचे. राष्ट्रभाषा पाली होती. कंबोदीयामध्ये आजही चेत, विशाख, आषाढ या भारतीय महिन्यांची नावे वापरली जातात.

जागप्रसिद्ध अंकोरवट विहार भगवान बुद्धला समर्पित आहे, हे बौद्ध राजा सूर्यदेव वर्मन यांनी बांधले होते. अंकोरवटचे प्राचीन नाव यशोधरपूर आहे.

व्हियतनाम :

व्हियतनामचे प्राचीन नाव चंपादेश आहे आणि त्याची प्रमुख शहरे इंद्रपूर, अमरावती आणि विजय होती. अनेक बौद्ध विहार आजही येथे सापडतील. लोकांना चाम असे म्हटले गेले जे मूळ बौद्ध होते.

मलेशिया :

मलेशियाचे प्राचीन नाव मलय देश होते. हा एक पाली शब्द आहे ज्याचा अर्थ पर्वताची जमीन आहे. मलय देशात बौद्ध धम्म पाळल्या जात होता. बुद्धांच्या मूर्तीची पूजा करण्यात येत होती. येथील मुख्य लिपी पाली होती आणि पाली ही मुख्य भाषा होती.

इंडोनेशिया :

इंडोनेशियाचे प्राचीन नाव पाली शब्दात दीपंतर भारत आहे. इंडोनेशियाच्या अग्रगण्य संस्थांची नावे किंवा मोटो अजूनही पाळीमध्ये आहेत.

इंडोनेशियन पोलीस अकदमी - धर्म बिजाक्षणा बुध्दा

इंडोनेशिया राष्ट्रीय सशस्त्र दल - त्रिधर्म एक कर्म

इंडोनेशिया एअरलाइन्स - गरुड एअरलाईन्स

इंडोनेशिया गृह मंत्रालय - चरक भुवन

इंडोनेशिया वित्त मंत्रालय - नगर धन रक्षा

इंडोनेशिया सर्वोच्च न्यायालय - धर्मायुक्ती

तिबेट :

तिबेटचे प्राचीन नाव पाली या त्रिविष्ठम नावाने होते आणि ते दोन भागांमध्ये विभागले गेले होते. 1907 मधे चिनी आणि इंग्रज यांच्यात झालेल्या करारानंतर एक भाग चिनला आणि दुसरा भाग लामाला देण्यात आला. 1954 मधे भारताचे पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांनी तिबेटला चिनचा एक भाग म्हणून स्वीकारले जेणेकरून चिनी लोकांना ऐकता दाखवता येईल. पुढे चिनी राजवटीने तो भागसुद्धा बळजब्रीने ताब्यात घेतला.

भूतान :

1906 मधे इंग्रजांनी भूतानला भारतापासून वेगळे केले आणि एक स्वतंत्र देह म्हणून मान्यता दिली. भूतान हा पाळी शब्द भू-उत्थान या शब्दापासून बनला आहे ज्याचा अर्थ उंच जमीन असा आहे.

पाकिस्तान :

14 ऑगस्ट 1947 रोजी भारताची फाळणी झाली आणि पूर्व पाकिस्तान व पश्चिम पाकिस्तान म्हणून पाकिस्तान अस्तित्वात आला.

मिहोम्मद अली जिन्ना 1940 पासून धर्माच्या आधारावर वेगळ्या देशाची मागणी करीत होते जे नंतर पाकिस्तान बनले. 1971 मधे भारताच्या सहकार्याने पाकिस्तानचे पुनः विभाजन झाले आणि बांग्लादेश अस्तित्वात आला. पाकिस्तान आणि बांग्लादेश पूर्वीच्या भारताचे भाग उरले आहेत.

17 सितंबर 1879 आज के ही दिन


पेरियार रामास्वामी नायकर जी की जयंती के शुभ अवसर पर आप सभी को हार्दिक बधाईयां मंगल कामनाओं के साथ 🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🙏🙏🙏🙏🙏🌹🌹🌹🌹

आश्चर्यजनक धातु के बने पेरियार सिर्फ मंचों पर ईश्वर के अस्तित्व को नकार कर चुप नहीं रहे स्वयं हिंदू ईश्वर के समक्ष हिमालय की तरह चुनौती बनकर खड़े हुए थे उन्होंने हिंदू ईश्वर व धर्म और कुसंस्कार के विरुद्ध संग्राम चलाने के लिए डेढ़ करोड़ रुपए से ज्यादा की अपनी संपत्ति दान कर दिया था उन्होंने खुद ही नहीं अपनी स्त्री पुत्र परिजन सभी को युक्तहीन सामाजिक व धार्मिय कदाचार के जीवन यापन करने के लिए प्रेरित किया था अपने पुत्र की शादी में शहनाई की जगह शोक संगीत बजवाया था । शादी उन्होंने हिंदू धर्मानुसार अति अशुभ लगन में करवाया था । उस शादी में पुरोहित की जगह विधवाओं से काम लिया था । न भूतो न भविष्यते । वह एक अद्भुत व आश्चर्य तम दृश्य था जिसे लोगों ने दीदे फाड़ कर देखा था ट्रक पर सवार पेरियार उस पर रखी सीता राम राधा कृष्ण शिव पार्वती गणेश आदि की मूर्तियों पर झाड़ू और जूतों की बरसात करते हुए पेरियार कहे रहे थे देखो इन देवी देवताओं में कोई शक्ति नहीं है यह मेरा कुछ नहीं बिगाड़ पा रहे हैं सचमुच परियार ने अपने व्यवहारिक जीवन द्वारा प्रमाणित कर दिया था कि ईश्वर जैसी कोई सत्ता नहीं है यह प्रमाणित कर उन्हें असीम तृप्ति हुई थी।

पेरियार तमिल राजनीतिज्ञ और सामाजिक सुधारक

यह लेख पेरियार नामक राजनेता के बारे में है। अन्य प्रयोगों के लिए, पेरियार (बहुविकल्पी) देखें।इरोड वेंकट नायकर रामासामी (17 सितम्बर, 1879-24 दिसम्बर, 1973) जिन्हे पेरियार (तमिल में अर्थ -सम्मानित व्यक्ति) नाम से भी जाना जाता था, बीसवीं सदी के तमिलनाडु के एक प्रमुख राजनेता व दलित शोषित, गरीबों के मसीहा थे। इन्होंने जस्टिस पार्टी का गठन किया जिसका सिद्धान्त जातिवादी व गैर बराबरी वाले हिन्दुत्व का विरोध था। जो हिंदुत्व दलित समाज के उत्थान का एकमात्र विकल्प था।[1][2]

ई.वी. रामासामी पेरियार



ई.वी. रामासामी पेरियार 1968 में

जन्म : १७ सितम्बर १८७९ इरोड, मद्रास प्रेजिडेंसी, ब्रिटिश भारत (अब इरोड जिला, तमिलनाडु, भारत)

मृत्यु : 24 दिसम्बर 1973 (उम्र 94) वेलोर, तमिलनाडु, भारत

अन्य नाम : ई.वी.आर पेरियार, वैकम वीरारी,

व्यवसाय : सामाजिक कारकुन, राजनेता, सुधारक

राजनैतिक पार्टी : भारतीय राष्ट्रीय कांग्रेस जस्टिस पार्टी संस्थापक द्रविदर कड़गम

जीवनसाथी : नगममाई (निधन 1933), मनिअमाई(1948- 1973)

बचपन

इनका जन्म 17 सितम्बर 1879 को पश्चिमी तमिलनाडु के इरोड में एक सम्पन्न, परम्परावादी हिन्दू धर्म की बलीजा जाति में हुआ था। १८८५ में उन्होंने एक स्थानीय प्राथमिक विद्यालय में दाखिला लिया। पर कोई पाँच साल से कम की औपचारिक शिक्षा मिलने के बाद ही उन्हें अपने पिता के व्यवसाय से जुड़ना पड़ा। उनके घर पर भजन तथा उपदेशों का सिलसिला चलता ही रहता था। बचपन से ही वे इन उपदशों में कही बातों की प्रामाणिकता पर सवाल उठाते रहते थे। हिन्दू महाकाव्यों तथा पुराणों में कही बातों की परस्पर विरोधी तथा बाल विवाह, देवदासी प्रथा, विधवा पुनर्विवाह के विरुद्ध अवधारणा, स्त्रियों तथा दलितों के शोषण के पूर्ण विरोधी थे। उन्होंने हिन्दू वर्ण व्यवस्था का भी बहिष्कार किया। १९ वर्ष की उम्र में उनकी शादी नगम्मल नाम की १३ वर्षीया स्त्री से हुई। उन्होंने अपना पत्नी को भी अपने विचारों से ओत प्रोत किया। [3][4][5]

काशी यात्रा और परिणाम

१९०४ में पेरियार ने एक ब्राह्मण, जिसका कि उनके पिता बहुत आदर करते थे, के भाई को गिरफ़्तार किया जा सके, इस हेतु न्यायालय के अधिकारियों की मदद की। इसके लिए उनके पिता ने उन्हें लोगों के सामने पीटा। इसके कारण कुछ दिनों के लिए पेरियार को घर छोड़ना पड़ा। पेरियार काशी चले गए। वहां निःशुल्क भोज में जाने की इच्छा होने के बाद उन्हें पता चला कि यह सिर्फ ब्राह्मणों के लिए था। ब्राह्मण नहीं होने के कारण उन्हे इस बात का बहुत दुःख हुआ और उन्होने हिन्दुत्व के विरोध की ठान ली। इसके लिए उन्होने किसी और धर्म को नहीं स्वीकारा और वे हमेशा नास्तिक रहे। इसके बाद उन्होने एक मन्दिर के न्यासी का पदभार संभाला तथा जल्द ही वे अपने शहर के नगरपालिका के प्रमुख बन

गए। चक्रवर्ती राजगोपालाचारी के अनुरोध पर १९१९ में उन्होने कांग्रेस की सदस्यता ली। इसके कुछ दिनों के भीतर ही वे तमिलनाडु इकाई के प्रमुख भी बन गए। केरल के कांग्रेस नेताओं के निवेदन पर उन्होने वाईकॉम आन्दोलन का नेतृत्व भी स्वीकार किया जो मन्दिरों कि ओर जाने वाली सड़कों पर दलितों के चलने की मनाही को हटाने के लिए संघर्षरत था। उनकी पत्नी तथा दोस्तों ने भी इस आंदोलन में उनका साथ दिया।

कांग्रेस का परित्याग

युवाओं के लिए कांग्रेस द्वारा संचालित प्रशिक्षण शिविर में एक ब्राह्मण प्रशिक्षक द्वारा गैर-ब्राह्मण छात्रों के प्रति भेदभाव बरतते देख उनके मन में कांग्रेस के प्रति विरक्ति आ गई। उन्होने कांग्रेस के नेताओं के समक्ष दलितों तथा पीड़ितों के लिए आरक्षण का प्रस्ताव भा रखा जिसे मंजूरी नहीं मिल सकी। अंततः उन्होने कांग्रेस छोड़ दिया। दलितों के समर्थन में १९२५ में उन्होने एक आंदोलन भी चलाया। सोवियत रूस के दौरे पर जाने पर उन्हें साम्यवाद की सफलता ने बहुत प्रभावित किया। वापस आकर उन्होने आर्थिक नीति को साम्यवादी बनाने की घोषणा की। पर बाद में अपना विचार बदल लिया।



भीमराव अम्बेडकर और पेरियार

फिर इन्होने जस्टिस पार्टी, जिसकी स्थापना कुछ गैर ब्राह्मणों ने की थी, का नेतृत्व संभाला। १९४४ में जस्टिस पार्टी का नाम बदलकर द्रविदर कड़गम कर दिया गया। 1940 के दशक तक, ई वी रामासामी ने एक अलग पाकिस्तान के लिए मुस्लिम लीग के दावे का समर्थन किया, और बदले में इसके समर्थन की अपेक्षा की। मुस्लिम लीग के मुख्य नेता जिन्ना ने मद्रास के गवर्नर के साथ एक साक्षात्कार में कहा कि भारत को चार क्षेत्रों में विभाजित किया जाना चाहिए: द्रविड़स्तान , हिंदुस्तान, बंगिस्तान >और पाकिस्तान ; द्रविड़स्तान लगभग मद्रास प्रेसीडेंसी क्षेत्र के अंतर्गत आता है। जिन्ना ने कहा, "मेरे पास हर सहानुभूति है और सभी मदद करने के लिए करेंगे और आप द्रविड़स्तान की स्थापना करेंगे जहां 7 प्रतिशत मुस्लिम आबादी अपनी दोस्ती का हाथ बढ़ाएगी और आपके साथ सुरक्षा, न्याय और निष्पक्षता की तर्ज पर रहेगी।

स्वतंत्रता के बाद उन्होने अपने से कोई २० साल छोटी स्त्री से शादी की जिससे उनके समर्थकों में दरार आ गई और इसके फलस्वरूप डी एम के (द्रविड़ मुनेत्र कळगम) पार्टी का उदय हुआ। १९३७ में राजाजी द्वारा तमिलनाडु में आरोपित हिन्दी के अनिवार्य शिक्षण का उन्होने घोर विरोध किया और बहुत लोकप्रिय हुए। उन्होने अपने को सत्ता की राजनीति से अलग रखा तथा आजीवन दलितों तथा स्त्रियों की दशा सुधारने के लिए प्रयास किया।

पटेल: मिस्टर अम्बेडकर, आप महंगे सूट पहनते हैं जबकि आपके लोग बिना कपड़ों के और नग्न रहते हैं? मिस्टर गांधी को देखिए, वे आपके लोगों की तरह बिना कपड़ों के रहते हैं। वह आपके लोगों के सच्चे नेता है।

डॉक्टर अम्बेडकर : मिस्टर पटेल, मेरे लोग 1000 साल से बिना कपड़ों के और नग्न रह रहे हैं। श्रीमान गांधी उनके तरह वेष करते हैं क्योंकि वे चाहते हैं कि वे अगले 1000 वर्षों तक बिना कपड़ों के रहें। मैं चाहता हूं कि मेरे लोग अच्छे कपड़े पहनें और जल्द से जल्द एक अच्छा जीवन व्यतीत करें।



🌹 राजा सम्राट अशोक

सम्राट अशोकाचा जन्म इ.स.पूर्व ३०४ मध्ये झाला. वयाच्या १८ व्या वर्षी अशोकाची उज्जैनला सेनापती म्हणून नेमणूक केली. त्यानंतर त्याची काश्मीरचा राज्यपाल म्हणून नेमणूक केली. दरम्यान वडील बिंदुसार आजारी पडले ही बातमी कळली तो पाटलीपुत्रला येण्यापूर्वी वडिलांचे निधन झाले होते. राजगादीवर कोण बसणार हा वाद निर्माण झाला अशोकाला राज्य सत्तेची लालसा निर्माण झाली त्याने

आपल्या ९९ भावांची हत्या केली. आणि पाटलीपुत्र ची राजसत्ता आपल्या हातात घेतली तेव्हा त्याचे वय २१ वर्षे होते. २५ व्या वर्षी त्यांनी राज्याभिषेक करून ३८ वर्षे त्यांनी राज्यकारभार केला.

प्रत्येक राज्य आपल्या अधिपत्याखाली यावे यासाठी त्यांनी कलिंग राज्यावर स्वारी केली. या युद्धात ६०,००० पैदल सेना, १०,००० अश्र्वसेना, ७०० हत्ती होते, दीड लाख लोक बंदी केले, एक लाख माणसे मारली गेली, दीड लाख लोक जखमी झाले होते. विजय झाला त्याला फार आनंद झाला असता, भंन्ते निग्रोध यांनी तथागत बुद्धांचा मैत्री, करूणा, अहींसेचा उपदेश केला तेव्हा राजा सम्राट अशोकाने आपली तलवार त्यांच्या चरणावर ठेवून प्रतिज्ञा केली की, "मी आज पासून युद्ध करणार नाही, सर्वांशी मैत्री भावनेने वागेन." त्यांचे पाय बुद्ध धम्माकडे वळले. त्यादिवशी आश्विन महिन्याची दशमी होती.

आठ वर्षे बौध्द तीर्थस्थळांना भेटी दिल्या, आश्विन महिन्याच्या दशमीला इ.स.पूर्व २६५ ला भन्ते उपगुप्त यांच्याकडून बुद्ध धम्माची दीक्षा घेतली. सम्राट अशोक यांनी दहा कलमांचा जाहीरनामा तयार केला. तो दिवस विजयादशमीचा दिवस "दसहारा" नावाने साजरा करण्याचे त्याने जनतेला आदेश दिले.

दहा कलमांचा जाहीरनामा

१) हिंसाचार, धार्मिक कार्यासाठी पशुहत्या, पशुबळी बंदी.

२) चोरी आणि फसवणूक न करणे.

३) परस्त्रीगम न करणे.

४) खोटे बोलणे व गैरव्यवहार न करणे.

५) सार्वजनिक व पवित्र स्थळी मद्यपाण न करणे.

६) नास्तिकपणा, सत्कर्मे व माणुसकी तिटकारा न करणे.

७) माणूस गुणांनी श्रेष्ठ ठरवा जातीने नाही.

८) वैरभाव सोडून दिल्याने वैर शांत होते हे विसरू नये.

९) धम्मगुरूंनी बहुजनहिताय, सदाचार आपले आचरण विसरू नये.

१०) निती नियमांचे पालन करणाऱ्या अमृताचा लाभ, नाहीतर मृत्युशी गाठ हे विसरू नये.

सम्राट अशोकाने केलेले समाजिक कार्ये

१) गावांना जोडणारे रस्ते तयार केले, रस्त्याच्या दोन्ही बाजूने सावलीसाठी झाडे लावली, दोन-तीन मैलावर विहिरी खोदल्या.

२) अनेक ठिकाणी औषधी वनस्पती लावल्या, उद्याने तयार केली, देखभालिसाठी कर्ममचारी नेमण्यात आले.

३) माणसांसाठी व जाणवरांसाठी दवाखाने निर्माण करण्यात आले.

४) आजूबाजूला गावांना सोईस्कर अशा ठिकाणी आठवडी बाजार सुरु केले, धर्मशाळा बांधल्या.

५) धार्मिक शिक्षणासाठी मठ तयार केले, सर्व धर्मीयांची सेवा केली, त्यांना सुविधा उपलब्ध करून दिल्या.

६) न्याय देण्यासाठी न्यायालये, कचेऱ्या निर्माण केल्या, रज्जूक नावाचे स्वतंत्र अधिकारी, त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी सरकारी अधिकारी यांचे दौरे काढण्याची प्रथा सुरु केली व अहवाल तयार करणे, उपाय करणे, आर्थिक व्यवस्था करणे.

७) राज्याभिषेक व सम्राट अशोका विजयादशमिला दसहारा उत्सव सुरु केले, त्या दिवसी कैद्यांना मुक्त केले, त्यांना मुक्त जीवन जगण्याची संधी दिली.

तिसरी बौद्ध धम्म सांगिती तथागत बुद्धांच्या महापरिनिर्वाणानंतर 235 वर्षांनी इ. स. पूर्व 248 ला पाटलीपुत्र येथे आयोजित करण्यात आली. सहाय्यक राजा सम्राट अशोक होते. या धम्मसंगीतिमध्ये शिलालेख कोरणे, स्तंभ उभारणे, गुंफा तयार करणे, धम्मासाठी आपली मुलगी संघमित्रा आणि मुलगा महेंद्र यांना चीवर देऊन श्रीलंकेस धम्म प्रचारासाठी पाठविण्यात आले. सम्राट अशोकाने 84000 स्तूप निर्माण केले, अनेक लेण्या निर्माण केल्या, सारनाथ येथे संगमरवरी दगडावर धम्मचक्र तयार करण्यात आले, पहिल्या धम्म उपदेशाचे प्रतिक म्हणून हे धम्मचक्र निर्माण केले आहे.

सम्राट अशोकाने शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी सरकारी खर्चाने शाळा बांधल्या. तक्षशीला, नालंदा अशा विद्यापीठांची निर्मिती केली, भिक्षुंना राहण्याची व्यवस्था केली, तथागत बुद्धांनी 84000 स्कंदामध्ये धम्म सांगितलं त्याचे प्रतिक म्हणून 84000 स्तूप निर्माण करण्यात आले. सम्राट अशोकाने धम्मप्रसारासाठी मोठे योगदान दिले. शंभर कोटींचे दान देऊन इतिहासात अजरामर झाले आहेत. सम्राट अशोकाचा राज्यविस्तार अफगाण ते कन्याकुमारी पर्यंत होता. सम्राट अशोक व्याच्या 72 व्या वर्षी इ. स. पूर्व 232 ला मृत्यू पावले. बौद्ध धम्मीय राजामध्ये सर्वश्रेष्ठ म्हणून गणल्या गेले त्यासाठी देवानाम प्रिय राजा मंत असत.

आयु. राम जाधव

अनागरिक धम्मपाल - एक चिंतन

जन्म : 17 सप्टेंबर 1864, मृत्यू : 29 एप्रिल 1933.

17 सप्टेंबर हा अनागरिक धम्मपालांचा जन्मदिवस जो जगभर "पालि भाषा गौरव दिन" म्हणून साजरा करण्यात येतो. धम्मपालांच्या 158 वी जयंती निमित्त....

अनागरिक धम्मपालांचा जन्म 17 सप्टेंबर 1864 मध्ये श्रीलंकेतील एक अतिश्रीमंत बौद्ध कुटुंबात झाला. त्यांचे जन्म नाव डॉन डेविड ठेवण्यात आले होते. त्यांच्या वडिलांचे डॉन कॅरोलीस हेववितरणे हे श्रीलंकेतील एक प्रतिष्ठित व्यापारी होते व आईचे नाव मल्लिका गुणवर्धणे होते. अत्यंत कुशाग्र बुद्धीच्या डॉनने शाळेत उत्तम प्रगती केली. त्याचा धार्मिक ओढा पाहून, त्याच्या आईने त्याला बौद्ध धम्माचा सविस्तर अभ्यास करण्यास प्रोत्साहन दिले. वयाच्या 16व्या वर्षी डेविडची भेट कर्नल ऑलकॉट आणि मॅडम ब्लावातस्की यांच्याशी झाली. या दोघांनी त्यावेळेस श्रीलंकेमध्ये थिऑसॉफिकल सोसायटी स्थापन केली होती व स्थानिकांच्या प्रश्नावर झटत होते. त्यावेळी श्रीलंकेमध्ये ख्रिस्ती मिशनरी सामान्यजनांना अतिशय हीन वागणूक देत. सर ऑलकॉट आणि मॅडम ब्लावातस्की यांच्याबरोबर फिरताना डॉन डेविडला श्रीलंकेतील गरीब, कष्टाळू व अन्याय, अत्याचारग्रस्त लोकांचे लाचारीचे जीवन अगदी जवळून पाहता आले. या बद्दल त्याला प्रचंड यातना झाल्या. स्वावलंबी होण्यासाठी त्याने तेथील शिक्षण खात्यामध्ये नोकरी सुरु केली. त्याचबरोबर बौद्ध धम्माच्या साहित्याचा अभ्यास करण्यासाठी डेविड पालि भाषा शिकला.

श्रीलंकेतील लोक आपला मूळ बौद्ध धम्म विसरले आणि जो पर्यंत या धम्माचा प्रसार होणार नाही तो पर्यंत ते गुलामगिरीत राहणार हे जाणल्यामुळे डेव्हिडने श्रीलंकेत बौद्ध धम्माला पुनर्जीवित करण्याचे ठरविले.

वयाच्या 19व्या वर्षी, त्याने घराचा त्याग केला आणि अनागरिक झाले. अनागरिक म्हणजे जो चीवर धारण न करता, संसार न करता, आयुष्यभर धम्मासाठी गृहत्याग करतो. यात त्याच्या घरच्यांनी त्याला उत्स्फूर्त साथ दिली. त्याने स्वतःचे नाव बदलून धम्मपाल केले. अनागरिक धम्मपालांनी नंतर गावोगावी जाऊन लोकांमध्ये बौद्ध धम्माचे विचार पेरायला सुरुवात केली आणि त्याचबरोबर त्यांना पारतंत्र्याची जाणीव देखील करून दिली. इंग्रज सरकारने त्यावेळेस लोकांना दारूच्या व्यवसायात गुंतविले होते त्यामुळे गरीब जणतेवला पैशाच्या आमिषाबरोबरच दारूचे व्यसन देखील लागले. धम्मपालांनी सरकारच्या विरोधात आवाज उठवीला आणि अनेक दारूचे कारखाणे बंद पाडण्यास भाग पाडले. जेथे जुनी विहारे होती तेथे जाऊन त्यांची साफसफाई केली आणि तेथे बौद्ध धम्माचे तसेच पाळी भाषेच्या संवर्धनासाठी प्रयत्न केले. काही गावात नवीन विहारे बांधली. बौद्ध धम्माच्या पुनर्जीवितासाठी ते अहोरात्र झटत होते. त्याच दरम्यान त्यांना बुद्धभूमी भारत पाहण्याची ओढ लागलि होती.

1891 मधे ते प्रथम भारतात आले व काही महत्वाच्या बौद्ध स्थळांना भेट देण्यास सुरुवात केली. या स्थळांची दुरावस्था पाहून त्यांना खूप वाईट वाटले. त्यकाळी बुद्धगया येथील महाबोधी महाविहाराचा ताबा काही शैव पंथांच्या महंतांच्या हातात असलेला पाहून त्यांनी तो सोडवुन घेण्याचे ठरविले. बौद्ध धम्मात या महाविहाराचे महत्व त्यांनी तेथील महंतांना समजावून सांगण्याचा प्रयत्न केला पण महंतांनी त्यांना हाकलून लावले. हे काम अत्यंत कठीण आहे हे धम्मपालांना उमजले होते.

बुद्धगयेमध्ये वर्षभर राहून त्यांनी अनेकवेळा महाविहाराला भेटी दिल्या व तेथे वंदना करण्यास सुरुवात केली. अनेक वेळा तेथील महंत त्यांना हुसकावून लावीत व त्यांच्या बरोबर आलेल्या परदेशी पाहुण्यांना टाकून बोलत. एकदा तर चाळीस पन्नास महंतांचि माणसे त्यांच्या अंगावर धावून आली. त्यांच्या तिसऱ्या भेटीत ते बुद्धरूपासमोर मेणबत्ती पेटवीत असतांना महेंद्र गिर नावाच्या इस्माने बुद्धरूप काढण्याचा प्रयत्न केला. धम्मपालांनी स्थानिक पोलीस चौकीत तक्रार केल्यानंतर प्रकरण थोडे शांत झाले. येथे स्थानिक संस्था स्थापन करून महाविराच्या अधिकाराचा प्रस्ताव टाकणे गरजेचे आहे हे जाणून धम्मपालांनी महाबोधी सोसायटीची स्थापना बुद्धगया येथे केली. त्यानंतर श्रीलंकेतील काही मित्रांशी बोलनि करून, ते देणगीसाठी श्रीलंकेला गेले.

धम्मपाल श्रीलंकेत अनेक लोकांना भेटून भारतातील महाबोधी महावीहाराची सत्य परिस्थिती कथन केली. याच दरम्यान त्यांनी जगातील अनेक वृत्तपत्रात महाबोधी महाविहरांची दुरावस्था बाबत लेखन केले. त्यामुळे जागतिक स्तरावर बुद्धगया येथील महाविहाराच्या दुरावस्थेबद्दल चर्चा होऊ लागली. श्रीलंकेतील वास्तव्यात त्यांनी गरीब मुलामुलींसाठी शाळा सुरु केल्या. तेथील धम्म जागृती आपल्या विश्वासू सहकाऱ्यांकडे सुपूर्द करत पुनः भारतात आले. महाबोधी महाविहारात बुद्धरूपासमोर नटमस्तक होत असतांनाच त्यांनी दृढ निश्चय केला की जोपर्यंत महाबोधी महाविहार बौद्धांच्या ताब्यात येत नाही तोपर्यंत ते मायदेशी परतणार नाहीत आणि शेवटच्या स्वासापर्यंत हा लढा चालू ठेवतील. अनागरिक धम्मपाल यांच्या कार्यांची दखल जागतिक पातळीवर घेण्यात आली. 1893 साली शिकागो येथील जागतिक धम्म परिषदेत त्यांना बौद्ध धम्माचे प्रतिनिधित्व करण्याची विनंती करण्यात आली. याच प्रवासात आणि शिकागो मधे त्यांची स्वामी विवेकानदांशी भेट झाली आणि दोघांत बौद्ध धम्मात असलेल्या स्वातंत्र्य, समता आणि बंधुता याबद्दल चर्चा झाली. या चर्चेने विवेकानंद खूप प्रभावित झाले. शिकागो येथील परिषदेत अनागरिक धम्मपालांनी मांडलेले जागतिक सहिष्णूता, बंधुता आणि शांती बद्दलचे बौद्ध विचार प्रभावशाली होते आणि तेथील वृत्तपत्रांनी त्यांची दखल घेतली. बुद्धगयेत परतल्यावर त्यांचा महाविहार संबंधीचा लढा चालूच राहिला. एकीकडे तेथील पंडे त्यांना मज्जाव करीत असत तर दुसरीकडे स्थानिक इंग्रजी पोलिसांकडून बोटचेपे भूमिका होती. एका भेटीत त्यांच्या लक्षात आले की मूळ बुद्धरूप महाविहारातून हलवून बाहेरील पांचपांडव मंदिरात ठेवण्यात आले होते. बुद्धरूप झाकून चेहऱ्यावर कुंकू लावण्यात आले होते. धम्मपालांनी प्रचंड विरोध केला होता. त्याच दिवसी संध्याकाळी ते राहत असलेल्या गेस्ट हाऊस मधे त्यांच्यावर मारेकरी सोडण्यात आले. धम्मपाल आणि त्यांचे काही सहकारी यात जखमी झाले. दाद मिळत नसल्याचे पाहून, या घटनेकडे लक्ष वेधण्यासाठी त्यांनी

वृत्तपत्रे आणि महाबोधी मासिकामध्ये अनेक लेख लिहिले. याच सली त्यांनी महेंद्र गिर, महंत आणि त्याच्या सहकाऱ्या विरोधात न्यायालयात केस टाकली.

महाबोधी महाविहारावर लक्ष ठेवण्यासाठी त्यांनी बुद्धगया येथे एक जमीन विकत घेतली. तेथे मुलामुलींसाठी शाळा आणि धर्मादाय दवाखाना सुरु केला. कोलकत्ता आणि बुद्धगया येथे आजही महाबोधी सोसायटीच्या आठ शाळा व महाविद्यालय आणि अनेक दवाखाने सुरु आहेत.



याच दरम्यान भारतामध्ये पाळी भाषेचा प्रसार व्हावा म्हणून त्यांनी अनेक शाळा महाविद्यालयांना भेटी दिल्या आणि पाळी भाषेचे महत्व विषद केले. बौद्ध धम्म आणि त्या अनुषंगाने पाली भाषेच्या प्रसारासाठी त्यांनी जगभ्रमंती केली. या दौऱ्यातून त्यांनी महाबोधी महाविहार तसेच अनेक प्राचीन बौद्ध स्थळांच्या स्थिती बद्दल लोकांना सांगितले आणि त्यांना मदत करण्याचे व इंग्रज सरकारवर दबाव टाकण्याची विनंती केली. सरनाथ येथील भगवान बुद्धांची मुलगंधकुटी त्यांनी शोधून काढली व तेथे एक विहार बांधले. महाबोधी महाविहाराचा न्यायालयातील लढा त्यांनी चालूच ठेवला होता. न्यायालयात आपली बाजू मांडतांना त्यांनी निक्षुन सांगितले की जगाच्या पाठीवर कुठल्याही एका धर्माच्या ट्रष्टी मंडळावर दुसऱ्या धर्माचा अधिकार नाही मात्र बौद्धांच्या अतिशय पवित्र महाबोधी महाविहारावर हिंदू धर्मातील पंडे अधिकार सांगतात.

1882 साली अनागरिक धम्मपालांनी सुरु केलेला लढा आजही 130 वर्षानंतर चालू आहे. जेथे सिद्धार्थाला प्रचंड परिश्रमानंतर बुधत्व प्राप्त झाले आणि जेथून त्यांनी हे ज्ञान सर्व जगाच्या कल्याणासाठी प्रसार करण्याचे ठरविले ते पवित्र महाबोधी महाविहार आजही बौद्ध धम्मियांच्या ताब्यात नाही ही एक शोकांतिका आहे. बौद्ध धम्माबद्दल प्रचंड श्रद्धा असणारा एक परदेशी बौद्ध भारतात येतो आणि महाबोधी महाविहाराच्या मुक्तीसाठी, आपले घरदार, व्यवसाय सोडून सतत 44 वर्षे, आपल्या आयुष्याच्या शेवटच्या श्वासापर्यंत लढा देतो, त्याबद्दल जागृती निर्माण करतो, पाली भाषेच्या प्रसारासाठी भारतभर फिरतो, हे खरंच आदरणीय कार्यें होय. अशा या महान बौद्ध धम्म प्रसारकास त्यांच्या 158 व्या जयंतीनिमित्त आदरांजली. 29 एप्रिल 1933 मधे व्याच्या 69 व्या वर्षी अनागरिक धम्मपालांचे निधन झाले.

बौद्ध धम्म आणि पाली भाषेसाठी घेतलेले प्रचंड कष्ठाची आठवण राहावी म्हणून जगभर त्यांची जयंती "विश्व पाली भाषा गौरव दिवस" म्हणून साजरी करण्यात येते.

बुद्धगया येथील महाबोधी महाविहार संपूर्णपणे बौद्धांच्या ताब्यात आले तरच खऱ्या अर्थाने बौद्धांच्या अस्मिता जपली जाईल आणि अनागरिक धम्मपालांना आदरांजली अर्पण होईल.

अतुल भोसेकर 9545277410

अनागारिक धर्मपाल

अनागारिक धर्मपाल प्रसिद्ध बौद्ध भिक्षु थे। इनका जन्म श्रीलंका में 17 सितंबर 1864 को हुआ। पिता का नाम डान करोलिंस हेवावितारण तथा माता का मल्लिका था। इनका नाम डान डेविड रखा गया। शिक्षाकाल से ही इन्हें ईसाई स्कूलों में पढ़ने यूरोपीय रहन-सहन और विदेशी शासन से घृणा हो गई थी। शिक्षासमाप्ति पर प्रसिद्ध बौद्ध विद्वान् भदंत हिवकडुवे श्रीसुमंगल नामक महास्थविर से पालि भाषा की शिक्षा और बौद्ध धर्म की दीक्षा ली तथा अपना नाम बदलकर अनागरिक (संन्यासी) धर्मपाल रखा और सार्वजनिक प्रचार कार्य के लिए एक मोटर बस को घर बनाया और उसका नाम "शोभन मालिगाँव" रखकर गाँव-गाँव घूमते विदेशी वस्तुओं के बहिष्कार तथा बौद्ध धर्म का संदेश देने लगे। प्रथम महायुद्ध के समय ये पाँच वर्षों के लिए कलकत्ता में नजरबंद कर दिए गए। महाबोधि सभा (महाबोधि सोसायटी) इनके ही प्रयत्न से स्थापित हुई। मेरी फास्टर नामक एक विदेशी महिला ने इनसे प्रभावित होकर महाबोधि सोसायटी के लिए लगभग पाँच लाख रुपए दिए थे।

धर्मपाल के प्रयत्नों के परिणामस्वरूप उनके निधनोपरांत राष्ट्रपति डॉ॰ राजेंद्रप्रसाद के हाथों बौद्ध गया वैशाख पूर्णिमा, सं. 2012 अर्थात् 6 मई सन् 1955 को बौद्धों को दे दी गई।

13 जुलाई 1931 को उन्होंने प्रव्रज्या ली और उनका नाम देवमित धर्मपाल हुआ। 1933 की 16 जनवरी को प्रव्रज्या पूर्ण हुई और उन्होंने उपसंपदा ग्रहण की, नाम पड़ा भिक्षु श्री देवमित धर्मपाल। 29 अप्रैल 1933 को 69 वर्ष की आयु में इहलीला संवरण की।

उनकी अस्थियाँ पत्थर के एक छोटे से स्तूप में मूलगंध कुटी विहार के पार्श्व में रख दी गई।

"सूर्यपुत्र यशवंत (भैय्यासाहेब) आंबेडकर"

भैय्यासाहेब यांचे खरे नाव यशवंत भीमराव आंबेडकर यांचा जन्म 12/12/1912 रोजी मुंबई येथे झाला. ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि त्यांच्या पहिल्या पत्नी रमाबाई आंबेडकर यांचे प्रथम व एकमेव पुत्र होते. लहानपणापासूनच त्यांना न्यूमॅनेटीक आणि पायाच्या पोलियोसारख्या आजाराने ग्रासले होते. भैय्यासाहेबांना त्यांचे मामा धोत्रे यांनी वेगवेगळ्या प्रकारचे औषध औशोधोपचार करून समुद्राच्या तप्त वाळूमध्ये पाय काढून उभे राहणे आणि त्यातून ऊर्जा निर्माण करणे हा त्यांचा नित्याचा कार्यक्रम असे त्याचबरोबर गावठी औषधांच्या उपचाराने त्यांना बरे करण्यात आले. त्यांचे शिक्षण मॅट्रिक पर्यंत झाले. त्यांचे लग्न 19 एप्रिलला मिरताईंशी झाले.

भैय्यासाहेबांनी कधीही बाबासाहेबांच्या नावाचा फायदा घेतला नाही. त्यांनी स्वतःचे आयुष्य स्वतःच घडविले. त्यांनी सिमेंटचा कारखाना काढला. त्यानंतर मुंबई विमानतळाच्या परिसरात बांधकाम करण्याचा नवीन उद्योग सुरु केला. त्यात त्यांनी कुणालाच वाटेकरी घेतले नाही. हा व्यवसाय सुरळीतपणे चालला होता.

नंतर त्यांनी बाबासाहेबांच्या चळवळीत भाग घेण्यास सुरुवात केली. त्यांनी भारतभूषण प्रिटिंग प्रेस हा छापखाना सुरु केला. नंतर ह्या प्रेसचे बुद्धभूषण प्रिंटिंग प्रेस असे नाव झाले. 1944 पासून बाबासाहेबांच्या मुखपत्राचे व्यवस्थापन तेच पाहत होते. जनता, प्रबुद्ध भारत यांचे ते सर्वेसर्वा होते. महाराष्ट्रासह संपूर्ण देशभरात दलित अस्पृश्य जनतेवर जे अन्याय अत्याचार चालू असतात त्यांच्यावर या पत्रातून दर आठवड्याला भैय्यासाहेबांनी प्रकधझोत पाडण्यास सुरुवात केली. सप्ताहिक प्रबुद्ध भारताच्या माध्यमातून सर्वसामान्य माणसापर्यंत बुद्ध धम्म व तत्वज्ञानाचा प्रचार प्रसार करून समाजातील अज्ञान अंधश्रद्धा हजारो वर्षांपासून चालत आलेल्या अनिष्ठ रूढी परंपरा नष्ट करण्याचे काम केले.

बुद्धभूषण प्रिंटिंग प्रेस मधे बाबासाहेबांचा "Thoughts on Pakistan" हा इंग्रजी ग्रंथ भैय्यासाहेबांनी छापला. बाबासाहेबांनी हा ग्रंथ भैय्यासाहेब व मुकुंदराव यांना अर्पण केलेला आहे. बाबासाहेबांचा दुसरा एक ग्रंथ "Federation

versus freedom" हाही ग्रंथ भैय्यासाहेबांनी आपल्या छापखान्यात छापला "Thoughts in linguistic states" हा ग्रंथसुद्धा भैय्यासाहेबांनी छापला.

त्यानंतर बाबासाहेबांच्या आदेशानुसार वा. गो. आपटे लिखित "बौद्धपर्व" हा ग्रंथही भैय्यासाहेबांनी भारतीय बौद्ध महासभेच्या वतीने आपल्या छापखान्यात छापून प्रसिद्ध केला. भैय्यासाहेबांचे लिखाण अत्यंत तर्कशुद्ध आणि विचारगर्भ असे. त्यांच्या लिखाणातील व भाषणातील विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे म्हणी आणि वाकप्रचार यांचा मोठ्या प्रमाणावर वापर. भैय्यासाहेबांनी बाबासाहेबांची अनेक स्मारके उभारली. पाहिले स्मारक त्यांनी मुंबई येथे बांधले. डॉ. आंबेडकर या सभागृहाचे भूमिपूजन दि. 02/04/1958 ला व उदघाटण दि. 22/06/1958 ला झाले. मुंबई नागरिकांच्या वतीने कफ परेड येथे बाबासाहेबांचा पुतळा बसविण्याचे ठरले. भैय्यासाहेबांनी आग्रह धरला की 26 जानेवारी 1962 रोजीच पुतळ्याचे अनावरण झाले पाहिजे. म्हणून शेवटच्या क्षणी कमी पडत असलेली रक्कम महापौरांना दिली व ठरल्याप्रमाणे 26 जानेवारी 1962 रोजी महाराष्ट्राचे राज्यपाल प्रकाश यांचे हस्ते पुतळ्याचे अनावरण झाले. चौदार तळे क्रांतीचे स्मारक म्हणून जेथे मनुस्मृतीचे दहन करण्यात आले. त्या जागेवर अशोक स्तंभाच्या धर्तीवर क्रांतिस्तंभ उभारण्यासाठीही त्यांनी पुढाकार घेतला. चैत्यभूमीच्या रूपाने बाबासाहेबांचे स्मारक व्हावे म्हणून भारतीय बौद्ध महासभेने दि. 20/03/1957 रोजी BMS कडे 40 बाय 40 ची जागा मागितली BMS ने 8 बाय 8 ची जागा मंजूर केली. परंतु मागणीपेक्षा एक इंचही कमी जागा घेणार नाही असा पवित्रा भैय्यासाहेबांनी घेतला. अखेर BMS improvement committee ने 40 बाय 40 ची जागा मान्य केली. S/c federation आणि R.P.I. पक्ष एकसंघ होता तेव्हापर्यंत या स्मारकांना गती येत होती. जनताही आपला पै पैसा देत होती. जनता स्टेट बँकेसमोर रांगा लावून पैसे भरत होती. स्टेट बँकेत भरणा करावा म्हणून भैय्यासाहेब कुलाबा ते दहिसर व कल्याण पर्यंत फिफिर फिरले 1966 साली डॉ. बाबासाहेबांचा 75 वा वाढदिवस येत होता म्हणून हा जन्मदिवस "अमृत महोत्सव" म्हणून भव्य प्रमाणात साजरा करण्याचे भैय्यासाहेबांनी ठरविले. बाबासाहेबांवर जनतेची अपार श्रद्धा होती. तरीही चैत्यभूमीच्या नावाने उभारण्यात येणारे भव्य स्मारक पूर्ण होत नव्हते. निधी पाहिजे त्या प्रमाणात जमा होत नव्हती हे ओळखून भैय्यासाहेबांनी लोकांना निधीसाठी आव्हाहन केले ती जबाबदारी आपल्या खांद्यावर घेतली त्यासाठी त्यासाठी त्यांनी मध्य प्रदेशातील बाबासाहेबांचे जन्म ठिकाण "महू" या गावापासून भव्य "भीम ज्योत" काढली. या अमृत महोत्सव प्रसंगी डॉ. बाबासाहेबांचे जीवन करायचे प्रतिक म्हणून "भीम ज्योत" "महू ते मुंबई" काढण्याचे ठरविले व 27/03/1966 रोजी "भीम ज्योत" भारताचे मजूर मंत्री ना. जगजीवनराम यांच्या हस्ते प्रज्वलीत करण्यात आली व ह्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी खासदार दादासाहेब गायकवाड होते.

भीम ज्योत महू हून इंदौर, भोपाळ, होसिंगाबाद, बैतूल, नागपूर, पुलगाव, औरंगाबाद, येवला, नाशिक, हरेगाव, नगर, संगमनेर, देहू रोड, पुणे, सातारा, वणी, पंचगणी, महाबळेश्वर, खेड, मंडणगड, दापोळी, महाड, पेण, पनवेल, कल्याण, ठाणे, मुलुंड, राजगृह व चैत्यभूमिला आली व या भीम ज्योतिमध्ये मिळालेल्या धम्म दानातून चैत्यभूमी स्मारक उभारण्यात आले.

बाबासाहेबांच्या महापरिनिर्वाणानंतर भैय्यासाहेब भारतीय बौद्ध महासभेचे अध्यक्ष झाले. "भारत बौद्धमय करीन" हा बाबासाहेबांचा संकल्प उराशी घेऊन भैय्यासाहेबांनी काम सुरु केले. त्यांनी धम्मदीक्षेचे अनेक कार्यक्रम घेतले. धम्मपरिषदा भरविल्या धम्ममेळावे सर्वत्र होत होते. प्रचार सर्वत्र जोरात सुरु केला. भैय्यासाहेब आमदार असतांना त्यांनी विधानपरिशदेत बुद्धांच्या दलित समाजाच्या हक्कांबद्दल हिरीरीने बाजू मांडली. बुद्धांच्या सवलती विषयी ते पंतप्रधान मोरारजी देसाईंना भेटले. भारतीय बौद्ध महासभेचे अध्यक्ष या नात्याने त्यांनी सिलोन, थायलंड ब्रम्हदेश, सारनाथ व दिल्ली येथे झालेल्या जागतिक बौद्ध परिषदांमध्ये भारतीय बौद्धांच्या समस्या मांडल्या. खेड्यापाड्यांत बौद्धविहारांचे उदघाटण केले. 1960 ते 1964 पर्यंत देशातील भूमिहीनांच्या सत्याग्रहाचे नेतृत्व करून; 1) भूमिहीन लोकांना पडीत जमिनीचे पट्टे मिळवून दिले. 2) बौद्धांना शैक्षणिक सवलती मिळवून दिल्या. 3) शेतमाजुरांना किमान वेतन लागू करून घेतले. 4) झोपडपट्टीमधील लोकांना किमान गरजा व जगा मिळवून दिल्या. 5) दिल्लीच्या संसदभवना समोर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासाठी जागा मिळून घेतली. 1968 साली मुंबई येथे धम्मपरिषद भरविण्यात आली व प्रमुख पाहुणे म्हणून दलाई लामा यांना बोलाविण्यात आले व ह्या धम्मपरिशदेमध्ये अनेक महत्वपूर्ण ठराव पारित करण्यात आले. त्यात म्हणजे संस्कार विषयक आचार संहिता सर्वानुमते मान्य करण्यात आली. "बौद्ध जीवन संस्कार पाठ" या नावाणे पुस्तक तयार करण्यात आले. भैय्यासाहेब हे बौद्धःचार्याचे जनक आहेत. धम्म प्रसार कार्याचा एक भाग म्हणून 1967 मधे 11 वा धम्मचक्र प्रवर्तन दिनी भैय्यासाहेबांनी स्वतः श्रामनेराची दिक्षा घेतली व त्या कालावधीत ते चैत्यभूमीतच राहत होते. त्यांचे नाव "महापंडित काश्यप" असे ठेवण्यात आले होते.

1959 मधे संघरक्षित लंडणहून आले होते. त्यांनी भैय्यासाहेबांची भेट घेतली होती. आणि त्यांना सांगितले, "आपण जे धार्मिक कार्ये करता ते न करता आपण ते आमच्याकडे सोपवा. आपण आमच्यासोबत काम करावे आम्ही त्यांची योग्य ती किंमत देऊ." स्वाभिमाणी भैय्यासाहेबांना हे रुचले नाही त्यांनी संघरक्षितांना सुनावले, "मी माझ्या बापाची संस्था विकणार नाही आपणास जर काम करायचे असेल तर आमच्या संस्थेत येऊन करा." भैय्यासाहेबांनी आपले संपूर्ण आयुष्य गोरगरीबांच्या सेवेसाठी झोकून दिले.

संकलन:- सविता राजेंद्र बाविस्कर व सिद्धार्थ अशोक तायडे.





माजी आमदार नामदेवराव व्हटकर

जन्म : 24 ऑगस्ट 1921, मृत्यू : 4 ऑक्टोबर 1982

२) लुंबीनी :- लुंबीनी हे भगवान बुद्धाचे जन्मस्थळ नेपाळच्या तराईमध्ये आहे. सोनौली बॉर्डर पासून २२ किमी अंतरावर नेपाळ देशाच्या हद्दीत आहे. येथे जाण्याचा मार्ग उत्तर प्रदेशातील गोरखपूर जिल्ह्यातील नैनिताल रेल्वे स्टेशनपासून आहे. याचे वर्तमान नाव 'रुम्मीनदेई' आहे. इ.स. १९९७ साली लुंबिनीला युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थान ह्या यादीमध्ये समाविष्ट करण्यात आले. राणी महामाया गर्भवती असताना पालखीमधे बसुन देवदह जाण्यासाठी निघाली होती तेव्हा देवदह जाण्यासाठी लुंबीनी वनातुन जावे लागत होते. त्यावेळी लुंबीनी वनामधे शाल वृक्षाचे उद्यानवन होते. माता महामायेचे शालवृक्षाच्या उद्यानवनामधे आगमन झाले तेव्हा फळं आणि फुलांनी बहरलेल्या वृक्षांना पाहुन राणी महामाया प्रसन्न झाली, त्या मनमोहक वातावरणाने राणी महामाया अत्यंत प्रभावित झाली. पालखीतुन उतरुन राणी महामाया एका शाल वृक्षाजवळ गेली व एका फांदीला पकडले, तेव्हा अचानक राणी महामायेस प्रसव वेदना व्हायला सुरुवात झाली, व ५६३ इ. पुर्व वैशाखी पोर्णीमेला अतिशय प्रसन्न व निसर्गरम्य वातावरणात सिद्धार्थ गौतमाचा जन्म झाला. याठिकाणी तथागत बुद्धांच्या स्मरणार्थ सम्राट अशोक यांनी 'अशोक स्तंभ' निर्माण केला होता. यावर सम्राट अशोकाचा अभिलेख 'इथे बुद्धाचा जन्म झाला...' लिहलेला आहे. याठिकाणी उत्खननात सापडलेल्या विटांचे प्राचीन स्तुप असुन बाजुला आधुनिक ‘रुम्मीनदेई विहार' आहे.

याच ठिकाणी विहाराच्या दक्षिणेस प्राचीन तलाव आहे जेथे एके काळी बोधिसत्वाचा जन्म झाल्यावर माता महामायाने स्नान केले होते.

३) बुद्धगया :- बुद्धगया हे स्थळ बिहार राज्यामध्ये आहे. गया रेल्वे स्टेशनपासून हे स्थळ १८ किमी अंतरावर आहे. फागुन नदीच्या किनार्यावर हे बौद्ध जगतातील बुद्धांचे सर्वाधिक श्रद्धास्थान वसलेले आहे. ज्या वज्रासनावर बसून बोधिसत्व सिद्धार्थ गौतमाने सम्यक समाधी लावली ते वज्रासन येथे आहे. ज्या पिंपळाच्या झाडाखाली सिद्धार्थाने वज्रासनावर बसून सम्यक संबोधि प्राप्त केली, तो बोधिवृक्ष येथे आहे. बुद्धत्व प्राप्त झाल्यानंतर सात आठवडे भगवान बुद्ध वेगवेगळ्या जागी बसून त्यांना प्राप्त झालेल्या ज्ञानाचा अनुभव घेत राहिले, त्याचीही स्मारके या ठिकाणी आहेत. येथे १६० फुट उंचीचे महाबोधी विहार आहे. या विहारातील भगवान बुद्धांची मूर्ती भूमिस्पर्ष मुद्रेतील आहे. महाबोधी विहाराच्या पाठीमागे चंक्रमण चैत्य, अभिलोष लोचन, रतनगड, अज्रपाल, निग्रोध वृक्ष, राजायतन व मुचलिंद तलाव हि सात प्रमुख ठिकाणे आहेत. बुद्धगयेत तिबेट, ब्रह्मदेश, शियाचीन, व्हिएतनाम, बांगलादेश, जपान, थायलंड, चीन, सिलोन इत्यादी देशांची बुद्ध विहारे आहेत. बिहार ची राजधानी पटनाच्या दक्षिण- पुर्वेस १०१ किमी. अंतरावर स्थित आहे. बोधगया जिल्ह्यातील छोटे शहर आहे. बुद्धागया जवळील फाल्गु नदीच्या सहाय्यक उपनदीस 'निरंजना नदी' म्हणतात. याच नदीच्या काठावर भगवान बुद्धानी कठोर तप केले होते. या नदीचा उगम हजारीबाग जिल्ह्यात सिमेरीया जवळ आहे. प्राचीन भारतातील मुलनिवासी नागवंशिय लोक या नदीकाठी वसलेले होते. याच नदीकाठी सुजाताने बोधिसत्वाला पिण्यासाठी वाटीभर दुध व खीर दीली होती. या ठिकाणी एके काळी सुजाता स्तुप होता. येथे उत्खननात काही अवशेष मिळाले आहेत त्यावर 'देवपालराजस्स सुजातागृह' असा लेख आहे, याचाच अर्थ सुजाताच्या स्मरणार्थ बनविलेला स्तुप हा राजा देवपाल यांच्या शासन काळातील असावा. सुजाता कुटी पासुन काही अंतरावर नदी किनारी छोटा बुद्ध विहार आहे या ठिकाणी सिद्धार्थ गौतमाने वाटी नदीमध्ये प्रवाहित करून भावी बुद्धत्वाची परीक्षा घेतली होती. उरूवेला येथुन निरंजना नदीच्या काठावर आल्यावर सिद्धार्थ गौतम पिंपळाच्या झाडाखाली पद्मासन लाऊन बसले. याच दरम्यान शरीर व चित्ताच्या ध्यानाची भावना केल्याने सिद्धार्थ गौतमास जन्म व मृत्यूच्या पलीकडील सत्याचा साक्षात्कार झाला. सिद्धार्थ गौतमाने जाणुन घेतले की समस्त संसार दुःखी का आहे. आज्ञानाचे कारण काय आहे. लोभ, तृष्णा व अंहकारामुळे काय नुकसान होत आहे. दुःखाच निवारण कसं करायचं. या सर्वांना तथागताने 'चार आर्यसत्य' असे नाव दिले. सम्यक संबोधि प्राप्त केल्यानंतर भगवान बुद्धांनी संपुर्ण पहिला आठवडा बोधिवृक्षाखाली समाधी अवस्थेत व्यतीत केला. हा बोधिवृक्ष बोधगया महाविहाराच्या पश्चिमेस आहे. या बोधिवृक्षाची एक शाखा श्रीलंकेच्या 'अनुराधापुर' मधे आहे. बोधिवृक्ष व महाविहार यांच्या मधे भगवान बुद्धाचे साधना स्थळ 'वज्रासन' आहे. चीनी बौद्ध यात्री '#युवान_शुवांग' म्हणतात की भगवान बुद्धाचे साधना स्थळ 'वज्रासन' समस्त विश्वाच्या मध्यम भागात स्थित आहे. दुसरा आठवडा भगवान बुद्धांनी समाधी अवस्थेत व्यतीत केला. याच ठिकाणी 'अनिमेष

लोचन स्तुप' बनवला गेला आहे. कारण याच आठवड्यात भगवान बुद्ध बोधिवृक्षा विषयी परोपकारी भावना व्यक्त करत बोधिवृक्षाला एकटक बघत राहिले होते. तथागताने तिसरा आठवडा चंक्रमण करत व्यतीत केला. महाविहाराजवळ या घटनेच्या स्मरणार्थ 'चंक्रमण स्थळाचा चबुतरा' बनवण्यात आला आहे. हा चंक्रमण चबुतरा 53 फुट लांब, 3 फुट 6 इंच रूंद व 3 फुट उंच आहे. भगवान बुद्धाच्या पाऊलांचे ठसे प्रदर्शित करण्यासाठी त्यावर कमळाचे फुल बनवले गेले आहेत. चौथा आठवडा भगवान बुद्धांनी 'रतनगृह' येथे ध्यानमग्न अवस्थेत व्यतीत केला. पाचवा आठवडा भगवान बुद्धांनी 'आजपाल निग्रोध' झाडाखाली समाधी अवस्थेत व्यतीत केला. सहावा आठवडा भगवान बुद्धांनी 'मुचिलींद' तळ्याजवळ मुचिलींद वृक्षाच्या सावलीत व्यतीत केला. सातवा व अंतिम आठवडा भगवान बुद्धांनी 'राजायतन' वृक्षाखाली समाधीस्त अवस्थेत व्यतीत केला. आज आपण जो वृक्ष बघतो, तो 60 वर्षापुर्वी 'बरमा' येथुन आणलेला वृक्ष आहे. याच ठिकाणी उत्कल म्हणजेच उडीसा येथील व्यापारी बंधू तपस्सु व भल्लीक यांना भगवान बुद्धानी बुद्ध व धम्माची शरण दिली होती. तपस्सु व भल्लीक दोघेही व्यापारी बंधू तथागताचे पहिले उपासक शिष्य बनले होते.

४) सारनाथ :- हे स्थळ उत्तर प्रदेशामध्ये असून ते वाराणसीपासून ८ किमी अंतरावर आहे. सारनाथ या पवित्र स्थळी, सध्या सारनाथ रेल्वे स्टेशन आहे. बुद्धत्व प्राप्तीनंतर भगवान बुद्धानी प्रथम उपदेश सारनाथ येथील मृगदाय वनामधे पंचवर्गीय भिक्षुंना दिला. यामध्ये चार आर्य सत्य, मध्यम मार्ग व जीवनातील कोणत्याही अतीरेकापासुन दुर राहणे व दुःखाला जाणून घेण्याचा उपदेश दिला. या प्रथम उपदेशास 'धम्मचक्र प्रवर्तन' असे म्हणतात. यानंतर तथागत बुद्धानी 'मृगदाय' वनामधील मुलगंध कुटीमधे निवास केला. मुलगंध कुटीच्या पश्चिमेस सम्राट अशोक कालीन अशोक स्तंभ आहे, यावर तीन अभिलेख कोरलेले आहेत. सारनाथ मधे धम्म चक्र प्रवर्तन केल्यानंतर वाराणसी मधील अनेक लोक संघामधे दिक्षीत झाले. वाराणसी मधील काश्यप बंधुनी बुद्ध धम्माचा प्रचार आणि प्रसार केला. वाराणसी मधे ज्या ज्या ठिकाणी भगवान बुद्धांनी उपदेश दिले त्या सर्व ठिकाणी बौद्ध स्मारक बनविले गेले होते.

५) राजगृह :- हे स्थळ बिहार राज्यात असून नालंदा जिल्ह्यात आहे. बुद्धगयेपासून हे ठिकाण ९० किमी अंतरावर आहे. पटनापासुन जवळ जवळ 100 किलोमीटर दूर असलेल्या बौद्ध तीर्थक्षेत्रास राजगीर म्हणतात. राजगृह म्हणजे राजाचे घर. प्राचीन काळातील 16 भारतीय जनपदापैकी राजगीर एक होते, त्यास त्यावेळी 'राजगृह' म्हटले जायचे. या ठिकाणी मगध वंशाचे शक्तिशाली राजे बिंबीसार यांचे शासन होते. राजा बिंबीसार यांनी आपले आवडते उद्यान 'वेळुवन विहार' भगवान बुद्धास दान दिले होते. याच ठिकाणी भंते दब्बमलपुत्त अरहंत झाले होते, महाराणी खेमा भिक्षुनी झाली होती. भगवान बुद्धाचा चुलत भाऊ देवदत्त याने भगवान बुद्धावर केलेल्या प्राणघातक हल्ल्याचे स्थान देखील राजगीर हेच आहे. गृध्दकुट पर्वतावरुन मोठा दगड देवदत्ताने भगवान बुद्धांच्या अंगावर ढकलून दिला होता पण तो दगड

तथागताच्या पायाच्या बोटाला किरकोळ नुकसान करुन दुर जाउन पडला होता. देवदत्ताने चुगली करून आजातशत्रुच्या मनात भगवान बुद्ध व वडील बिंबीसार यांविषयी द्वेष निर्माण केला. राजा बिंबीसार यांचा मुलगा आजातशत्रु यांने पीता बिंबीसार यांची हत्या केली. त्यानंतर आजातशत्रुचा मुलगा उदयने आजातशत्रुची हत्या केली, यानंतर उदयचा मुलगा महामुंडने उदयची हत्या केली. पितृहत्येचे पापं याच जन्मात सर्वांना भोगले. लिच्छवींनी जेव्हा दुष्काळ निवारणासाठी तथागतास वैशाली मधे बोलवले तेव्हा भगवान बुद्धांना त्रास होऊ नये म्हणून राजगृह ते गंगातट पर्यंत रस्ता राजा बिंबीसार यांनी बनवला होता, आज या मार्गास 'राजा बिंबीसार मार्ग' म्हणतात. येथेच ते कारागृह आहे ज्यामधे राजा बिंबीसार यांना आजातशत्रुने कैद केले होते. भगवान बुद्धाचे चुलत भाऊ देवदत्त यांस भिक्षु बनताना बुद्धासारखी प्रतिष्ठा मिळवण्याची खुप लालसा होती. आपल्या महत्वाकांक्षामधे असफल झाल्यावर त्याच्या मनामध्ये घृणा व तिरस्काराने जन्म घेतला. त्यामुळे देवदत्त भगवान बुद्धाच्या विरोधात क्रूर कारवाया करत राहिला. राजगीर मधील नवीन स्थानास 'नवीन राजगीर' म्हणतात. चीनी बौद्ध यात्री '#फा_हियान' यांच्या नुसार नवीन राजगीरची निर्मिती राजा आजातशत्रु यांनी केली होती. वर्तमान काळात याचे भग्न अवशेष पाहावयास मिळतात. सरस्वती नदीच्या पलीकडे सम्राट अशोक यांनी पश्चिमेस स्तुप बनविला होता. पश्चिमेस 3 मीटर खोदकाम केल्यानंतर येथे मौर्य शैलीच्या वीटा व लघुस्तुप सापडले आहेत. वैभार पहाडीच्या पुर्वेस उतारावर जी गुहा आहे तीला '#पिपलगुहा' म्हणतात. भगवान बुद्धाचे प्रमुख शिष्य भंते 'महाकाश्यप' येथेच निवास करत होते, जे प्रथम बौद्ध संगितीचे अध्यक्ष होते. या ठिकाणी '#सप्तकर्णी' गुहेमधे 'प्रथम धम्म संगिती' झाली होती. गृध्दकुट पर्वताजवळील छटागीरी पर्वतासमीप '#जीवक_आम्रवन_विहार' आपणास बघावयास मिळतो. हे आम्रवन राजवैद्य जीवक यांनी तथागत बुद्धास दान दिले होते. भगवान बुद्ध यांच्या प्रती आपली असीम श्रद्धा व्यक्त करण्यासाठी राजगीरच्या पहाडीवर जपानद्वारा निर्मित भव्य '#शांती_स्तुप' आहे. वैभार पर्वताच्या दक्षिणेतील गुहांना 'सोनभंडार गुहा' म्हणतात, या ठिकाणी मगध राज्याचा स्वर्ण व राजकोश सुरक्षित ठेवला जात होता. मुख्य मार्गापासून दक्षिणेस 1 किमी दुर विटांचे प्राचीन भवन आहे यास '#मणीहार_मठ' असे म्हणतात. मणीहार मठ हे बुद्ध कालीन भिक्षु निवास स्थान होते. ही जागा नागवंशिय लोकांसाठी पूजनीय होती. याच ठिकाणी उत्खनन होऊन अनेक शिल्प व नागप्रतिमा मिळाल्या आहेत.

६) श्रावस्ती :- हे स्थळ उत्तर प्रदेशात असून गोरखपूर पासून २०० किमी अंतरावर आहे. तसेच गौंडा स्टेशनपासून २५ किमी अंतरावर आहे. प्राचीन भारतातील श्रावस्ती नगरास आज 'सहेत महेत' म्हटले जाते. हे उत्तर परदेशातील गुडा व बेहराईक या जिल्हयांच्या मध्यभागी स्थित आहे. सहेत मधे प्रसिद्ध प्राचीन 'जेतवन बौद्ध विहार' आहे. जेतवन विहार अनाथपिंडक श्रेष्ठी यांनी भगवान बुद्धास भेट दिला होता. जेतवन विहाराची जागा अनाथपिंडक श्रेष्ठी यांनी 'राजकुमार जेत' यांचे कडुन असंख्य स्वर्ण मुद्रा देऊन विकत घेतली होती. जेतवन विहाराच्या आंगणात एक स्तुप व विहीर आहे. प्राचीन काळातील

भिक्षुसंघासाठी २१ कक्ष आहेत. या ठिकाणी भगवान बुद्‌ध व भावी बुद्‌ध 'मैत्रेय' यांची रेखीव प्रतीमा आहे. जेतवन विहाराच्या उत्तरेस प्राचीन काळात निर्मित ८ स्तुपांचे अवशेष पहावयास मिळतात. येथे मिगार माता विशाखाने बांधलेला व भिक्खू संघाला दान दिलेला पुर्वाराम विहार आहे. येहते मुलगंध कुटी विहार आहे. तसेच अंगुलीमालाची गुंफा आहे. येथे जपान सरकारच्या मदतीने, भारत सरकार उत्खनन करीत आहे. येथे थायलंड, चीन व ब्रह्मदेशाची बुद्‌ध विहारे असून त्यांच्या धर्मशाळा मुक्कामाच्या दृष्टीने सोयीस्कर आहेत.

७) संकिस्सा :- उत्तर परदेशातील फरुखाबाद जिल्हयातील छोटेसे गाव हे 'संकिस्सा' नावाने ओळखले जाते. बुद्‌ध काळात या गावास 'सांकस्य' म्हणत असत. सम्राट अशोक यांनी भगवान बुद्‌धाच्या स्मरणार्थ या ठिकाणी स्मारक बनविले होते. याच ठिकाणी चीनी बौद्‌ध यात्री '#फा_हियान' यांनी अनेक बौद्‌ध स्तुप व विहार पाहिले होते. संकिस्सा येथे उत्खननात सापडलेल्या अनेक शिल्प साहित्य वस्तू लखनऊ व कलकत्ता येथील राज्य संग्रहात सुरक्षित ठेवल्या गेल्या आहे.

८) कौशांबी :- भगवान बुद्‌धाच्या जीवन काळात महत्वपूर्ण नगरांपैकी कौशांबी एक नगरी होती. कौशांबी वत्स राज्याची राजधानी सुद्‌धा होती. कौशांबी मधे भगवान बुद्‌धाचे अनेक वेळा आगमन झाले. याच ठिकाणी कुकुटाराम व पावारीकाराम आदी प्रसिद्‌ध विहार होते. प्रियदर्शी राजा सम्राट अशोक यांनी कौशांबी या ठिकाणी शिलालेख व अभिलेख कोरलेले आहेत.

९) वैशाली :- हे स्थळ बिहार राज्यात असून मुजफ्फरपूर जिल्हयात आहे. सध्या या ठिकाणाला बसाठ नावाने ओळखतात. हे ठिकाण पाटना पासुन्ब ६० किमी अंतरावर आहे. वैशाली या नगरीत बुद्‌ध धम्माशी संबंधित अनेक ऐतिहासिक स्तुपांचे भग्न अवशेष वर्तमान बसाढ नामक ठिकाणाजवळ अस्तित्वात आहे, जे स्थान मुजफ्फरपुर पासुन 20 मधील दुर दक्षिण-पश्चिमेस आहे. वैशाली सिद्‌धार्थ गौतम बुद्‌ध कालीन लिच्छवी गणराज्याची राजधानी होती. वैशाली आठ जनपदांचे अर्थात अट्ठकुल चे संयुक्त वज्जीगण संघाची राजधानी होती. वैशाली नगरीस जगातील प्रथम लोकशाही असलेली राजधानी असल्याचा सन्मान व गौरव मिळाला आहे. वैशालीच्या कुटागार शाळेत भगवान बुद्‌धांनी अनेक महत्त्वाचे उपदेश दिले आहेत. भगवान बुद्‌ध वैशाली मधील बहुपुत्रचैत्य, चापालचैत्य व महावन कुटागार शाळेत नेहमी राहत असतं. वैशाली मधे दुष्काळ पडला असताना भगवान गौतम बुद्‌धांनी रतन सुत्राचे पठन करून भिषण परिस्थिती मधे सुधारणा घडवून आणली होती. वैशाली मधेच बौद्‌ध भिक्षुनी संघाची स्थापना झाली होती. वैशाली मधे 8 फुट उंच व जवळ जवळ दीड किलोमीटर क्षेत्रातील परिसरामधील टेकडीस 'राजा विशाल गढ' यांची टेकडी म्हणतात. याच ठिकाणी वज्जीगण राज्य संघाचे सभागृह होते. याठिकाणी 770 सभासद एकत्र येऊन राज्य प्रशासन संदर्भात चर्चा करत असत. टेकडीपासुन जवळजवळ 3.5, किमी दुरवर उत्तर-पश्चिमेस देवांना प्रिय असलेला प्रियदर्शी राजा सम्राट अशोक यांनी बनविलेला अशोक स्तंभ आहे. या

स्तंभावर एकमुखी सिंहाची प्रतिमा विराजमान आहे. अशोक स्तंभाच्या दक्षिणेस प्राचीन तलाव आहे, जो आजकाल रामकुंड नावाने प्रसिद्ध आहे. या तलावाच्या काठी राजा सम्राट अशोक यांनी बुद्धधम्मावर प्रभावित होऊन बौद्ध स्तुप व स्तंभ बनविला आहे. राजा विशाल गढ या टेकडी पासुन हा स्तुप 2.5 किमी च्या अंतरावर आहे. या स्तुपांचा व्यास त्यावेळी 25 फुट होता, या स्तुपास प्राचीन काळी '#लिच्छवी_स्तुप' असे म्हटले जात होते. भगवान बुद्धांच्या महापरिनिर्वाणाच्या 100 वर्षानंतर भदंत सब्बकामी यांच्या अध्यक्षतेखाली वैशाली मधेच इसवी सन पुर्व 383 मधे द्वितीय धम्म संगिती झाली होती. प्रसिद्ध नर्तकी आम्रपालीचे निवासस्थान देखील वैशाली नगरीच हीती. आम्रपालीने तथागतास व भिक्षुसंघास 35 व्या वर्षावासादरम्यान भोजन दानासाठी आमंत्रित केले होते. वैशालीमधील अरहंत थेरी विमला ही दुषित जीवनाचा त्याग करून बुद्ध धम्म व संघास शरण आली होती. वैशाली मधील महावन कुटागार शाळेत भगवान बुद्धांनी घोषणा केली होती की आजपासून ठीक तीन महिन्यांनी बुद्ध महापरिनिर्वाणास प्राप्त होतील.

१०) कुशीनगर :- हे स्थळ उत्तरप्रदेशात असून गोरखपूर रेल्वे स्टेशनपासून ५० किमी अंतरावर आहे. उत्तर प्रदेश मधील देवरीया जिल्ह्यातील कसीया नामक छोट्या गावापासून जवळपास 3×5 किमी. दुरवर कुशीनगर आहे. याच ठिकाणी भगवान बुद्धाचे महापरिनिर्वाण झाले होते. भगवान बुद्ध हिरण्यवती नदीच्या पलीकडील तीरावर कुशीनाराच्या मल्लांच्या शालवनात यमक शाल वृक्षांच्या मधे ठेवलेल्या मंचकावर उत्तरेकडे डोके ठेवून, उजव्या कुशीवर पायावर पाय ठेवून, स्मृती संप्रजन्य राहुन, सिंहशय्या करुन झोपले होते. यानंतर भगवान बुद्धानी प्रथम ते चतुर्थ ध्यानाला प्राप्त करून आकाशन्यायतन, विज्ञानन्यायतन, अकिंचन्यायतन, व नैवसंज्ञायतन निरोध समाधीस प्राप्त करून तथागत बुद्ध महापरिनिर्वाणास प्राप्त झाले. भगवान बुद्धाच्या अस्तीधातु व भस्म यांना 8 हिस्स्यांमधे विभाजित करण्यात आले. मगधचा राजा आजातशत्रु, अल्लकप्पाचे वज्जी, राजगृह राज्याचे शाक्य, वैशाली राज्याचे लिच्छवी, कपीलवस्तु येथील शाक्य, रामग्रामचे कोलीय, वेठ- द्वीपचे ब्राह्मण, पावानगरीचे व कुशीनाराचे मल्ल यांनी भगवान बुद्धाच्या अस्तीं व भस्म यांवर स्तुप व विहार बांधले. कुशीनगर मधे 'महापरिनिर्वाण स्मारक स्तुप' बनविला गेला जो आजही बघावयास मिळतो. यामध्ये भगवान बुद्धाची महापरिनिर्वाण अवस्थेत सिंहशय्या करुन झोपलेली ६×१ मीटरची मुर्ती आहे. दक्षिणेस सातव्या शतकात निर्मित छोटे छोटे स्तुप आहेत. महापरिनिर्वाण स्तुप पासुन दक्षिणेस थोड्या अंतरावर भगवान बुद्धाची विशाल मुर्ती असलेले 'माथाकुवर' स्मारक आहे. माथाकुवरचा शोध अलेक्झांडर कनिंगहम यांनी लावला होता, त्यावेळी स्थानिक लोक यास माथाकुवर असे म्हणत असत. जनरल कनिंगहम यांच्या मते माथाकुवरचा अर्थ मृत किंवा मयत राजकुमार असा होतो. माथाकुवर स्मारकापासुन १.५ किमी. अंतरावर टेकडीप्रमाणे प्राचीन स्तुप आहे. या स्तुपाचा व्यास 37 मीटर आहे. याच ठिकाणी भगवान बुद्धाचा चंदनाच्या चितेवर अंत्यविधी करण्यात

आला होता, या स्तुपास '#रामाभार_स्तुप' असे म्हणतात. याच ठिकाणी भगवान बुद्धाच्या काळात 'मुकुट बंधन विहार' होता.

११) औरंगाबाद:-* या राज्यात औरंगाबद येथील अजिंठा लेणीवर विश्वविख्यात तीस प्राचीन बौद्ध गुंफाचा समूह आहे, अजिंठा बरोबरच एलोरा (वेरूळ) स्थळ युनेस्कोद्वारा मान्यताप्राप्त आहे, एलोरा (वेरूळ) येथे १३ बौद्ध कालीन गुंफा आहेत, याशिवाय डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शिक्षणाच्या प्रचारासाठी दिनांक १९ जून १९५० रोजी.. स्थापन केलेले मिलिंद महाविद्यालय आणि नागसेन वन प्रसिद्ध आहे.

१२) कार्ला:-* पुणे जिल्ह्यातील या लेणीमध्ये बौद्ध गुंफा असून भारतातील सर्वात मोठे चैत्यगृह आहे. कार्ले लेणी हा १६ बौद्ध लेण्यांचा गट असून त्यातील एक चैत्यगृह व इतर विहार आहेत. ही लेणी प्राचीन काळी 'वलुरक' नावाने ओळखली जात असे. बुद्धांच्या जीवनावर आधारलेल्या या दगडी गुंफा पुणे जिल्ह्यात मळवलीपासून (लोणावळा) ४-५ कि.मी. अंतरावर आहे. ६ किलोमीटर अंतरावर लोणावळ्यानजीक आहेत. येथील चैत्यगृहाचे स्थापत्य शिल्पे सुंदर आहेत. कार्ले गुंफा ह्या बोरघाटात स्थित आहेत. बोरघाट सातवाहन कालीन प्राचीन बंदरे कल्याण आणि सोपारा या ठिकाणांहून तेर या प्राचीन ठिकाणास जाण्याच्या मार्गावर आहे. इ.स.पू. १ ले शतक ते इ.स. ५ वे शतक या काळात ही लेणी खोदली गेलेली आहे. भारत सरकारने या लेणीला दिनांक २६ मे, इ.स. १९०९ रोजी महाराष्ट्रातील राष्ट्रीय संरक्षित स्मारक म्हणून घोषित केलेले आहे.[१] कार्ला गुंफांमध्ये कदाचित सर्वात जास्त मोठ्या संख्येने चैत्य सभागृह आहेत.

१३) नागपूर:-* हे ऐतिहासिक शहर असून महाराष्ट्राची उपराजधानी आहे, येथील दीक्षा भूमीवर डॉ: बाबासाहेब आंबेडकरांनी १४ आक्टो १९५६ रोजी अशोकाविजया दशमीच्या दिनी, महास्थविर भन्ते चंद्रमणी यांचेकडून प्रथम स्वतः बौद्ध धम्माची दीक्षा घेतली आणि नंतर आपल्या लाखो अनुयायांना दीक्षा दिली, येथील भव्य दीक्षाभूमी दर्सनीय आहे, नागपूर हे शहर दीक्षाभूमी म्हणून ओळखले जाते.

१४) राजगृह (मुंबई) :-* हे ठिकाण महाराष्ट्रातील मुंबई शहरात आहे. दादर पूर्व रेल्वे स्टेशनपासून १ किमी अंतरावर हिंदू कॉलनीमध्ये आहे. राजगृहात बाबासाहेबांचे भव्य ग्रंथालय आहे. येथेच माता रमाई यांचे दि. २७/०५/१९३५ तसेच भय्यासाहेबांचे १९/०९/१९७७ रोजी याच राजगृहात दुःखद निधन झाले. सध्या या राजगृहात बाबासाहेबांचे वंशज राहत आहेत.

१५) आंबेडकर भवन :- हे ठिकाण महाराष्ट्रातील मुंबई शहरात आहे. दादर पूर्व रेल्वे स्टेशनपासून अर्ध्या किमी अंतरावर आहे. बाबासाहेबांनी स्वतःच्या पैशांनी गोकुळदास पास्ता रोडवर जमीन विकत घेतली, तेथे भारत भूषण प्रिंटींग प्रेस सुरु केली. बाजूला त्यांनीच स्थापन केलेल्या शेड्युल्ड कास्ट इंप्रूव्हमेंट ट्रस्टच्या माध्यमातून भव्य इमारत बांधण्यात आली. त्या इमारतीला डॉ आंबेडकर भवन असे म्हणतात.
बाबासाहेबांच्या अनेक बैठका इथे झाल्या. भय्यासाहेबांनी याच प्रेसमधून बाबासाहेबांचे अनेक ग्रंथ प्रकाशित

केले. बाबासाहेबांनीच या प्रेसचे नामांतर "बुद्ध भूषण प्रिंटींग प्रेस" असे केले. याच प्रेसमधून जनता व प्रबुद्ध भारत या पाक्षिकांचे प्रकाशन होत असे. डॉ आंबेडकर भवनमध्येभारतीय बौद्ध महासभा, भारिप बहुजन महासंघ, रिपब्लिकन सेना व समतां सैनिक दलाचे कार्यालय असून इथे सतत धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, राजकीय चळवळीचे कार्यक्रम राबविले जातात. डॉ आंबेडकर भवन हे आंबेडकरी चळवळीचे केंद्र आहे म्हणून देशातला आंबेडकरी चळवळीचा प्रत्येक कार्यकर्ता येथे आवर्जून भेट देतो.

१६) सिद्धार्थ कॉलेज : - हे ठिकाण मुंबईच्या छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसपासून अर्धा किमी अंतरावर, हुतात्मा चौकात, फोर्ट येथे आहे. पीपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना बाबासाहेबांनी केली. या शिक्षण संस्थेच्या वतीने त्यांनी फोर्ट भागातील आंनद भवन हि इमारत विकत घेतली त्या इमारतीत कला, वाणिज्य, विज्ञान, कायदा इत्यादी विविध अभ्यास क्रमांसाठी सिद्धार्थ कॉलेज सुरु केले. पाठीमागे दुसरी इमारत घेऊन तिचे नाव बुद्धभवन ठेवले. वडाळ्याला विस्तीर्ण जागा घेऊन भव्य असे डॉ आंबडेकर कॉलेज काढले. तिथे विद्यार्थ्यांसाठी वस्तीगृह काढले. हि सर्व कॉलेजेस आजही विविध अभ्यासक्रमांच्या माध्यमातून लाखो विद्यार्थ्यांना ज्ञानदानाचे कुशल कर्म करीत आहेत.

१७) नालासोपारा : - हे ठिकाण महाराष्ट्रतील ठाणे जिल्ह्यात येते. या ठिकाणी जाण्यासाठी चर्चगेट ते विरार लोकल ट्रेनने जावे लागते. विरारच्या आधीचे स्टेशन नालासोपारा आहे. येथील प्राचीन बुद्ध विहार, भग्न अवस्थेत आहे. भगवान बुद्धांच्या काळात या नगरीला सुप्पारक नगरी असे म्हणत असत. हि नगरी बुद्धकालीन जंबूद्विपातील भव्य व्यापारी बंदर होते.

१८) कान्हेरी गुंफा :- हे ठिकाण महाराष्ट्रातील मुंबई शहरात आहे. येथे जाण्यासाठी पश्चिम रेल्वेच्या चर्चगेट ते विरार किंवा बोरीवली लोकलने बोरिवलीला उतरावे लागते. तेथे ९ किमी अंतरावर संजय गांधी राष्ट्रीय उद्यान जवळ कान्हेरी गुंफा आहेत. त्या फार प्राचीन काळाच्या बौद्ध गुंफा, स्तूप असून सध्या ते शिल्प, मुर्त्या, लेणी झिजण्यात येत आहेत. हि ऐतिहासिक वास्तुशिल्पांचे जतन करण्यासाठी सर्व बौद्धांनी वेळोवेळी पर्यटन काढून येथे भेट दिली पाहिजे.

१९) चवदार तळे-महाड :- हे ठिकाण महाराष्ट्रातील रायगड जिल्ह्यात आहे. मुंबई पासून हे ठिकाण १५० किमी अंतरावा आहे. या ठिकाणी चवदार तळे आहे. भव्य क्रांतीस्तंभ उभारलेला आहे. येथे शासनाने भव्य असे 'आंबडेकर भवन' निर्माण केले आहे. येथे डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी दि, २० मार्च १९२७ रोजी येथील चवदार ताळ्यावर सत्याग्रह केला, तेंव्हापासून या ठिकाणाला ऐतिहासिक महत्व प्राप्त झालेले आहे, याच ठिकाणी बाबासाहेबांनी मनुस्मृतीचे दहन केले.

२०) नाशिक :-* येथे सातवाहन राजाच्या काळातील त्रिरेशमी बुद्धलेणी प्रसिद्ध आहेत, या शिवाय जिल्ह्यातील त्रिंगलवाडी येथेही बुद्धलेणी आहेत, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी येथे १९३० साली काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रह केलेला आहे.

२१) पुणे :-* या जिल्ह्यातील देहूरोड या ठिकाणी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दि. २५ डिसेंबर १९५४ रोजी भारतात पहिल्या बुद्ध मूर्तीची प्रतिष्ठापना केली व महाबोधी विहाराचे उदघाटन करून त्यांनी येथूनच धम्मक्रांतीला सुरवात केली, पुणे शहरात सिम्बॉयसिस महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक असून येथे डॉ.माईसाहेब आंबेडकरांनी त्यांच्या दैनंदिन वापरातील बऱ्याचशा चिजवस्तूंचे जतन करून ठेवले आहे, हा अनमोल ठेवा सर्वांना बघण्यासाठी प्रदर्शित करून ठेवण्यात आलेला आहे, तळेगाव दाभाडे येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे निवास्थान (बंगला) आहे.

२२) भिमा-कोरेगांव :-* हे ठिकाण महाराष्ट्रातील पुणे जिल्ह्यात आहे. पुणे येथे पेशव्यांच्या सैन्याला नमवून विजयश्री प्राप्त करणाऱ्या १११ च्या *महार बटालियन* मधील शूर वीरांच्या स्मरणार्थ येथे भव्य क्रांतिस्तंभ उभारण्यात आलेला आहे, युगप्रवर्तक डॉ.बाबासाहेब आंबेडकर प्रतिवर्षी १ जानेवारी रोजी या विजयी क्रांतिस्तंभाला मांवनदना देण्यासाठी येथे येत असत, आणि चिंतन करून प्रेरणा घेत असत, म्हणूनच या ठिकाणी दरवर्षी १ जानेवारीस भिमा-कोरेगाव येथील क्रांतिस्तंभास मानवंदना देण्यासाठी धम्मबांधव मोठ्या संख्येने येत असतात.

२३) येवला :-* येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १३ ऑक्टोबर १९३५ रोजी धर्मांतराची घोषणा केली, तेंव्हापासून हे ठिकाण मुक्तीभूमी म्हणून ओळखले जाते. हे ठिकाण महाराष्ट्र राज्यातील नाशिक जिल्ह्यात आहे मुक्तीभूमी हे स्थळ येवला स्टेशनपासून अर्धा किमी अंतरावर आहे. तसेच हे ठिकाण नाशिक रोड स्टेशनपासून २७ किमी अंतरावर आहे. येथे भव्य क्रांतीस्तंभ उभारला असून दरवर्षी १३ ऑक्टोबरला भीम अनुयायी मानवंदना देण्यासाठी येत असतात.

२४) सेवाग्राम :-* वर्धा जिल्ह्यातील या ठिकाणी विश्वशांती स्तूप आहे.

२५) तक्षशीला :-* प्राचीन भारतातील एक प्रसिद्ध विद्यापीठ. तक्षशिला ही नगरी प्राचीन गांधार देशाची राजधानी होती. पूर्वी भारतात असलेले हे ठिकाण सध्या पाकिस्तानात रावळपिंडीपासून वायव्येस सु. ३५ किमी. अंतरावर आधुनिक सराईकल या रेल्वे स्थानकाजवळ आहे. भारतीय पुरातत्त्व विभागाचे प्रमुख संचालक सर जॉन मार्शल यांनी या भागात उत्खनन केले, परंतु प्राचीन विद्यापीठाचे असे फारसे अवशेष तेथे सापडले नाहीत. तक्षशिला नगरी व विद्यापीठ यांचे उल्लेख रामायण, महाभारत आणि जातकांत आढळतात. काही ग्रीक व चिनी परदेशी प्रवाशांनीही आपल्या प्रवासवृत्तांतात या विद्यापीठाचा उल्लेख केला आहे. कैकेयीपुत्र भरताने तक्षशिला नगर वसविले व त्याला तक्ष या आपल्या मुलाचे नाव दिले, असे मानले

जाते. इ. स. पू. आठव्या शतकापासून इ. स. चौथ्या शतकापर्यंत सु. १,२०० वर्षे हे विद्यापीठ अस्तित्वात होते. या कालखंडात त्या प्रदेशावर ग्रीक, इराणी, मौर्य, इंडो-बॅक्ट्रियन, सिथियन, कुशाण वगैरे अनेक राज्यकर्त्यांच्या राजकारणाचा, संस्कृतींचा आणि भाषांचा प्रभाव पडला व त्याचा परिणाम विद्यापीठातील भाषा आणि अभ्यासक्रम यांवरही झाला. इ. स. पाचव्या शतकात हूणांनी तक्षशिलेचा पूर्ण विध्वंस केला व तेव्हापासून हे विद्यापीठ बंद पडले. तक्षशिला विद्यापीठाची रचना ही आधुनिक विद्यापीठांप्रमाणे नव्हती. तेथे अनेक विद्यार्थी उच्च अध्ययनाकरिता भारतातील कोनाकोपऱ्यांतून व आशिया-यूरोपमधील देशांतूनही येत. प्रत्येक शिक्षक म्हणजे एक स्वतंत्र संस्थाच असे. त्याला त्याचे प्रौढ विद्यार्थी मदत करीत. एका शिक्षकाच्या हाताखाली सु. ५०० विद्यार्थी असत, असा उल्लेख जातकांत आहे. विद्यार्थ्यांच्या भोजन-निवासाची सोय विद्यापीठाच्या वसतिगृहात असे. सधन वर्गातील विद्यार्थी संपूर्ण शिक्षणाकरिता सामान्यतः एक हजार सुवर्णनाणी शुल्क म्हणून देत. निर्धन विद्यार्थी गुरूगृही राहून नेमलेली कामे दिवसा करीत आणि रात्री अध्ययन करीत. काही विद्यार्थी अध्ययन पूर्ण झाल्यानंतर पैसे मिळवून गुरुदक्षिणा देत. प्रवेशपरीक्षेनंतर १६-१७ वर्षे वयाचे विद्यार्थी घेतले जात. शिक्षणाचा कालावधी सामान्यपणे ७-८ वर्षांचा असे. इ. स. पू. सहाव्या शतकात या ठिकाणी बनारस, राजगृह, मिथीला, उज्जयिनी इ. नगरांतून व कुरू, कोसल इ. राज्यांतून विद्यार्थी येत. कोसलचा प्रसेनजीत राजा व जीवक राजपुत्र (बिंबीसारचा अनौरस पुत्र) यांनी येथेच शिक्षण घेतले. पाणिनी व कौटिल्य यांनीही येथेच विद्यार्जन केले, असे मानले जाते. अध्यापकांच्या श्रेणीत धौम्य ऋषी, आयुर्वेदाचार्य जीवक इत्यादींचे उल्लेख येतात. तक्षशिलेत फक्त उच्च शिक्षणाची व्यवस्था होती. सखोल अभ्यासावर भर दिला जाई. वैद्यक, धनुर्विद्या, वेदत्रयी, व्याकरण, तत्त्वज्ञान, वास्तुशास्त्र इ. प्रमुख विषय शिकविले जात. याशिवाय शल्यक्रिया, युद्धतंत्र, ज्योतिष, कृषिविज्ञान, फलज्योतिष, वाणिज्य, सांख्यिकी, विज्ञान, लेखाशास्त्र, संगीत, नृत्य, चित्रकला असे विषयही शिकविले जात. विद्यापीठात विद्यार्थ्यांना धर्मजातिकुलनिरपेक्ष प्रवेश असे. हजार-बाराशे वर्षांच्या कालखंडात ज्या ज्या राजवटींनी तक्षशिलेवर आधिराज्य केले, त्यांचा तेथील अभ्यासक्रमावर व भाषेवरही कमीअधिक परिणाम झाला. इराणी व ग्रीक संस्कृतींचे अनेक इतर विषय व संकल्पना शिक्षणक्रमात समाविष्ट झाल्या. ब्राम्ही लिपीऐवजी खरोष्ठी लिपीचा वापर अधिक होऊ लागला. ग्रीक तत्त्वज्ञान व भाषा याचाही अभ्यासक्रमात समावेश झाला असावा, असे ॲपोलोनिअसच्या वृत्तांतावरून दिसते. हजार-बाराशे वर्षे अव्याहत शिक्षणकार्य करीत असलेले हे आंतरराष्ट्रीय दर्जाचे एकमेव प्राचीन विद्यापीठ होते. तथापि इ. स. पाचव्या शतकात भारतात आलेला चिनी प्रवासी फाहियान याला तेथे शैक्षणिक दृष्ट्या काहीच महत्त्वाचे दिसले नाही, असे त्याच्या प्रवासवृत्तांतावरून दिसते.

२६) वलभी विद्यापीठ :- गुजरात राज्याच्या भावनगर जिल्ह्यातील वलभी येथील एक प्राचीन विद्यापीठ. हे विद्यापीठ इ.स. सातव्या शतकात स्थापन झाले. विद्यापीठाची स्थापना व संवर्धन यांचे श्रेय मैत्रक राजांना (४६५-७७५) दिले जाते. 'विद्येचे माहेरघर व आंतरराष्ट्रीय व्यापारबंदर' असा वलभीचा नावलौकिक

असल्याचा उल्लेख काश्मीरी पंडित सोमदेव याच्या कथासरित्सागरात व मैत्रककालीन ताम्रपटांत आढळतो. वलभी विद्यापीठात बौद्ध, जैन इ. धर्मांचे अध्यापन होत असे. पूर्व भारतातील नालंदा विद्यापीठाशी याचे साम्य असून त्या काळी त्याची कीर्ती दूरवर पसरली होती. जैन व बौद्ध आचार्यांनी येथे धर्मप्रसारार्थ विहार बांधले. त्या काळी जैन धर्मग्रंथ लिपिबद्ध नव्हते. जैन आचार्यांनी धर्मप्रसारार्थ त्यांचे सिद्धांत लिपिबद्ध केले. वलमी येथील जैन धर्मपरिषदेत (सु. ४५४) त्यांस मान्यताही लाभली (सु. ८४ ग्रंथ). ग्रामीण उत्पन्नातून अर्थसाहाय्य व विद्यापीठास लाभलेला राजाश्रय यांमुळे जैन धर्माचे शिक्षण उपलब्ध होऊ लागले. वलभी विद्यापीठात पाठनिर्देश व व्यावसायिक शिक्षण ह्यांना अध्यापन पद्धतीत विशेष महत्त्व होते. यांपैकी पहिल्याचा प्राथमिक शिक्षणासाठी, तर दुसऱ्याचा उच्च शिक्षणासाठी उपयोग केला जाई. विविध विषयांचे प्रात्यक्षिकही करून दाखविण्यात येत असे. कला, अध्यात्मविद्या, तर्कशास्त्र, वैद्यक इ. विषयांना अध्यापनात स्थान असे. धर्मशास्त्राव्यतिरिक्त वेदांगे, इतिहास, तत्त्वज्ञान, ज्योतिर्विद्या, भूगोल, अंकगणित, धातुविज्ञान, नीतिशास्त्र, व्रत, चिकित्साशास्त्र इत्यादींचे अध्यापन केले जाई. प्राकृत व संस्कृत हे अध्यापनाचे माध्यम असे. हे शिक्षण मोफत दिले जाई. ह्यूएन्त्संग ह्या चिनी प्रवाशाने आपल्या प्रवासवृत्तात नमूद केल्यानुसार वलभी विद्यापीठाशी संलग्न असलेल्या १०० बौद्ध धर्मीय विहारांत सु. ६,००० अनुयायी अध्ययन करीत होते. येथील कलासंस्था व विहारस्थाने ही अध्यापनाची प्रसिद्ध केंद्रे होती. कलासंस्थांत प्रा थमिक, माध्यमिक शिक्षणासोबत उपयुक्त कला, सैनिक प्रशिक्षण बौद्धिक व शास्त्रीय अध्यापन केले जात असे. विहारांत विद्वान भिक्षू निवास करून ज्ञानदान करीत. नालंदा विद्यापीठात अध्ययन केलेले स्थिरमती व गुणमती हे वसुबंधूचे शिष्य तसेच मयूरशर्मा (३४० - ७०) हा कदंब घराण्याचा संस्थापक येथे अध्यापनार्थ येऊन त्यांनी विहारांत निवास केल्याचा उल्लेख आहे. विहारांत श्रीमंत वा गरीब अशी तफावत केली जात नसे. समान संधीचा सर्वांना लाभ होई. विहारांतील विद्यार्थ्यांची साधी राहणी व उच्च विचारसरणी असून शांतता, शिस्त इ. सर्वसाधारण आचारनियम त्यांना पाळावे लागत. ग्रंथालयाचीही विहारांत सोय होती. ग्रंथखरेदी पहिला गुहसेन ह्या राजाने दिलेल्या अनुदानाच्या रकमेतून केली जाई. विहारांत अध्ययन पूर्ण केल्यावर विद्यार्थी राज दरबारी वर्णी लावून धर्मसिद्धांत, तत्त्वज्ञान यांवरील चर्चेद्वारे आपली योग्यता सिद्ध करीत व नंतर राजदरबारातील अधिकाऱ्याच्या नोकरीसाठी प्रयत्न करीत, असे इत्सिंग ह्या चिनी प्रवाशाने आपल्या प्रवासवृत्तात नमूद केलेले आढळते.

२७) विक्रमशिला विद्यापीठ :- बिहार राज्यातील एक प्राचीन बौद्ध विद्यापीठ. तिबेटी परंपरेनुसार मगधचा पालवंशी राजा धर्मपाल (कार. ७८०–८१५) याचा बौद्ध धर्माला राजाश्रय होता आणि त्याने विक्रमशिला विहाराची स्थापना केली. या विहाराला विक्रम नावाच्या यक्षाचे नाव देण्यात आले. या विहाराची पुढे प्रसिद्धी ‘विक्रमशिला विद्यापीठा’त परिणती झाली. धर्मपालाचे दुसरे नाव विक्रमशील असल्यामुळे या विद्यापीठाचे नाव विक्रमशीला ठेवण्यात आले. या विद्यापीठाच्या निश्चित स्थानाविषयी विद्वानांत

मतभेद संभवतात. तथापि ते प्राचीन मगध देशात गंगेच्या काठी एका टेकडीवर, प्रामुख्याने भालपुरजवळ, पाथरघाट टेकडीवर, वसले होते, असे आता निश्चित झाले आहे. फणींद्रणाथ बोस यांच्या मते ते भागलपूर परगाण्यात एका टेकडीवर असावे. नंदलाल डे आणि प्राच्याविद्यापंडित अ. स. अळतेकर, अंग राज्याची राजधानी असलेल्या चंपनगराच्या पूर्वेला ३८ किमी. दूर असलेले पाथरघाटनामक स्थान म्हणजेच विक्रमशिला असावे, या मताचे आहेत. या ठिकाणाला १८९१ साली बुचानन याने प्रथम भेट दिली. सतीशचंद्र विद्याभूषण यांनी मात्र सुलतानगंज (मागलपूर जिल्हा) हे स्थान म्हणजेच विक्रमशीला हे निश्चित केले आहे. पाटणा विद्यापीठाच्या प्राचीन इतिहास व संस्कृती या विभागाने १९६० ते ६९ मध्ये बिहारमधील भागलपूर जिल्ह्यातील अँटिकच येथे उत्खनन केले. भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण खात्यानेही १९७२-७३ पासून येथे मोठ्या प्रमाणावर उत्खनन करून विक्रमशीला विद्यापीठाचे अवशेष शोधून काढले. तेथील भव्य मठ, पाषाणाच्या बुद्धप्रतिमा, मोहोरा, स्तूप आणि भव्य जलाशये त्या काळाची ग्वाही देतात. धर्मपाल राजाने महाविहार बांधून बौद्ध धर्माच्या ४ प्रमुख पंथांचे प्रत्येकी २७ असे एकशेआठ अध्यापक चार विभागांत नेमले आणि महाविहारास देणग्या दिल्या. नंतरच्या पाल राजांनीही विद्यापीठास उदारपणाने आर्थिक साहाय्य केले. इतर धनिकांनीही त्यास देणग्या दिल्या. महाविहारासभोवती तटबंदी असून चार दिशांना महाद्वारे होती. प्रत्येक प्रवेशद्वारावर एक प्रवेशपरिक्षागृह होते. राजा देवपाल याने (कार. ८१५–८५५) आणखी दोन प्रवेशपरिक्षागृहे बांधली. या प्रत्येक द्वारावर विद्वान पंडिताची नेमणूक केलेली होती. रत्नाकरशांती, वागीश्वरकीर्ती, भट्टारक नरोत्पल, प्रज्ञाकरमती, रत्नवज्र, ज्ञानश्रीमित्र हे यांपैकी काही विद्वान पंडित होते. हे सहा विहारांचे प्रमुख आचार्य होते. या आचार्यांपैकी काही विख्यात नैयायिक होते. विहाराच्या मध्यभागी महाबोधीची कलाकृती असलेले देवालय व अन्य १०८ देवालये होती. केंद्रस्थानी असलेल्या विहारास 'विज्ञानगृह' म्हणत. यांशिवाय येथे एक विशाल सभाभवन होते. त्यात एका वेळी आठ हजार व्यक्तींची बसण्याची सोय होती. प्रवेशद्वारात उजव्या बाजूस नालंदा विद्यापीठाचे प्रमुख आचार्य नागार्जुनाचे चित्र होते, तर डाव्या बाजूस याच विद्यापीठाचे प्रमुख ⇨अतीश दीपंकराचे चित्र होते. विद्यापीठाचे मुख्य प्रवेशद्वार बंद झाल्यावर येणाऱ्यांसाठी या प्रवेशद्वाराबाहेर एक धर्मशाळा होती. विद्यार्थ्यांची येथे विनामुल्य निवासभोजनाची व्यवस्था असे. विद्यापीठात परदेशांतून तसेच भारतातील विविध भागांतून अध्ययनासाठी विद्यार्थी येत. द्वारस्थ आचार्यांकडून परीक्षेत उत्तीर्ण झाल्यानंतरच त्यांना प्रवेश मिळे. तिबेटी भिक्षू येथे अध्ययन करून संस्कृत ग्रंथांचा तिबेटी भाषेत अनुवाद करीत. विद्यापीठीय परीक्षा उत्तीर्ण होणाऱ्यांस पंडीत, महापंडित इ. पदव्या राजदरबारात देण्यात येत व अशा पंडितांना 'राजपंडित' हे बिरूद मिळे. अशा प्रख्यात राजपंडितांमध्ये आचार्य रत्नकीर्ती, जेतारी, ज्ञानश्रीमित्र, अतीश दीपंकर, रत्नवज्र, वागीश्वरकीर्ती इत्यादींचा अंतर्भाव होता. येथील ग्रंथालय समृद्ध होते. बौद्ध धर्मातील विविध संप्रदाय, वेद, अध्यात्मविद्या, व्याकरण, न्यायशास्त्र इ. विषयांचे येथे अध्यापन होई. तंत्रमार्गाच्या अध्यापनावर, विशेषतः वज्रयान व सहजयान यांवर, येथे विशेषभर होता. कारण इ. स. दहाव्या-अकराव्या

शतकांत तंत्रमार्ग आणि तांत्रिक साधना हे बौद्ध धर्माचे प्रमुख अंग बनले होते. शिवाय न्यायशास्त्रातही ते प्रावीण होते. विद्यापीठाचे प्रशासन महाधिपतींकडे असून त्यांच्या मदतीला सहा आचार्यांचे मंडळ असे. काही काळ नालंदा विद्यापीठाचा कारभारही या मंडळाच्या नियंत्रणाखाली होता. तेथील प्रशासन उत्कृष्ट होते. ह्यूएनत्संग (सु. ६०२-६६४) व इत्सिंग (सू. ६३४–७१३) ह्या चिनी प्रवाशांच्या वृत्तांतून या विद्यापीठाचे कार्य व प्रगती यांबाबत माहिती मिळते. खल्जी घराण्यातील महम्मद बिन बख्तियार याने बाराव्या शतकाच्या अखेरीस बिहारवर स्वाऱ्या केल्या, पाल राजा गोविंद याचा पराभव करून त्याची राजधानी ओदंतपुरी ही जिंकून घेतली. विक्रमशिला विहाराभोवतालच्या भिंती बख्तियारला किल्ल्याचा तट वाटल्यामुळे त्यांवर हल्ला करून त्याने संपूर्ण ग्रंथालय जाळले व तेथील ब्राह्मणांना व भिक्षूंना कंठस्नान घातले (११९२). तसेच त्याने विक्रमशिला आणि नालंदा या विद्यापीठांचा विध्वंस केला.

२८) रत्नागिरी:-* या जिल्ह्यातील तालुका मंडणगड मध्ये आलेले *"आंबवडे"* गाव हे मंडणगडपासून १८ किमी अंतरावर आहे. डॉ.बाबासाहेबांचे मूळ गाव आहे. रामजी मालोजी सकपाळ यांच्या या मुळगावी त्यांच्या अस्थीवर स्मारक बांधण्यात आले आहे. बाबांसाहेबांचे मुळगाव “स्फुर्तीभूमी’ म्हणून सर्वजण ओळखतात.

२९) वणंद :- हे ठिकाण महाराष्ट्रातील रत्नागिरी जिल्ह्यात असून दापोली तालुक्यात आहे. दापोली पासून ६ किमी अंतरावर आहे. या गावी भिकू धोत्रे आणि रुक्मिणीबाई धोत्रे या उभयंताच्या पोटी माता रमाईचा जन्म झाला. *"वनंद"* येथे त्यागमुर्ती-रमाई यांचे भव्य स्मारक बांधण्यात आले आहे. ज्या बंदरावर रमाईचे आई-वडील तिच्या बालपणी काम करीत असत ते हरणे बंदर वणंद गावापासून ८ किमी अंतरावर आहे.

३०) महू (इंदोर):-* हे नाव इंग्रजी आद्याक्षरे MHOW यांच्यावरून पडले. या आद्याक्षरांचा फुल फॉर्म “मिलिटरी हेडक्वार्टर ऑफ वारीयर्स” म्हणजे युद्ध करणाऱ्या सैनिकांचे मुख्यालय’ असा अर्थ आहे. हे महुगाव मध्यप्रदेशातील इंदौर पासून २० किमी अंतरावर आहे. डॉ बाबासाहेब भीमराव आंबेडकर यांचे वडील रामजी मालोजी सकपाळ हे इंग्रजांच्या सैन्यामध्ये सुभेदार या पदावर होते. त्यांची कंपनी १८९१ साली महू येथील मिलिटरी छावणीमध्ये वास्तव्यास होती. याच ठिकाणी माता भिमाईच्या पोटी १४ एप्रिल १८९१ रोजी *विश्वपीता- डॉ.बाबासाहेब आंबेडकर* यांचा जन्म झाला, म्हणून हे स्थळ आपल्यासाठी अत्यंत महत्त्वपुर्ण व पवित्र आहे. या ठिकाणाला डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची जन्मभूमी असे जगभर म्हणतात. येथे डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे भव्य स्मारक बांधण्यात आले आहे. १४ एप्रिल रोजी दरवर्षी लाखो भीम अनुयायी या ठिकाणी आदरांजली अर्पण करण्यासाठी येतात. म्हणून या शहराचे व महू रेल्वे स्टेशनचे नामकरण सरकारच्या वतीने “डॉ आंबेडकर नगर” करण्यात आले आहे हे ठिकाण गंभीरा नदीच्या तीरावर आहे.

३१) मारहुत :-* सतना जिल्ह्यातील हे एक ऐतिहासिक ठिकाण असून येथे प्राचीन बौद्ध विहारांचे अवशेष आहेत.

३२) सांची :- हे ठिकाण मध्यप्रदेशातील भोपाळपासून ६० किमी अंतरावर आहे. येथे सांची रेल्वे स्टेशन आहे. सांची हे ठिकाण जिल्हा विदिशा या शहरापासून २२ किमी अंतरावर आहे. येथील भव्य स्तूप व अशोकस्तंभ प्रसिद्ध दर्शनीय आहेत, बौद्ध कालीन स्थापत्य कलेचे अनेक नमुने येथे पहावयास मिळतात, येथील एका स्तूपाचा व्यास १०० फुटाचा असून त्याच्या चारही बाजूला चार भव्य कमानी आहेत, या कामानींवर भगवान बुद्धांच्या जीवनातील अनेक प्रसंग कोरून ठेवलेले आहेत, याशिवाय येथे संघसेनापती सारीपुत्र आणि महामोगल्लायन यांच्या अस्थींवर चैत्यस्तुप बांधलेले आहेत, तसेच येथे अनेक लहानमोठे स्तूप आहेत.

३३) आलवी गोम्पा :-* हे स्थळ लेह जिल्ह्यात असून सुंदर शिल्पकला आणि अनोखी शिल्पकला यासाठी विख्यात आहे, लेह येथे विश्वशांती स्तूप असून प्राचीन बुद्ध मठ आहे,

३४) कारगिल :-* येथे दगडी चट्टानावर निर्मित भगवान बुद्धाची विशाल मूर्ती आहे, तसेच लडाख येथे सर्वात मोठा प्राचीन मठ आहे. या राज्यात त्रिलोकनाथ हे बौद्ध स्थळ आहे, तसेच हे ठिकाण दलाईलामा यांचे मुख्यालय असून येथे अनेक धर्मशाळा आहेत, लालूद जिल्ह्यातील ताबो येथे स्पिती नदीकाठी *प्राचीन बौद्ध धम्म स्थळ* आहे, येथील भिंतीवर बुद्धांची अलंकृत असलेली रंगीत चित्रे आहेत, व ही चित्रे अजंठा येथील चित्रांशी मिळती जुळती आहेत.

३५) नागार्जुनकोंडा :-* (कोंडा म्हणजे पहाड) गुंटूर जिल्ह्यातील हे ठिकाण हैद्राबाद पासून १६० कि, मि, अंतरावर आहे, मच्छेला रेल्वे स्टेशनवर उतरून येथे जाता येते, सातवाहन राजा गौतमीपुत्र सातकर्णी याने आचार्य नागार्जुन यांच्यासाठी पहाडामध्ये लेणी कोरलेली आहे, या ठिकाणी एकूण ३० बौद्ध लेणी असून येथील महाचैत्य व प्राचीन वस्तूंचे संग्रहालय प्रसिद्ध आहे.

३६) हैद्राबाद हे शहर आंध्र प्रदेशची राजधानी असून येथील हुसनेसागर जलाशयात भगवान बुद्धांची विशाल मूर्ती बसविण्यात आली आहे.

३७) नालंदा :- हे स्थळ बिहार राज्यातील राजगिरपासून १६ किमी अंतरावर आहे. सध्या ते भग्न अवस्थे पहावयास मिळते. इसवी सन ४१५ ते ४५५ या काळातील राज कुमार गुप्त यांनी नालंदा विद्यापीठाची स्थापना केली होती. नालंदा विद्यापीठात ६ गगनचुंबी इमारती होत्या. या विश्वविद्यापिठाला सम्राट हर्षवर्धनाने अफाट असे धन दान केले होते. यामध्ये १५१० अध्यापक शिकवत होते आणि १०,००० विद्यार्थी शिकत होते. नालंदा जवळील बडगावमध्ये सारीपुत्राचा जन्म झाला होता. या

विश्वविद्यापिठामध्ये २ लाख पुस्तके होती. या विद्यापीठात प्रमुख आचार्य शीलभद्र, शांतीशील, कमलशील, दीपंकर आणि श्रीज्ञान अशा महान विद्वान व्यक्ती विद्यार्थ्यांना शिकवत असत. या विश्वविद्यापिठातून पंडित कमलशील आणि पद्म संभवने यांनी महायान पंथांचे बौद्ध ज्ञान तिबेटपर्यंत पोहचविले. त्यामुळे तिबेटमध्ये बौद्ध धर्म हा राष्ट्रीय धर्म झाला आहे. हे विद्यापीठ बख्तियार खिलजीने जाळले. ते सतत ६ महिने जळत होते. जगातील प्राचीन अशा नालंदा बौद्ध विश्वविद्यापिठाची भग्न अवशेष बडगाव या गावाजवळ आहेत. तेथे उत्खनन सुरु आहे. सध्या नालंदा नावाचे गावं नाही, मात्र नालंदा म्हणून जिल्हा आहे. विदेशी प्रवाशांनी येथील वर्णने जगभर पसरवली आहेत.

३८) चिंचोली :- नागपूर पासून ११ किमी अंतरावर काटोल रोडवर चिंचोली येथे दोर बाबासाहेब आंबेडकर यांचे भव्य वस्तुसंग्रहालय आहे. त्याला शांतीवन असे म्हणतात. डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे विश्वासू सहकारी वामनराव गोडबोले यांनी संग्रहित केलेल्या व जतन केलेल्या ऐतिहासिक अशा डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या अनेक अनमोल वस्तू या संग्रहालयात पहावयास मिळतात. अनेक टाय, शर्त कोट, टाईपरायटर, बेल्ट, काठी इत्यादी वस्तू येथे पहावयास मिळतात. वकिलांचा “ब्यंड” गळ्यातील पांढरी टाय, असे अनेक प्रेरणादायी वस्तूंचे संग्रहालय बघून अनेक अनुयायी उर्जा घेऊन या शांतीवनातून मोठ्या संख्येने रोज जातात.

३९) अजिंठा-वेरूळ :- हे ठिकाण महाराष्ट्र राज्यातील ओरंगाबाद जिल्हयात आहे. अजिंठा हे ठिकाण ओरंगाबाद पासून १२५ किमी अंतरावर आहे आणि वेरूळ हे ठिकाण ओरंगाबाद पासून ३० किमी अंतरावर आहे. या दोन्ही ठिकाणी जगप्रसिद्ध बौद्ध लेण्या आणि गुंफा आहेत, याठिकाणी भगवान बुद्धांचे जीवन चरित्र अनेक रंगात आणि शिल्पात कोरलेले आहे. देशभरातील तसेच जगभरातील पर्यटक मोठ्या संख्येने ह्या प्राचीन शिल्पकलाद्वारे भगवान बुद्धांचे जीवन चरित्र डोळ्यात साठवून घेण्यासाठी आवर्जून येत असतात.

४०) ओरंगाबाद :- डॉ बाबसाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद हे ठिकाण महाराष्ट्र राज्यात असून औरंगाबाद रेल्वे स्टेशन पासून ५ किमी अंतरावर आहे. डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी शिक्षण प्रसाराचा एक भाग म्हणून मराठवाड्यातील या औरंगाबाद शहरात विस्तीर्ण अशा नागसेन वनांत विविध विषयांसाठी अनेक भव्य इमारती बांधून मिलिंद कॉलेज पीपल्स एज्युकेशन सोसायटी च्या वतीने सुरु केले. या महाविद्यालयातून राजा मिलिंदासारखे बुद्धिमान विद्यार्थी व नागसेन भंतेजी सारखे विद्वान विद्यार्थी घडावेत, अशी बाबासाहेबांची संकल्पना होती. त्यानुसार इथून हजारो विद्यार्थी देशाच्या कानाकोपऱ्यातून येऊन शिक्षण घेऊन जगभर पोहचले आहेत. त्यांच्या महान ज्ञानदानाचे मोल जाऊन मराठवाडा विद्यापीठाचे दोर बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ असे नामांतर करण्यात आले आहे. येथे डॉ

बाबासाहेब आंबेडकर लॉ कॉलेज, टेक्निकल कॉलेज असे अनेक विषयांचे विविध कॉलेज आहेत. येथे भव्य बुद्धिस्ट सेंटर आहे.

४१) चैत्यभूमी :- हे ठिकाण महाराष्ट्रातील मुंबई शहरात आहे. दादर पश्चिम रेल्वे स्टेशनपासून २ किमी अंतरावर असून ते अरबी समुद्राच्या किनार्यावर आहे. डॉ बाबासाहेब आंबेडकर याचं महापरिनिर्वाण दिल्ली येथे झाले त्यांचा अंतिम संस्कार या ठिकाणी करण्यात आला. त्यावेळी डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे अंतिम दर्शन घेण्यासाठी जमलेल्या लाखो लोकांना बौद्ध धम्माची दीक्षा देण्यात आली. त्याच जागेवर भव्य स्तुपाची निर्मिती डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे सुपुत्र भय्यासाहेब यांनी केली. या चैत्यस्तुपात बाबासाहेबांची पवित्र अस्थी ठेवण्यात आल्या आहेत.

४२) देहुरोड :- देहूरोड (किंवा देहू रोड) हे पुण्याच्या वायव्येला असलेले पुणे स्टेशनपासून २७ किलोमीटर अंतरावरील लष्कराचे ठाणे आहे. या ठिकाणी २५ डिसेंबर इ.स. १९५४ साली डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी धर्मांतर करण्यापूर्वी पहिली बौद्ध मूर्ती वसवली. म्हणून या ठिकाणाची ओळख धम्मभूमी म्हणून आहे.

४३) बेडसे लेणी :- ह्या महाराष्ट्राच्या पुणे जिल्ह्याच्या मावळ तालुक्यातील बेडसे गावातील आहेत. पुणे-मुंबई महामार्गावरील कामशेतहून पवना धरणाकडे जातांना हे गाव लागते. भारत सरकारने या लेणीला दिनांक २६ मे, इ.स. १९०९ रोजी महाराष्ट्रातील राष्ट्रीय संरक्षित स्मारक म्हणून घोषित केलेले आहे. सुमारे १५० मीटर लांबीच्या दगडात लेण्यांचा गट खोदला गेला आहे. येथे एक चैत्यगृह काही विहार, खोदीव स्तूप, आणि पाण्याची कुंडे आहेत. हे आद्य कोरीव काम इसवीसन पूर्व पहिल्या शतकातील आहे असे मानले जाते. या लेण्यांना मारकूड असे नाव प्राचीनकाळी होते असे येथील शिलालेखात कोरलेले दिसते.

पंचशील ध्वज

निळा, पिवळा, लाल, पांढरा, केशरी या पाच रंगाच्या उभ्या आडव्या पट्ट्या ने बनलेल्या झेंड्याला बौद्धांचा ध्वज म्हणतात. जो पंचशील झेंडा या स्वरुपात लोकप्रिय आहे.

या झेंड्याची सुद्धा स्वतःची एक कथा आहे. *थिओसोफिकल सोसायटीचे संस्थापक कर्नल हेनरी स्टील ऑलकॉट आणि मॅडम ब्लावतस्की होते. हेनरी, अमेरीकन सैन्यातील सेवानिवृत्त कर्नल होते. थिओसोफिकल सोसायटी कोणत्याही एका धर्माला किंवा संप्रदायाला पोसणारी संस्था नव्हती. परंतु ती सर्व धर्म आणि पंथाच्या मूल्यांच्या समन्वायाचे स्त्रोत होती. म्हणूनच या संस्थेत पूर्वग्रह न ठेवता सर्व धार्मिक विचार प्रवाहांचा अभ्यास केला गेला, संशोधन केले गेले आणि त्यानुसार अनुसरण केले. अभ्यास व सराव करतांना कर्नल हेनरी बुद्धांच्या धम्माकडे आकर्षित होत गेले आणि शेवटी १८८० या वर्षी श्रीलंकेमध्ये त्यांनी बुद्ध धम्म आत्मसात केला आणि श्रीलंकेत बौद्ध

धम्माच्या प्रगतीसाठी अर्थात उपक्रमात सक्रिय सहभाग सुरु केला. तेथे त्यांनी ५०० च्या जवळपास बौद्ध विद्यालय व महाविद्यालयांची स्थापना केली. त्यामधील काही बरेच प्रसिद्ध झाले आनंद, नालंदा, महिंद्र, ही त्यांनी स्थापलेल्या शाळांची नावे आहेत.*_

त्यांच्या शांतता लोकशाही चळवळीद्वारे श्रीलंकेतील बौद्धांना १८८४ साली एक मोठे यश मिळाले. यश हे होते की, *ब्रिटिश सरकारने वेसाक डे म्हणजेच बुद्ध पौर्णिमा, सार्वजनिक सुट्टी म्हणून जाहीर केलि. जे, १८८५ पासून लागू करण्यात आले.* या यशानंतर *श्रीलंकेच्या बौद्धांनी "कोलंबो समिती" नावाची एक संस्था स्थापन केली.* यामध्ये कर्नल हेनरी हे सुद्धा सदस्य होते. या समितीचा एक प्रस्ताव होता की, *बौद्धांचा एक ध्वज असावा.* हा ध्वज अभिमानाचे प्रतीक असेल. असे म्हणतात की, हा प्रस्ताव कर्नल हेनरी यांनी दिला होता आणि त्या प्रस्तावाला संपूर्ण समितिचा होकार होता. असे निश्चित झाले की, येणाऱ्या पौर्णिमेला २८ मे १८८५ रोजी धम्मध्वज फडकवला जाणार अशा प्रकारे कोलंबो समितीकडून तय्यार केलेला हा ध्वज अस्तित्वात आला. *आज त्याला पंचशील ध्वज म्हणतात.*

बुद्ध पौर्णिमेला हा फडकवण्यापूर्वी २० एप्रिल १९८५ रोजी कोलंबो समितीकडून या ध्वजाला सार्वजनिक स्वरूप आणि सर्वांची व संमती मिळाली होती. हा ध्वज श्रीलंकेमध्ये कोटाईना देखील दीपदुपरस्या बुद्ध विहारात, १८८५ ला २८ मे रोजी पहिल्यांदा पूजनीय विद्र मिगतुक्त गुणानन्द देर यांच्या कडून मोठ्या जनसमुदाया समोर फडकवला गेला.

त्यानंतर कर्नल हेनरी स्टील ऑलिकॉट यांच्या सल्ल्यानुसार या ध्वजाचा आकार राष्ट्रध्वजाच्या आकाराप्रमाणे निश्चित करण्यात आल यात बरेच बदल केले गेले. शेवटी त्याला अंतिम स्वरूप देण्यात आले. येत्या वर्षात १८८६ मध्ये बुद्ध पौर्णिमेच्या दिवशी फडकला गेला. आजच्या तारखे पर्यंत हा ध्वज एकसारखाच आहे. व संपूर्ण जगातील बौद्रांच्या अस्मितेची ओळख व अभिमानाचे प्रतीक आहे.

या ध्वजाला जागतिक मान्यता देण्याचीही एक कथा आहे. _याचे मुख्य श्रेय प्रो. जी. पी. मलालसेकर यांना जाते, त्यांच्या अध्यक्षतेखाली आणि पुढाकाराने कोलंबो मध्ये श्रीलंकेत प्रथम जागतिक बौद्ध फेलोशिप आयोजित करण्यात आली होती. २५ मे, १९५० ला, दाढ़ा बातु बौद्ध विहाराच्या सभागृहात या विहारात भगवंताच्या पवित्र दंत धातु प्रतिष्ठापित आहेत._

पूजनीय भन्ते गलगेदर प्रज्ञानंदाचे मत आहे की, *प्रो. जी. मलालसेकर हे मुळचे श्रीलंकेचे होते. ते बहुभाषिक म्हणून प्रसिद्ध होते. सिंहली, पालि, संस्कृत, इंग्रजी, लॅटिन, ग्रीक, फ्रांसीसी या भाषांमध्ये त्यांनी प्रकांड पांडित्य अवगत केले होते. ते जागतिक बौद्ध फेलोशिप या संस्थेचे संस्थापक अध्यक्ष होते. ते बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रती खूप प्रभावित होते. त्यांनी बाबासाहेबांना २५ मे, १९५० ला आयोजित केलेल्या जागतिक बौद्ध फेलोशिप या परिषदेचे कोलंबो मध्ये येणाऱ्या बुद्ध पोर्णिमेसाठी उपस्थित राहण्याचे निमंत्रण दिले.*

_२५ मे, १९५० ला श्रीलंकेतील या कार्यक्रमात जगातील सर्व बौद्ध संघाच्या समोर प्रो. डॉ. जी. पी. मलालसेकर यांनी बाबासाहेबांना “लिविंग बोधिसत्व" म्हणून हाक मारली. एक जिवंत बोधिसत्व.._

*प्रो. गुणपाल पियासेन (जी.पी.) मलालसेकर बुद्धिस्ट विश्वकोशाचे प्रमुख संपादक होते. या व्यतिरिक्त "पालि सिंहली-इंग्रजी शब्दकोश" तसेच "गुणपाल सिंहली इंग्रजी शब्दकोश" हे त्यांचे अभिजात ग्रंथ आहेत. प्रो. डॉ. जी. पी. मलालसेकर, यांना हे श्रेय जाते, कारण २५ मे, १९५० रोजी. जागतिक बौद्ध फेलोशिप मध्ये सर्व जगातील बौद्ध संघासमोर, ज्यामध्ये बाबासाहेब आंबेडकर उपस्थित होते. जपान चे झेन विद्वान डॉ.डी.टी.सुजुकी यांची ही उपस्थिती होती, त्यांनी सर्व बौद्ध जगताकडुन त्या बौद्ध ध्वजाला स्विकारण्याचा प्रस्ताव ठेवला. जो सर्वांनी साधुवाद देऊन स्विकारला असे म्हणू शकतो की, भारताच्या राष्ट्रीय झेंड्या मध्ये अशोक चक्राचा समावेश करून त्याला बौद्ध स्वरूप देण्याचे श्रेय बाबासाहेबांना आहे आणि धम्म ध्वजाला जागतिक मान्यता दिल्याच्या घटनेत सुद्धा त्यांची उपस्थिती आहे. अधिकृतपणे या ध्वजाला आंतरराष्ट्रीय बौद्ध ध्वजाची मान्यता १९५२ मध्ये जागतिक बुद्धिस्ट काँग्रेसमध्ये मिळाली.*

या धम्मध्वजात पाच रंगाच्या उभ्या पट्टया आहेत म्हणून लोक याला पंचशील ध्वज म्हणतात, वस्तूतः यात पाच पट्टया नसून, सहा पट्टया आहेत. सहावी उभी पट्टी ज्यामध्ये पाचही रंगांचा समावेश आहे. याला पंचशील ध्वज म्हणणे, या गोष्टीकडे लक्ष वेधतो की, बौद्ध लोक पंचशीलाला किती महत्व देतात, जर संख्या भाषेत सांगायचे झाले तर, याला पंचशील न म्हणता, सहा रंगांचा झेंडा म्हणणे जास्त फायदेशीर ठरेल परंतु धम्म ध्वजाच्या स्वरुपात याला जागतिक मान्यता तसेच स्विकारलेले आहे. *बोलतांना पंचशील किवा सहा रंगांचा झेंडा म्हणून उपयोग करु शकतो, परंतु धम्मध्वज किंवा बुद्धिस्ट फ्लॅग है सार्वत्रिक नाव आहे.*

_धम्मध्वजाच्या रंगांचा अर्थ पुढील प्रमाणे, बौद्ध ग्रंथांमध्ये असा उल्लेख सापडतो की, *भगवान बुद्धांच्या शरीरातून सहा रंगांचा प्रकाश परावर्तित होत होता. निळा, पिवळा, लाल, पांढरा, केशरी आणि सहा रंगांचा मिश्रण असलेला एक रंग ज्याला प्रभास्वर म्हणतात.* हे सहा रंग बुद्धत्व आणि धम्माच्या पूर्णत्वाचे प्रतीक, प्रतिकात्मक लक्षण आहे. बौद्धांना आठवण ठेवण्याकरीता, स्मरणपत्रासारखे आहेत. या झेंड्याचा सहा रंगांचा अर्थ खालील प्रमाणे.....

निळा: असे म्हणतात की, निळ्या रंगांचा प्रकाश, भगवान बुद्धांच्या डोक्याच्या चारही बाजूला प्रकाशत होता. जो प्राणीमात्रां करिता त्याच्या अखंड करुणेचे प्रतीक होय. या प्रकारे निळा रंग मैत्री, करुणा व शांतीचे प्रतीक होय. आकाश आणि समुद्राचा निळा रंग व्यापकतेचा संदेश देतो. व्यापकता दर्शवतो.

पिवळा: पिवळा रंगाची आभा, प्रकाश भगवान बुद्धांच्या जवळ दिसतो. पिवळा रंग अनुपस्थिती, आणि शून्यता यांचे प्रतीक आहे मध्यम मार्ग म्हणजे टोकाच्या पलीकडे जाणारा ते मधला रस्ता. लाल लाल रंग बुद्धांच्या त्वचेच्या

रंगाचा प्रकाश हा रंग धम्माच्या अभ्यासाच्या जिवंतपणाचे व मांगल्याचे प्रतीक होय. हा समजूतदारपणा, सौभाग्य, सद्‌गुण व कर्तृत्वाचे लक्षण आहे.

पांढरा किंवा सफेदः बुद्‌धांचे दात, नखे, अस्थी धातूपासून पांढरा रंग प्रसारीत होतो. हा रंग शुद्‌धतेचे व पावित्र्याचे प्रतीक आहे. बुद्‌धांच्या शिकवणुकीचे प्रतीक आहे. अकालिकता, म्हणजे बुद्‌धांची शिकवण वेळेनुसार कालातीत होत नाही उलट नवनवीन होत राहते. ते काल जेवढे सत्य होते, तेवढेच आज सुद्‌धा आहे, व पुढे सुद्‌धा राहणार.

कासाय, केशरी: बुद्‌धांच्या हातात, पायांच्या टाचांमध्ये, ओठांवर, केशरी रंगांचा प्रकाश चमकतो. हा रंग बुद्‌धांच्या निरंतर शहाणपणाचे प्रतिक आहे. हा रंग वीर्य, मान व सन्मान, उत्साह दर्शवतो.

पाचही रंगांचा एकत्रित प्रकाश म्हणजेच पाच रंगांची मिश्रित प्रभा म्हणजेच प्रभास्वर. बुद्‌धांच्या देशनांची, शिकवणूकीची विविधतेचे, क्षमतेचे प्रतीक होय. ही मिश्रित प्रभा, प्रकाश दाखवतो की बुद्‌धांची शिकवण जाती, संप्रदाय, राष्ट्रीयत्व, भेदभावाच्या पलीकडे केवळ मानवप्राण्यांसाठीच नाही तर प्राणीमांत्रांना सुद्‌धा आहे.

या प्रकारे हा झेंडा ध्वज मानवांच्या मूल्यांचे एक सार्वत्रिक चिन्ह, खुण होय. हा ध्वज कोणत्या एका राष्ट्राचा नाही, तर संपूर्ण विश्वाचा आहे. जरी याला बौद्‌धांच्या ध्वजासाठी आंतरराष्ट्रीय मान्यता मिळाली असली तरी हा संपूर्ण मानवतेचा ध्वज आहे.

धम्मध्वज वंदना

वज्रासारखा अभेद देह धारण करणाऱ्या भगवान बुद्‌धाच्या डोक्यावरील व दाढीवरील केसातून व डोळ्याच्या नीलस्थानातुन प्रभावित होणारा निळा रंग, समुद्र, धरती व आकाशात व्यापून राहीला आहे ।।१।।

वज्रासारखा अभेद देह धारण करणाऱ्या भगवान बुद्‌धाच्या पिवळसर त्वचेतून व डोळ्यातील पिवळ्या स्थानातून प्रभावित होणारा पिवळा रंग, समुद्र, धरती व आकाशात व्यापून राहीला आहे ।।२।।

वज्रासारखा अभेद देह धारण करणाऱ्या भगवान बुद्‌धाच्या मांसातील व डोळ्यातील रक्त वर्ण स्थानांतील आणि रक्तातून प्रभावित होणारा लाल रंग, समुद्र, धरती व आकाशात व्यापून राहीला आहे ।।३।।

वज्रासारखा अभेद देह धारण कराणाऱ्या भगवान बुद्‌धाच्या दातांतून, अस्थितून, डोळ्यातील पांढऱ्या स्थळांतून प्रभावित होणारा शुभ्र रंग, समुद्र, धरती व आकाशात व्यापुन राहीला आहे ।।४।।

वज्रासारखा अभेद देह धारण करणाऱ्या भगवान बुद्‌धाच्या निरनिराळ्या अवयवात मन प्रभावीत होणारा केसरी रंग, समुद्र, धरती व आकाशात व्यापून राहीला आहे ।।५।।

वज्रासारखा अभेद्य देह आणि वरील रंगानी परिपूर्ण असलेल्या अनंतामध्ये फडकणाऱ्या व सदैव मनोहर दिसणाऱ्या भगवान बुद्धाच्या धम्मध्वजाला आम्ही काया, वाचा व मनाने वंदन करतो ।।६।।

कालांतराने त्याला विश्व मान्यता प्राप्त झाली. याला पाली भाषेत 'षडरोशनी ध्वज' किंवा 'धम्म ध्वज' असे म्हणतात. याचे प्रमाण उभे ५० सें. मी . व आडवे ७० सें. मी. आहे हा 'धम्मध्वज' बौध्द जनांनी आपले घर, विहार, स्मारक, वन, धम्म परिषद, धम्म सभेचा मंच धम्म उत्साहाचे स्थळ इत्यादी ठिकाणी सर्वांत उंच असेल असा फडकवावा. हा 'धम्म ध्वज बुध्द पोर्णिमा', धम्मचक्र प्रवर्तन दिन, धम्मक्रांती दिन व धम्म परिषदांचे वेळी ध्वजस्तंभावर फडकवून वंदना करावी प्रत्येक बौध्द व्यक्तिने धम्म ध्वजाचा सन्मान व अभिमान बाळगावा.

हा पाच रंगाचा ध्वज आहे म्हणून याला 'पंचशील ध्वज' किंवा 'पंचरंगी ध्वज' असे कदापी म्हणू नये.

आभा Aura शरीररश्मी

अनेकदा बुध्दांच्या चित्रात, शिल्पात आपणाला भगवान बुध्दांच्या शरीराभोवती किंवा डोक्यामागे आभा तेजोवलय रेखाटल्याचे दिसण्यात येते.

ही आभा काय असते?

खरोखरच भगवान बुध्दांच्या शरीरातून अशा प्रकारचे रंगीत तेजोवलय बाहेर फेकले जात होते?

उत्तर आहे होय. भगवान बुध्दांच्या पावित्र्याच्या सामर्थ्यामुळे त्यांच्या शरीरातून तेजस्वी आभा प्रकट होत असे. त्यास *बुध्द रश्मी* असे म्हणतात.

त्यात सहा रंग असतात. निळा, पिवळा, लाल, भगवा, सफेद आणि हे सर्व एकत्रित रंग म्हणजे प्रभासरा. धम्मध्वजाचे रंग म्हणजेच बुध्दांच्या शरीरातून बाहेर पडलेले रंगीत तेजोवलय. हे तेजोवलय लहरींच्या स्वरूपात असतात. सर्व अर्हत तसेच ज्या व्यक्तीचा आध्यात्मिक विकास अधिक असेल त्यांचीही आभा तेजस्वी असते.

भगवान बुध्दांच्या शरीरातील तेजोवलयासंबंधी उल्लेख महापरिनिर्वाण सुत्तात मिळतो. जेव्हा भन्ते आनंद तथागतांच्या शरीरातून तेजस्वी आभा निघत असल्याचे कारण विचारतात, तेव्हा बुध्द त्यांना सांगतात, दोन प्रसंगी हे अलौकिक तेज प्रकट होते. पहिल्यांदा सम्यक सम्बोधी प्राप्त होताना व दुसऱ्यांदा त्यांच्या परिनिर्वाणाच्या रात्री.

माझ्या अल्प माहीतीप्रमाणे प्रथम बुध्दाची मुर्ती ही कनिष्काने बनविली त्यात सुध्दा भगवान बुध्दांच्या डोक्यामागे एक आभा दाखविली आहे. आज ख्रिश्चन असो वा हिंदू देवदेवता प्रत्येक देवांच्या मागे किंवा शरीराभोवती आभा दाखवण्याचा प्रघात इथूनच पडला. त्या तेजोवलयाचा उगम बौध्द शिल्पकलेत आहे.

आधुनिक विज्ञान या आभाची पुष्टी करतो काय?

डॉ. बॅरोन कार्ल लुडविग वॉन रिचेनबेक (Dr. Baron Carl Ludwig Von Reichenbach)

या शास्त्रज्ञाने ओडीक फोर्स (Odic Force) नावाचा एक प्रयोग केला. त्यात त्याला असे आढळले की, प्रभावलय ही एक नैसर्गिक गोष्ट आहे. सर्व मानवी प्राणिमात्रातच नव्हे तर चराचरांतील सर्वच वस्तूंमध्ये प्रभावलय आहे.

त्यानंतर डॉ. बारड्युक (Dr. Baraduc) या शास्त्रज्ञाने प्रभावलयाचे हूबेहूब छायाचित्र घेतले.

🌹 *बुद्ध धम्मातील विशिष्ट भिक्खु-भिक्षुनी-उपासक-उपासिका* 🌹

भदंत डॉ आनंद कौसल्यायन

वंदनीय भदंत डॉ. आनंद कौसल्यायन (५ जानेवारी १९०५ - २२ जून १९८८) हे बौद्ध भिक्खू, विद्वान, प्रवासी आणि भारतातील विपुल लेखक होते. २० व्या शतकाच्या बौद्ध धम्माच्या उन्नतीसाठी महान कार्यकर्त्यांपैकी एक म्हणून त्यांना मानले जाते. त्यांच्यावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा प्रभाव होता.

भदंत आनंद कौसल्यायन - (हरनाम दास) यांचा जन्म ५ जानेवारी १९०५ रोजी पंजाबमधील अंबाला जिल्ह्यातील सोहाना गावात झाला. त्यांनी लाहोरमधील नॅशनल कॉलेजमधून बीए केले. बौद्ध धम्माच्या प्रसारासाठी त्यांनी जगाच्या विविध भागात प्रवास करीत बौद्ध धम्माचा प्रचार, प्रसार केला. बौद्ध धम्माच्या सेवेसाठी त्यांनी आपले संपूर्ण जीवन समर्पित केले.

"धम्मदायादा मे, भिक्खवे ,मा आमिसदायदा।"

_भिक्षूंनो! माझ्या (कालातीत) धम्माचे दायाद व्हा, (कालबाह्य) नाही!_

विसाव्या शतकात जे बौद्ध धम्माचे विद्वान होऊन गेले त्यात भदंत डॉ आनंद कौसल्यायन यांचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागेल. अगदी तरुणपणी (१८ वर्षांचे असताना) त्यांनी प्रव्रज्या घेतली व हिंदी भाषेचा सखोल अभ्यास करून बौद्ध संस्कृतीचे माहेरघर असलेल्या श्रीलंकेमध्ये जाऊन तेथील विद्यापीठांत हिंदी प्रमुख म्हणून बरीच वर्षे कार्य

केले. बुद्ध ,आंबेडकरांच्या तत्वज्ञानाचे भाष्यकार आणि अभ्यासक म्हणून त्यांचे महत्व अनन्यसाधारण आहे. त्याचप्रमाणे *बौद्ध धम्माचा आंबेडकरवादी प्रचारक म्हणून त्यांनी केलेले कार्य देखील महत्वपुर्ण आहे.* आपले सर्व पांडित्य पणाला लावून त्यांनी लिहिलेली ७० हुन अधिक पुस्तके ही बौद्ध साहित्याला समृद्ध करणारी देणगी आहे. *बाबासाहेब आंबेडकरांचे साहित्य आणि तत्वज्ञान जनसामान्यांपर्यंत पोहचावे यासाठी त्यांनी उत्तरार्धात अखंड परिश्रम केले.* त्यांचे पाली भाषेवरील प्रभुत्व विलक्षण होते. त्याचं बळावर त्यांनी पाली त्रिपिटकांच्या हिंदी भाषांतरात मोलाची भूमिका बजावली. याशिवाय त्यांनी पाली महाव्याकरण इ. पुस्तके लिहिली. *चीन, जपान,जर्मनी, थायलंड, म्यानमार, श्रीलंका इ देशांत भ्रमंती करून मिळवलेल्या बौद्ध धम्माच्या ज्ञानातुन "अंगुत्तर निकाय", "जातक, बौद्ध धर्म और मार्क्सवाद", "क्रांती के अग्रदूत भगवान बुद्ध", "बौद्ध धर्म का बुद्धीवादी अध्यायन" इ .बौद्ध धम्मावरील अभ्यासपूर्ण ग्रंथ लिहिले. याशिवाय बाबासाहेबानी लिहिलेल्या "बुद्ध आणि त्यांचा धम्म" , "एनिहिलेशन ऑफ कास्ट", "रिडल्स इन हिंदुइझम" इ. ग्रंथाचा हिंदी अनुवाद केला.*

महापंडित राहुल संकृत्यायन यांचे शिष्य असलेल्या आंनद कौसल्यायन यांनी संस्कृत, पाली, इंग्रजी, मराठी,हिंदी, पंजाबी, उर्दू,इ भाषांवर प्रभुत्व मिळवले होते. त्यांनी लिहिलेले बाबासाहेबांचे चरित्र "यदि बाबा न होते" या नावाने प्रसिद्ध आहे. बाबासाहेबांची प्रस्तावना असलेले "एस्सेन्स ऑफ बुद्धीझम" हे पी लक्ष्मी नरसु यांचे पुस्तक देखील त्यांनी अनुवादित केले होते. "बुद्धिझम फॉर एवरीबडी," "दि बुद्धिस्ट आउटलूक" हे त्यांचे इंग्रजी ग्रंथ. वेद से मार्क्स हा आणखी एक महत्वपूर्ण ग्रंथ! भगवान बुद्ध बडे भाई है तो मार्क्स छोटे भाई असे ते म्हणत! बौद्धांनी कर्मकांडमुक्त जीवन जगावे यासाठी त्यांनी बौद्ध जीवन पद्धती हे पुस्तक लिहिले.त्यानीं सर्वसामान्य लोकांना समजावी म्हणून सुलभ आणि छोटेखानी पुस्तकेही लिहिली. १९७० साली भारतीय भिक्खू संघाची स्थापना आणि १९७४ ला सारनाथ ला आंतरराष्ट्रीय बौद्ध अध्ययन केंद्राची स्थापना ही त्यांची प्रमुख संघटनात्मक कार्ये. ते सलग १३ वर्षे वर्ध्याच्या राष्ट्रभाषा प्रचार समितीवर प्रमुख होते.

बाबासाहेबांचे परिनिर्वाण झाल्यावर मुंबईस झालेल्या ०७ डिसेंबर १९५६ च्या अंत्ययात्रेमध्ये ते प्रमुख भिक्खु होते. त्यानंतर भारतात परत येऊन नागपूरच्या दीक्षाभूमीवर स्थायिकपणे राहून बौद्धांचे मार्गदर्शन केले. बाबासाहेब आंबेडकरांच्या "The Buddha & His Dhamma" या पुस्तकाचे हिंदी भाषांतर करून बौद्ध वाङ्मयातुन बाबासाहेबांनी घेतलेलं स्रोत हुडकून काढून त्यांचे टिप्पण केले. २२ जून १९८८ ला या महत्तम बौद्ध महापंडितांचे निधन झाले. आधुनिक वैज्ञानिक जगास बौद्धधम्माचा दृष्टिकोन कशा प्रकारे तंतोतंत लागू होतो, याबद्दल त्यांनी जनजागृतीचे महत्कार्य केले.

_वंदनीय भदंत डॉ आनंद कौसल्यायन ह्यांच्या स्मृतीस त्रिवार वंदन !_

*_सम्राट अशोक_*

बुद्ध धम्माचे मूळ स्थायिकपणे रुजू होण्याकरिता सर्वात अधिक हातभार सम्राट अशोकाने लावला. त्याला कधी महान अशोक, कधी प्रियदर्शी अशोक, तर कधी धम्माशोक ह्या विशेषणांनी संबोधिले जाते. _सम्राट अशोक मगधराज बिंदुसार ह्याचा पुत्र आणि चंद्रगुप्त मौर्याचा नातू होय._ भगवान बुद्धांच्या महापरिनिर्वाणानंतर सुमारे दोनशे वर्षांनी, साधारणपणे इ.स. पूर्वी तिसऱ्या शतकामध्ये सम्राट अशोकाची कारकीर्द झाली. अशोकाने ८४००० स्तूप निर्माण केले.

सम्राट अशोक भारताच्या इतिहासातील सर्वात सामर्थ्यशाली सम्राट, अतिशय पराक्रमी योद्धा आणि थोर मुत्सद्धी म्हणून प्रसिद्ध होता. तथापि त्याचे सत्यावरील प्रेम, त्याची न्यायप्रियता, धार्मिक मतभेदाबद्दल सहिष्णुता, राज्यकारभारातील निःपक्षपात, आजाऱ्याविषयी, गरिबांविषयी व प्राणिमात्रांविषयी दया, ही त्याच्या स्वभावाची महान वैशिष्ट्ये होती. त्याने केलेल्या लोकोपयोगी कार्यांमुळे त्याचे नाव सैबेरियापासून ते श्रीलंकेपर्यंत मोठ्या आदराने घेतले जाते.

राज्याभिषेकानंतर दहा वर्षांनी सम्राट अशोकाने कलिंग देशावर स्वारी केली. त्या लढाईत एक लक्ष सैनिक रणांगणात ठार झाले. दीड लक्ष सौनिकांना बंदी बनविण्यात आले. गावांची नासधूस आणि जाळपोळ झाली व येणेप्रमाणे भयंकर नरसंहार झाला व संपूर्ण प्रदेशाला बीभत्स स्वरूप आले. ते पाहून पाषाणहृदयी सम्राट अशोकाचे मन लोण्याहुनही मऊ झााले व त्याने महाश्रमण निग्रोधांकडून बौद्धधम्माची दीक्षा घेतली

अशोकाने दुर्वर्तनी भिक्खुंची संघातून हकालपट्टी केली आणि सदाचारी भिक्खुंना प्रोत्साहन दिले. सर्वत्र प्रार्थनामंदिरे आणि ८४,००० विहार बांधले, उद्याने तयार केली, लोकांसाठी व प्राण्यांसाठी रुग्णालय उघडली, धम्माच्याया नावाखाली शिरकाव झालेल्या अशुद्ध तत्त्वांना धम्मातून काढून टाकून धम्माची पुनर्स्थापना करण्याकरिता पाटण्याला धम्मपरिषद/संगीति भरविली. स्त्रियांना धार्मिक शिक्षणाला चालना दिली, भगवंतांच्या धम्माची शिकवण द्यावयास आपल्या मित्रदेशांना व भारतातील सर्व राज्यांत आणि पांच ग्रीक राजांकडे शिष्टमंडळे पाठविली. त्याने कपिलवस्तू, बुद्धगया, ऋषीपतन मृगदाव (म्हणजे सारनाथ) आणि कुसीनगर ह्या बौद्धांच्या चार प्रमुख तिर्थक्षेत्री आणि त्याशिवाय इतर हजारो ठिकाणी स्मरणचिन्हे उभारली.

सम्राट अशोकाच्या उदात्त स्वभावाचे परिपूर्ण दाखले अद्यापही अस्तित्वात आहेत. काही वर्षांपूर्वीच भारताच्या निरनिराळ्या प्रदेशांत खडकांवर खोदलेल्या त्याच्या चौदा राजाज्ञांचा उत्खननाद्वारे शोध लागलेला आहे. त्याच्या आज्ञेने उभारलेल्याआ आठ स्तंभांचा शोध लागलेला आहे. हे शिलालेख आणि स्तंभ अशोकाच्या अतिसूज्ञ मनोवृत्तीची आणि आजवर झालेल्या सर्व राजांमध्ये तो सर्वश्रेष्ठ होऊन गेल्याची साक्ष आहेत. अशोकाच्याआ शिलालेखावरून असे दिसून येते की, बौद्धधम्म सहिष्णुतेवर, विश्वबंधुत्वावर, सदाचरणावर आणि न्यायावर अधिष्टीत आहे. स्वार्थबुद्धी, संप्रदायाभिमान किंवा असहिष्णुतेचा त्यात मागमूस नाही. पाश्चिमात्य देशांतील मोठमोठ्या पंडितांची बौद्धधम्मावर श्रद्धा जडण्यास ह्या शिलालेखांची फार मदत झाली आहे.

अशोकाने आपला प्रिय पुत्र महिंद्र आणि कन्या संघमित्रा यांना धम्मकार्याला अर्पण केले आणि धम्माचा प्रसार करण्यासाठी त्यांना श्रीलंकेला पाठविले, ही त्याची सर्वात मूल्यवान देणगी होय.

सम्राट अशोकाने भिक्खुंना धर्मप्रचारासाठी परदेशाला पाठविले होते त्या सर्वांची माहिती "महावंश" नावाच्या ग्रंथामध्ये नमूद केलेली आहे. संपूर्ण भारतभर काश्मीर ते कन्याकुमारीपर्यंत धम्माचा प्रचार करून धम्मराज्य स्थापित केले

अनुला

अनुला ही श्रीलंकेची राणी होती. तिला महाथेरो महेंद्र यांनी धर्माची शिकवण दिली. आपल्या पाचशे दासींसोबत ती भिक्खुंच्या दर्शनास जात असे व अत्यंत श्रद्धाभावाने धम्मश्रवण करीत असे. *_त्यांना "विमानवत्थु" आणि "सच्चसंयुक्त" यांतील मर्म समजले तेव्हा त्यांना श्रोतापत्ती अवस्था प्राप्त झाली. महाथेरी संघमित्रेकडून प्रव्रज्या ग्रहण करून अनुलेने धम्माची बरीच सेवा केली._*

राज्यश्री

राज्यश्री सम्राट हर्षवर्धनाची बहीण होती. तिचे लग्न राजा अवन्तीवर्मा याचा पुत्र गृहवर्मा यांचेशी झाले. हर्षवर्धनाचा कल शिवभक्तीकडे असूनही राजश्रीला भगवंतांच्या धम्माची ओढ होती. माळव्याच्या राजाने गृहवर्म्याचा खून केला व राज्यश्रीला प्रणयाची याचना केली व तिने झिडकारल्यामुळे तिला बंदीगृहात टाकले. पुढे हर्षवर्धनाने त्याचा बिमोड करून तिची सुटका केली. *_श्रेष्ठ दानशीला राज्यश्रीने राजमहाल सोडून काषाय वस्त्र ग्रहण केले व धर्माच्या प्रचारास स्वतःस वाहून घेतले तिच्यामुळे हर्षवर्धनाने देखील बौद्ध धम्माचा स्वीकार केला._*

*_अनागरिक धम्मपाल_*

अनागारिक म्हणजे ज्यांनी आपले घर (आगार) सोडून दिले, म्हणजे चिवर धारण न करता, ब्रह्मचर्य व्रत राखून आयुष्यभर ते भटकंती करीत धम्मसेवा करीत राहिले. अनागारिक धम्मपालांचे आणखी एक नाव देवमित्र धम्मपाल असेही होते. १७ सप्टेंबर १८६४ मध्ये श्रीलंकेत जन्मलेले *डेविड कोरोलीस हेववितरने*, इंग्रजांचे राज्य होते तरी त्यांच्या मातापित्यांची बुद्ध धम्मावर अत्यंत श्रद्धा होती. १४ वर्षांचा असतांनाच डेव्हिडने घर सोडले व भटकंती करीत अध्ययन केले.

*१८८४ मध्ये थिऑसॉफिकल सोसायटीचे सदस्य झाले. जानेवारी १८९१ मध्ये सारनाथ व बौद्धगयेस भेट देऊन बौद्ध वास्तूंचे जीर्णोवस्थेतून पुनर्निर्माण केले. मे १८९१ मध्ये "महाबोधी सोसायटी" ची कलकत्त्याला स्थापना केली. मे १८९२ मध्ये "दि महाबोधी" हे बौद्धजनांचे पत्रक आणि सारनाथ वरून "धर्मदूत" सुरू केले. या सर्व कामासाठी

"मेरी फॉस्टर" यांनी खूपच मदत केली. १० सप्टेंबर १८९३ ला शिकागो येथे भरलेल्या आंतरराष्ट्रीय धर्मसभेत बौद्ध धम्माचे प्रतिनिधित्व केले. विदेशी बौद्धांचे लक्ष भारताकडे वेधून घेतले.*

बौद्ध धम्म आणि पालि भाषेच्या प्रसारासाठी ते अहोरात्र झटले. वयाच्या ६९व्या वर्षी, २९ एप्रिल १९३४ साली अनागारिक धम्मपालांचे परिनिर्वाण झाले. महाबोधी महाविहार इतर धर्मियांच्या ताब्यातून मुक्त करण्याचे त्यांचे स्वप्न मात्र अपूर्ण राहिले. १८९२ साली, महाबोधी महाविहारासाठी दाखल केलेल्या पहिल्या कोर्ट केसचा आजही निकाल लागलेला नाही. *इतर पंथांची प्रार्थना स्थळे त्या त्या लोकांच्या संपूर्ण ताब्यात आहेत...पण महाबोधी महाविहार आजही बौद्धांच्या ताब्यात नाही ही शोकांतिका आहे.*

बौद्ध धम्माची पुनर्रचना करण्यास प्रथम प्रयास त्यांनीच केला, त्यामुळे बौद्ध धम्माला भारतात पुनर्जीवित करावयास प्रथम प्रयत्न करण्याचे श्रेय अनागारिक धम्मपाल यांच्याकडे जाते.

*_मेरी फॉस्टर_*

मेरी रॉबिन्सचा जन्म इ.स.१८४४ मध्ये होनोलुलु येथे झाला. तिचा विवाह अमेरिकन धनाढ्य बँकर टी. आर. फॉस्टरशी होऊन तिचे नाव मेरी एलिझाबेथ फॉस्टर पडले. एकदा ती जहाजाने जपानला जात असतांना तिची गाठ श्रीलंकेचा तरुण भिक्खु अनानागरिक धम्मपालाशी पडली. त्याने केलेल्या मैत्रिभावनेचा उपदेश ऐकून ती फार प्रभावित झाली.

*१९०२ मध्ये तिने ५०० डॉलर व पुढील वर्षी २००० डॉलरचे दान केले. त्या धनराशीचा उपयोग अनानागरिक धम्मपालाने सारनाथच्या ऋषीपतन मृगदाव येथील मूलगंधकुटी विहाराचा जीर्णोद्धार करावयासाठी केला. त्यानंतर वर्षानुवर्षे मेरी फॉस्टरने दिलेल्या दानामुळे सारनाथ आणि इतर बौद्ध धम्मक्षेत्रांचा पुनरुद्धार सुरू झाला. इ.स. १९१८ व १९२३ मध्ये अनुक्रमे ५०,००० व १०,००,००० डॉलर दान करून मेरी फॉस्टरने आधुनिक विशाखेचे काम केले. तिने इ.स.१९१३ मध्ये दान दिलेल्या ६०,००० डॉलर्सने श्रीलंकेमध्ये फॉस्टर रॉबिन्सन हॉस्पिटल उघडण्यात आले.*

_चारूमती_

चारूमती ही सम्राट अशोकाची मुलगी होती. काही इतिहासकारांच्या मते ती सम्राट अशोक व त्यांची पत्नी असंघमित्रा यांची दत्तक मुलगी होती. आज आपणाला संघमित्रा सर्वश्रुत आहे की जिने श्रीलंकेमध्ये धम्म प्रचार केला. परंतु चारूमतीचे नाव भारतीय बौध्दांत तितकेसे प्रसिध्द नाही. नेपाळमध्ये (प्रदेशात) बुध्दधम्माच्या प्रचाराचे कार्य चारूमतीने केले. तिची धम्मावर फारच श्रद्धा होती. चारूमतीचा विवाह नेपाळमधील राजकुमार देवपालाशी झाला त्यांच्याच नावावरून चारूमती ने *देव पट्टन व अशोक पट्टन* नावाच्या नगरांचे निर्माण केले.

सम्राट अशोक जेव्हा धम्मयात्रेसाठी निघाला त्यावेळी चारूमती ही धम्मयात्रेत आपल्या पित्याची सेवा करता यावी तसेच धम्मावर नितांत श्रध्दा असल्याकारणाने धम्मयात्रेसाठी निघाली.

लुंम्बिनी इ. स्थळांना भेट देउन सम्राट अशोक व चारूमती *ललितपुरास* पोहचले. तेथे सम्राट अशोकाने स्तूप निर्माण केले त्यास *'थूर'* असे म्हणतात.

चारूमतीने देवपाटनच्या उत्तरेला काठमांडू मध्ये चारूमती विहाराची निर्मीती केली. तिथे संघाराम बांधून बौध्द भिक्खू भिक्खूणींच्या राहण्याची अध्ययनाची सोय केली व उर्वरित आयुष्य संघमित्राप्रमाणे भिक्खूणी बनून नेपाळमध्ये धम्मप्रचार केला व नेपाळ बौध्दमय बनविले.

चारूमती विहार (आजचे *छबहिल*) आजही नेपाळमध्ये राहणाऱ्या व बौध्द यात्रेकरूंचे श्रध्दास्थान आहे.

ज्याप्रमाणे संघमित्रेने सुदूर दक्षिणेस (श्रीलंकेस) धम्मप्रचार केला तद्वतच चारुमतीने उत्तरेस नेपाळला बौद्धमय बनविले

संघमित्ता

संघमित्ता म्हणजे संघमित्रा ही, सम्राट अशोक आणि त्याची बौद्ध धर्मीय राणी देवी यांची मुलगी होती. आदरणीय महिंद्र हा तिचा जुळा भाऊ होता. त्याच्या सोबतच तिनेही मठवासी बौद्ध साधूचे अनुयायित्व पत्करले होते. सम्राट अशोकाने गुरू महस्थविर मोग्गलिपुत्त तिस्स यांना सम्राटाने एकदा प्रश्न केला, *"भंते, धम्माचा उत्तराधिकारी व्हावयासाठी मी काय करायला पाहिजे?" त्यावर फार गंभीरपणे स्थवीरांनी उत्तर दिले, "केवळ एकच उपाय आहे, तो म्हणजे स्वतःच्या संततीला त्रिरत्न सरणास समर्पित करणे"* षोडशी सुकुमारी राजनंदिनी संघमित्रेने त्याचा सहर्ष अविकार केला व भिक्खूणीची प्रव्रज्या ग्रहण केली. पुढे बुद्धांच्या शिकवणीचा प्रसार करण्यासाठी ही दोन्ही भावंडे श्रीलंकेला गेली.

असं परदेशात एखादं कार्य पार पाडण्यासाठी आपल्या मुलीला पाठवायला सुरुवातीला अशोकची तयारी नव्हती. या कल्पनेवरच तो नाखूष होता; पण संघमित्ताने स्वत:च त्यासाठी हट्ट धरल्यावर अखेर त्याचा नाइलाज झाला आणि त्याने तिला जायला संमती दिली. तिच्या बरोबर इतर अनेक साध्वीना (भिक्षुणी) ही श्रीलंकेला पाठवण्यात आलं होतं. श्रीलंकेच्या दरबारात राज घराण्यातील *महाराणी अनुला* हिने थेरी संघमित्रेला बोलावून स्त्रियांनी स्वत:ला साध्वी म्हणून दीक्षा मिळावी अशी विनंती केली होती. त्या अनुषंगाने साध्वींचा म्हणजे भिक्षुणींचा एक संघ तयार करण्यासाठी आणि तो कार्यरत करण्यासाठी संघमित्ता इतर साध्वीं (भिक्षुणी) बरोबर तिथे गेली होती.

माहितीच्या उपलब्ध असणाऱ्या काही सोतांनुसार या मुलीचे नाव संघमित्ता नसून 'संघमित्रा' किंवा 'संगमित्रा' असेच होते आणि ती म्हणजे अशोकचे लहान अपत्य होते आणि महिंद्र तिच्या पेक्षा मोठा होता. अशोकच्या बौद्ध धर्मीय

पत्नीला आपल्या मुलीचे नाव बौद्ध धर्माशी निगडितच असावं असं वाटत होते आणि म्हणून तिने या मुलीचं नाव 'संघमित्रा' असं ठेवलं होतं. कलिंगच्या लढाईनंतर राजा अशोकने जेव्हा आपल्या पत्नीसह बौद्ध धर्माचा स्वीकार केला, तेव्हाच त्याने असा निर्णय घेतला की, गौतम बुद्धांची शिकवण आणि तत्त्वे यांचा प्रसार करण्यासाठी, प्रवचनांच्या माध्यमातून त्यांचा उपदेश लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी स्वतःच्या मुलांना आपल्यापासून दूर परप्रांतामध्ये पाठवायचे आणि त्याने हा निर्णय अमलात आणला. प्रत्येक हिवाळ्यातला सर्वात लहान दिवस, संघमित्राच्या सन्मानार्थ साजरा केला जातो.

विदेशात जाणारी ती प्रथम धम्मप्रचारिका होती. ८१ वर्षांची होईस्तोवर तेथेच राहून धम्मप्रचार करीत करीत तिचे महापरिनिर्वाण झाले.

*_अश्वघोष_*

अश्वघोषाचा जीवनकाळ इ.स. पूर्व ५० ते इ.स. नंतर १०० पर्यंत मानला जातो. संस्कृतमधील एक महाकवी, नाटककार आणि बौद्ध तत्त्वज्ञ. याच्या ग्रंथांतील व्यक्तिगत निर्देशांवरून याची काही माहिती मिळते. हा साकेत (अयोध्या) येथे राहणारा. याच्या आईचे नाव सुवर्णाक्षी. यास ‘आचार्य’, ‘भदंत’, ‘महाकवी’ आणि ‘महावादी’ या पदव्या होत्या. उपनिषदे, भगवद्‌गीता, सांख्यादी दर्शने आणि रामायणादी पूर्वकालीन काव्ये यांचा त्याने उत्तम अभ्यास केला होता. त्याच्या कृतींमध्ये दिसून येणारे ब्राह्मण धर्म व संस्कृतीचे सखोल ज्ञान, तत्संबंधीचा आदर आणि धर्मपरिवर्तनाच्या कथा यांवरून तो जन्माने ब्राह्मण असून पुढे त्याने बौद्ध धर्माचा स्वीकार केला असावा, असा तर्क केला जातो. हा कनिष्काचा धर्मविषयक सल्लागार असून त्याच्या कारकिर्दीत झालेल्या बौद्धधर्मपरिषदेचा उपसभापती होता, अशी पारंपरिक समजूत आहे. हा हीनयान पंथाचा होता.

बुद्धचरित, सौदरनंद, शारिपुत्रप्रकरण (सारिपुत्रप्रकरण किंवा शारद्वतीपुत्रप्रकरण), वज्रसूची, गण्डीस्तोत्रगाथा, सूत्रालंकार, महायान श्रद्धोत्पादशास्त्रइ. ग्रंथ अश्वघोषाचे म्हणून सांगण्यात येतात. तथापि "बुद्धचरित" व सौदरनंद ही महाकाव्ये आणि शारिपुत्रप्रकरण हे नाटक, एवढे तीनच ग्रंथ निर्विवादपणे अश्वघोषाचे आहेत.

बुद्धचरिताचे मूळ अठ्ठावीस सर्ग असावेत, असे त्याच्या चिनी व तिबेटी आवृत्त्यांवरून दिसते. आज मात्र त्या मूळ संस्कृत महाकाव्याचे फक्त चौदाच सर्ग उपलब्ध आहेत. त्यांतही पहिल्या सर्गाचे सु. तीन पाद आणि चौदाव्या सर्गाच्या पहिल्या पादातील ३१ श्लोकच मिळतात. एकोणिसाव्या शतकात अमृतानंद नावाच्या एका नेपाळी पंडिताने चौदा ते सतरा हे सर्ग स्वतःच लिहून काढले. अंशतःच उपलब्ध असलेल्या या महाकाव्यात बुद्धाच्या आत्मसाक्षात्कारापर्यंतची कथा आलेली आहे.

राजपुत्र सर्वार्थसिद्धीची नगरयात्रा त्याला पाहण्यासाठी जमलेला स्त्रियांचा मेळावा रोग, वार्धक्य आणि मृत्यू यांची दृश्ये राजपुत्राला सर्वसंगपरित्यागापासून परावृत्त करण्यासाठी राजपुरोहिताने केलेले युक्तिवाद इत्यादींच्या

वर्णनांतून अश्वघोषाची वेधक कथनशैली आणि निरनिराळ्या व्यक्ती व प्रसंग रंगविण्याचे कौशल्य प्रत्ययास येते. हे काव्य रचताना बुद्धासंबंधीच्या अधिकृत माहितीचाच उपयोग करण्याकडे त्याची प्रवृत्ती दिसते. तसेच, आवश्यक तेथे त्याने परंपरेला मान दिला आहेच.

बौद्धधर्मतत्त्वांचा प्रचार हे या काव्याचे उद्दिष्ट असले, तरी अश्वघोषाने हे काव्य रुक्ष होऊ दिले नाही. सौदरनंदाचे एकूण १८ सर्ग असून ते उपलब्ध आहेत. बुद्धाने नंद या आपल्या सावत्र भावाचे धर्मांतर कसे घडवून आणले, हा या काव्याचा विषय आहे. नंद हा अत्यंत देखणा असल्यामुळे ‘सुंदर’ या नावानेच ओळखला जाई. त्याची पत्नी सुंदरी हीसुद्धा अतिशय रूपवान होती. तिच्यासह सुखोपभोगात तो मग्न असे. बुद्धाने त्याचे डोळे उघडले आणि संसारलालसा सोडून तो बुद्धाचा अनुयायी झाला, असे या महाकाव्यात दाखविले आहे. *सौदरनंदात* काव्याबरोबर तत्त्वचर्चाही आली आहे. धर्मोपदेशक अश्वघोष या काव्यात अधिक प्रकर्षाने जाणवतो. *शारिपुत्रप्रकरण ह्या नाटकात शारिपुत्र आणि मौद्गल्यायन यांचे बुद्धाने घडवून आणलेले धर्मांतर दाखविले आहे.* तथापि हे नाटक अत्यंत त्रुटित स्वरूपात उपलब्ध असल्यामुळे या धर्मांतराची महावग्गासारख्या ग्रंथांतून आढळणारी कथा या नाटकात अश्वघोषाने कशी मांडली होती, यासंबंधीची नीटशी कल्पना येऊ शकत नाही.

सर्वसामान्यांना बौद्ध धर्माचे महत्त्व पटवून देण्यासाठीच अश्वघोष काव्य-नाटकांसारख्या ललितरचनेकडे वळला. ‘कडू औषध मधाबरोबर दिले की घेववते त्याचप्रमाणे मोक्षधर्माचा उपदेशही काव्यबंधाने मनोरम ठरतो’ अशा आशयाचे उद्गार सौदरनंदाच्या अखेरीस त्याने काढले आहेत. काव्याच्या तंत्रकौशल्याकडे त्याने फारसे लक्ष पुरविले नाही. तथापि त्याच्या साध्या, सरळ, पण मधुर भाषेनेच त्याच्या काव्याला एक आकर्षक रूप प्राप्त करून दिले आहे. *अश्वघोष आणि कालिदास यांच्या काव्यांत काही लक्षणीय साम्यस्थळे आढळतात. त्यांवरून त्याच्या काव्याचा कालिदासाने उत्तम अभ्यास केला असावा, असे मत अनेक विद्वानांनी व्यक्त केले आहे. याच्या उलट अश्वघोषाचा काळ कालिदासानंतरचा असून त्यानेच कालिदासाचे अनुकरण केले असावे, असाही विचार काही विद्वानांनी मांडला आहे. तथापि अश्वघोष हा कालिदासचा पूर्वसूरी होय हेच मत सर्वसाधारणतः मान्य केले जाते.*

त्यांच्या मधुर गायनाने घोडे मंत्रमुग्ध होत असत, त्यामुळे त्यांचे नाव अश्वघोष पडले. ते महाराज कनिष्क यांचे गुरू होते. *कनिष्काने बोलाविलेल चतुर्थ बौद्ध संगीतिमध्ये ते उपसभापती होते.*

ते संगितज्ञ भिक्खु होते व आपल्या संगीतास त्यांनी बौद्ध धम्माच्या प्रचाराचे साधन बनविले. ते विणेचे अत्यंत कुशल वादक होते. त्यांनी "रास्तवर" नावाच्या वाद्ययंत्राचा आविष्कार केला.

_श्यामावती व कात्यायनी_

इतर बौद्धधम्मीय उपासिकांमध्ये श्यामावती व कात्यायनी यांची नावे प्रमुख आहेत.

श्यामावती

ती एका श्रेष्टीची सुंदर कन्या होती. तिचे लग्न कोशांबीच्या उदयन राजाबरोबर झाले. *भगवंतांच्या धम्मावर तिची अतीव श्रद्धा होती व संघाला दानधर्म करण्याबद्दल तिची बरीच ख्याती होती.* आपला द्वेष करणाऱ्याबद्दल देखील ती मैत्रिभाव दाखवीत असे. *_त्यामुळे मैत्रिविहारिणी उपासिकांमध्ये ती सर्वश्रेष्ठ मानली जाई._*

कात्यायनी

अवन्तीजनपदांत कुरटघर नावाच्या लोकांची सेवा करण्यात तिला फार प्रसन्नता वाटत असे. आपल्या प्रसन्न व्यवहाराने तिने बऱ्याचशा चोरांना देखील भिक्खु बनावयाची प्रेरणा दिली व ते पुढे शीलमय जीवन जगू लागले. *_त्यामुळे तिला अतिप्रसन्न राहणाऱ्या उपासिकांमध्ये अग्रस्थान मिळाले._*

_नन्दा, भद्रा कपिलानी, श्रुगालमाता_

नन्दा ही शाक्यवंशिय असून अत्यंत सुंदर होती. *तिला जनपद कल्याणी म्हणत*. तिच्या बर्याच आप्तगणांनी धम्मदिक्षा घेतल्यामुळे तिनेही प्रव्रज्या घेतली. परंतु अजून ही तिला आपल्या रुपाबद्दल गर्व होता. एकदा भगवंतांचे प्रवचन ऐकत असताना, तिच्या मनांतील रूपगर्वितेचा भाव भगवंतांनी ओळखला व आपल्या रिद्धीबलाने तिला तेथेच अतिसुंदर स्वर्गीय अप्सरेचे दर्शन घडविले. जिचे तारुण्य हळूहळू नष्ट झाले, प्रौढावस्था आली. नंतर म्हातारपणाची लक्षणे दिसू लागली. त्यामुळे *_नंदेला रूपाच्या अनित्यतेचे व जीवनाच्या नश्वरतेचे ज्ञान झाले व ती पूर्णतः विरक्त झाली. थेरिगाथेमध्ये तिच्या ज्ञानसंपदेची महिमा आहे. ती ध्यानरत भिक्खुणींमध्ये श्रेष्ठ होती._*

भद्रा कपिलानी _ही सागल (सियालकोट) मधील कपिल गोत्रीय ब्राह्मणाची मुलगी होती. तिचे मगध देशातील समृद्धशाली पिपल माणबकाशी लग्न झाले आणि ती सुखमय जीवन व्यतीत करू लागली._ परंतु *तिच्या पतीने भगवंतांचा उपदेश ऐकून प्रव्रज्या घेतली व पुढे तो भिक्खु काश्यप या नावाने प्रसिद्ध झाला.* हे पाहून कपिलानी हिनेही गृहत्याग करून प्रव्रज्या घेतली. *_त्याग, साधना व धम्मज्ञानामुळे स्मृती धारण करणाऱ्या प्रमुख भिक्खुणींमध्ये तिची गणना होत असे._*

श्रुगालमाता हिचा जन्म राजगृहातील एका कुलीन परिवारांत झाला. तिचा मुलगा श्रुगाल नित्यप्रती भगवंतांचा उपदेश श्रवण करण्यास जात असे आणि परत येऊन आपल्या मातेस त्याचा मतितार्थ सांगत असे. त्यामुळे _*तिच्या मनात श्रद्धामय हृदयात विरक्त भावना जागृत होऊन तिने प्रव्रज्या ग्रहण केली व पुढे अर्हत्व प्राप्त केले. तिच्या अगाध श्रद्धेमुळे तिला श्रद्धामयी भिक्खुंणींमध्ये प्रमुख स्थान मिळाले, व श्रद्धामय जननी "श्रुगालमाता" या नावाने ती प्रसिद्ध झाली.*_

*_महास्थविर नागसेन_*

नागसेनांचा जन्म हिमालय पर्वताच्या पायथ्याशी कजंगल गावात सोनुत्तर ब्राम्हणाच्या घरी झाला होता.तो सात वर्षाच्या असताना त्याला विद्यार्जन करण्यासाठी एका ब्राम्हण आचार्याकडे पाठविले. तिथे त्याने लवकरच तिन्ही वेद कंठस्थ केले. तो व्याकरण , लोकायत आणि महापुरुष लक्षण शास्त्राचा पूर्ण पंडित झाला.

त्याने गुरुगृही विद्या संपादन केल्यानंतर वैदिक ज्ञानाची चिकित्सा केली. पण ते सर्व ज्ञान त्याला अपूर्ण वाटले. वेद तुच्छ आहेत त्यात काही सार आहे ना काही अर्थ आणि ना काही तथ्य .

एकदा त्याच्या गावी स्थविर रोहण आले. त्यांचे तत्वज्ञान वेगळे होते. त्याने नागसेन प्रभावित झाला. त्याने स्थविर रोहनला आपला शिष्य बनविण्याची विनंती केली. तेव्हा तो स्थविर म्हणाला "बालक तू आई वडिलांच्या परवानगीने काशाय वस्त्र परिधान करशील तेव्हा मी तुला आपला शिष्य बनवेल".

आयुष्यमान रोहन नागसेनास घेऊन वत्तनीय आश्रमाच्या विजंभवत्थु येथे गेले. तेथे एक रात्र मुक्कामास रागुण दुसऱ्या दिवशी *हिमालयाच्या पायथ्याशी असलेल्या _"रक्षित तळ"_ या ठिकाणी जाऊन _"कोटिशत अर्हतांच्या संघात नागसेनास प्रव्रजित केले. त्यानंतर नागसेन श्रामणेर झाला.* श्रामणेर असताना *स्थविर रोहन यांनी त्यास "अभिधम्म" शिकविला*, श्रामणेर नागसेनाची स्मरण शक्ती दांडगी असल्यामुळे त्याने लवकरच सर्व "अभिधम्म" अगदी तोंडपाठ केला. त्यानंतर *कोटिशत अर्हतांच्या समोर नागसेनाने _"अभिधम्मातील सातही ग्रंथावर विस्तृत प्रवचनाद्वारे सात महिन्यात पूर्ण विवेचन करून सांगितले."_*

नागसेनाच्या वयाला २० वर्षे पूर्ण झाल्यानंतर रक्षित तळाच्या कोटिशत अर्हतांनी नागसेनास उपसंपदा दिली तेव्हा श्रामणेर नागसेन भिक्षु झाले. *भिक्षु झाल्यानंतर तो पाटलीपुत्र शहरातील अशोकारामात राहणाऱ्या भिक्खू धर्मरक्षित यांच्याकडे येतो. त्यांच्याकडे आल्यानंतर नागसेन तीन महिन्याच्या आत त्रिपिटक कंठस्थ करतो. तेव्हा धर्मरक्षित म्हणतात." नागसेन ज्या प्रकारे गुराखी जसे राखण करतो , पण दूध पिणारे दुसरेच असतात , त्याच प्रकारे तू त्रिपिटक जाणले तर काय झाले जर तू श्रमन फलाचा भागीदार नाही झालास! " त्याच दिवशी रात्री नागसेन अर्हत पद प्राप्त करतो आणि त्यानंतर राजा मिलिंद आणि नागसेन यांची प्रश्नोत्तर रुपी वाद चर्चा घडते. ही चर्चा बौध्द साहित्यात _'मिलिंद पञ्ह (मिलिंद प्रश्न)'_ म्हणून विख्यात आहे.*

_मिलिंद पञ्ह (मिलिंद प्रश्न)'_ हा बौध्द साहित्यातील एक महत्वपूर्ण ग्रंथ आहे. भंते नागसेन आणि आणि राजा मिलिंद यांच्यात झालेल्या शास्त्रार्थ चे विस्तृत वर्णन या ग्रंथात आहे.मिलिंद याने उपस्थित केलेले प्रश्न आणि शंकांचे समाधान हा या ग्रंथाचा विषय आहे.हा शास्त्रार्थ सागल येथे झाला होता.ते सम्राट मिलिंद च्या राजधानी चे शहर होते.*

* _मिलिंद पञ्ह (मिलिंद प्रश्न)'_ हा पाली भाषेत रचना केलेला बौध्द ग्रंथ आहे. या ग्रंथाची गणती त्रिपिटक ग्रंथात होत नाही; परंतु त्रिपिटक ग्रंथानंतर लिहिल्या गेलेल्या अनु त्रिपिटक ग्रंथामध्ये याचे स्थान सर्वोच्च आहे._*

मिलिंद हा भारत वंशीय ग्रीक राजा होता. त्याचा जन्म अफगाणिस्थान मधील बाग्राम येथे झाला होता.त्याचा मृत्यू इ.स.पू.१३० मध्ये झाला होता.

भारतावर आलेले *ग्रीक आक्रमकांना भारतीय साहित्यात ' यवन ' म्हणून ओळखले जाते.* मिलिंद राजाचा शासन ही मौर्य उत्तर काळातील सर्वात महत्व पूर्ण राजनैतिक काळ होता. नागसेन त्यावेळी बौद्ध भिक्खू म्हणून किर्तिशिखरावर होता.तसाच मिलिंद राजा ही आपल्या ज्ञानाच्या गर्वात मग्न होता .

अशा एका कातरवेळी राजा मिलिंद आपल्या शिपायाला म्हणतो " अरे हा जंबुद्वीप (यात अफगाणिस्थान , उत्तर प्रदेशातील पंचनद प्रदेशातील काही भाग तथा सियालकोट सह आजच्या पाकिस्तान चा काही भाग येतो) तुच्छ आहे.व्यर्थच त्याचे नाव आहे. इथे एकही ब्राम्हण किंवा श्रमन असा नाही , जो माझ्या बरोबर शास्त्रार्थ करू शकेल आणि माझ्या शंकांचे सामाधान करू शकेल ! "

राजा मिलिंद याचा राजदूत जेव्हा भंते नागसेन याला शास्त्रार्थ चे निमंत्रण द्यायला जातो तेव्हा नागसेन त्याला म्हणतो 'मी सम्राटांचे निमंत्रण स्वीकारतो आणि येईलही परंतु हे जाणा की , 'भिक्षु नागसेन कोणी आहेच नाही .' आणि आपले मत सिद्ध करण्यासाठी नागसेन सम्राटाला प्रश्न करतो " महाराज आपण पायी आला की की वाहनावर ?" सम्राट म्हणतो "नाही भंते ! मी रथा त बसून आलो.

नागसेन : मला दाखव तो रथ कुठे आहे ? काय दांड्या रथ आहे ? मिलिंद : नाही भंते ! नागसेन : काय अक्ष रथ आहे ? मिलिंद : नाही भंते .चाके रथ आहे का , कासरा रथ आहे काय, काय चाबूक रथ आहे.मी तुम्हाला विचारून थकलो पण तुम्ही नाही शिवाय उत्तर दिले नाही.तेव्हा राजा नागसेन यांना म्हणाला भंते मी खोटे बोलत नाही वास्तविकता ही आहे की , रथाच्या अवयवाच्या आधारावर केवळ व्यवहारासाठी त्याला रथ म्हटले जाते.त्यावेळी नागसेन म्हणाला बरोबर आपण जाणले की रथ काय आहे. याचप्रकारे अवयवांच्या आधारावर केवळ व्यवहारासाठी नागसेन असे नाव घेतले जाते.परंतु परमार्थ मध्ये नागसेन असा कोणी पुरुष विद्यमान नाही आहे. त्यावर मिलिंद म्हणाला भंते नागसेन! अदभुत आहे या जटिल प्रश्नाला आपण मोठ्या खुबीने सोडविले आहे. जर यावेळी भगवान बुद्ध स्वयम् असते तर त्यांनीही अवश्य साधुवाद दिला असता.

तथागतांच्या पूर्वीच्या बुद्धांबद्दल 2000 वर्षांपूर्वीची _'मिलिंद पञ्ह (मिलिंद प्रश्न)'_ या ग्रंथातील चर्चा व भगवान बुद्धांनी शोधून काढलेला नवीन मार्ग.

"भन्ते नागसेन, एके ठिकाणी भगवंतांनी म्हटले आहे की, हे भिक्खुंनो जो इतरांना कधी गवसला नाही. अशा परम सुखदायी नवीन मार्गाचा सम्यकसंबुद्ध शोध लावीत असतात. तसेच दुसऱ्या ठिकाणी म्हटले आहे की, हे भिक्खुंनो मला तो सनातन मार्ग गवसला आहे. ज्या मार्गाने पूर्वी होऊन गेलेले बुद्ध चालत आले आहेत.

भन्ते नागसेन, आता आपणच सांगा. या दोन्ही वचनात किती विसंगती आहे ? पहिले वचन आणि दुसरे वचन एक दुसऱ्याचा विरोध करीत नाही का ? भन्ते, हे सुद्धा बिकट असेच कोडे आपण उकलून द्यावे."

"महाराज, वरील दोन्ही बाबी एकदम सत्य आहेत. महाराज, पूर्वी होऊन गेलेल्या बुद्धांचे परिनिर्वाण झाल्यामुळे आणि त्यांचे शासन आता न राहिल्यामुळे बुद्ध मार्गाचा एकदम लोप होऊन गेला होता. त्याच लोप पावलेल्या सनातन मार्गाचे भगवान बुद्धांना प्रज्ञाचक्षुद्वारे नव्याने दर्शन घडले. त्यामुळेच त्यांनी सनातन मार्गाचे मला दर्शन घडले. असे तथागतांनी म्हटले आहे.

*_"महाराज, पूर्वी होऊन गेलेले बुद्ध परिनिर्वाण पावल्यामुळे त्यांच्या शासनाचा लोप झाला असल्याकारणाने तो मार्ग लोप पावला होता. तो मार्ग एकदम अस्पष्ट झाला होता. लोकांना त्याचा विसर पडला होता. गडप झाला होता. तोच मार्ग पुन: नवीन रुपात तथागत बुद्धाने शोधून काढला. म्हणूनच त्यांनी म्हटले आहे की, हे भिक्खुंनो जो इतरांना कधीही गवसला नसतो, तो मार्ग तथागत बुद्धच शोधून काढतात. (प्रकरण पाचवे योगी कथा मिलिन्द पञ्ह.)_*

बुध्द हे स्त्री विरोधी होते असे म्हणणारे एक गोष्ट सांगतात की, बुध्द एकदा आनंदाजवळ म्हणाले होते 'हे आनंद, भिक्खू संघात जर स्त्रियांना प्रवज्जित केले नाही तर माझा धम्म एक हजार वर्ष सुस्थितीत राहिल. परंतु त्या प्रवज्जित झाल्याने केवळ पाचशे वर्ष पर्यंत राहण्याची शक्यता आहे.

तथागतांच्या या वाक्यांचा उलगडा स्थविर नागसेनाने राजा मिलिंद याला दिलेल्या उत्तरात केला आहे. स्थविर नागसेन म्हणतात. *धम्माची मुळे चारित्र्यात आहेत. जो पर्यंत लोकांचे चारित्र्य बिघडणार नाही, तो पर्यंत भगवान बुध्दांच्या धम्माचा कधीही लोप होणार नाही.*

यामधून नागसेनास हे सुचवायचे आहे की बुध्दाने कितीही चांगला धम्म सांगितला तरी अनुयायांनी त्याचा अभ्यास व तदनुसार आचरण करणे महत्वाचे आहे. स्त्रियांना भिक्खूनी केल्याने त्यांचा आणि भिक्खूचा जवळचा संबंध येणार आहे. येथेच धम्माला आवश्यक असणाऱ्या चारित्र्याची कसोटी आहे. स्त्री आणि पुरूष निसर्गातच असे घटक आहेत की ते जवळ येताच त्यांची वासना जागृत होते. भिक्खू आणि भिक्खूणी सुध्दा यास अपवाद नाहीत. भिक्खू भिक्खूणी आपल्या इंद्रियावर ताबा प्राप्त करेपर्यंत असे होणे साहजिकच आहे. जो पर्यंत बुध्द व त्यानंतर ज्येष्ठ भिक्खू आहेत तो पर्यंत ठिक. परंतु नंतर असा दबदबा न राहिल्यास अनाचार नक्कीच माजेल. शिवाय बुध्द धम्माला बदनाम करण्यासाठी काही लोक तत्पर असतच. हे ओळखून भगवान बुध्दाने असे विधान केले की, स्त्रियांना प्रवज्जित केल्याने धम्म पाचशे वर्षच टिकेल. यातून बुध्दाचा दूरदर्शीपणा दिसून येतो.

या प्रकारचे प्रश्न आणि त्यांची भिक्षु नागसेन यांनी दिलेली उत्तरे वाचतांना या ग्रंथाचा प्रतिपादित विषय अनात्मवाद , बौद्ध धर्म आणि बौद्ध मनोविज्ञान संबंधी गहन प्रश्नांची तार्किक भाषेच्या माध्यमातून सोडविण्यात आली आहेत.

नागसेनांनी बौद्ध तत्वज्ञानांत नवीन भर पाडली नाही, तथापि त्याला अतिशय सुलभ भाषेत सांगीतल्यामुळे महास्थविर नागसेनाचे नाव बौद्ध साहित्यात अजरामर झालेले आहे

_*सम्राट कनिष्क*_

*इ स ७८ च्या सुमारास उतेरेस कुषाण वंशीय "बुध्द धम्म अनुयायी कनिष्क" होऊन गेले, त्यांनी गादीवर बसताच अनेक धम्माला पूरक अशा गोष्टी केल्या,* त्याचे साम्राज्य खूप दूरवर पसरले होते. राज्याकारभारातून त्याला जेव्हा जेव्हा वेळ मिळत असे तेव्हा तेव्हा तो धम्मग्रंथांचा आभ्यास करीत असे. दररोज तो विद्वान भिक्खूंना आपल्या राजवाड्यात बोलावून त्यांना धम्माचे तत्वज्ञान शिकविण्यास सांगत असे. पण निरनिराळ्या पंथांच्या शिकवणीत त्याला फरक दिसून आला. त्यामुळे त्याच्या मनात अनेक शंका निर्माण झाल्या. त्या शंकांचे निरसन कसे करावे ह्याचा काही मार्ग त्याला सापडेना.

त्यावेळी *भदन्त पाश्व सम्राट कनिष्काला म्हणाले, तथागतांच्या महापरिनिर्वाणानंतर आतार्यत खुप काळ लोटला आहे. निरनिराळ्या शाखेचे अनुयायी आपआपल्या शाखा-संस्थापकांचीच शिकवण योग्य आहे असे माणतात. त्यामुळे बौद्धशिकवणीत बरेच मतभेद झाले आहेत, हे ऐकून कनिष्काला फार वाईट वाटले. त्याने त्रिपिटकांचे एकसूत्रीकरण करण्यासाठी एक धम्मसभा बोलावली. त्यात त्रिपिटकाचा गाढा अभ्यास असलेले आणि पाच विद्या मध्ये पारंगत असलेले आशा ५०० विद्वान 'अर्हतांनी' भाग घेतला.*

सम्राट कनिष्काची अशी इच्छा होती की, ह्या संगितीत भाग घेणाऱ्या अर्हतांनी राजगृहाजवळील सप्तपर्णी गुहेजवळ जाऊन तत्वचिंतन करावे. परंतु सर्व अर्हतांनी असे मत प्रदर्शित केले की, तत्वचिंतनासाठी लागणारी शांतता आणि योग्य सोयी तेथे मिळणार नाहीत. तरीसुद्धा राजाच्या इच्छेप्रमाणे जागा निवडली जावी.

राजा अर्हतांच्याबरोबर ती जागा सोडुन दुसरीकडे गेला. तेथे त्याने ग्रंथांची जुळवणी करुन विभाषा शास्त्रांची रचना करण्यास संघाराम बांधला (हा संघाराम तेव्हाचे पुरुषपुर व अत्ताचे पेशावर येथे आहे).

त्या पाचशे अर्हतांनी सर्वात प्रथम *सूत्रपिटकाचे स्पष्टीकरण करणारे 'उपदेशशास्त्र' लिहून काढले. नंतर विनयपिटकाचे स्पष्टीकरण करणारे 'विनयविभाषाशास्त्र' लिहीले आणी त्यानंतर आभिधर्म पिटकाचे स्पष्टीकरण करणारे 'अभिधर्मविभाषाशास्त्र' लिहीले.*

ग्रंथनिर्मिती करताना त्या अर्हतांनी सर्व मुद्यांचा सांगोपांग विचार केला. कोणतीही संबंधित गोष्ट त्यांनी विचार न करता सोडुन दिली नाही. "हा ग्रंथ आता विश्वविख्यात झाला आसून सर्व विद्यार्थ्यांचा तो मूलभूत ग्रंथ झाला आहे" ..

पाच विद्या म्हणजेः-

(१) शब्दविद्या - किंवा संस्कृत व्याकरण.

(२) अध्यात्म विद्या - म्हणजे बुद्ध धम्माच्या अध्यात्मशास्त्रात पारंगत असणे.

(३) चिकित्सा विद्या - औषधी, जादूटोणा इत्यादी विषयींची विद्या.

(४) हेतुविद्या - म्हणजे तर्कशास्त्र.

(५) शिलापस्थानविद्या - म्हणजे भूशास्त्र, खागोलशास्त्र, हवामानशास्त्र, पदार्थविज्ञानशास्त्र इत्यादी.

पेशावर मधील बोधीवृक्ष

पाकिस्तानमध्ये पेशावर हे मोठे शहर आहे. या शहराचे पूर्वीचे नाव पुष्पापूर/पुरुषपूर होते. चिनी प्रवासी भिक्खूं फाहियान (३रे शतक) आणि हुएनत्संग (७वे शतक)यांनी जेव्हा पेशावरला भेट दिली तेव्हाचा प्रवास वृत्तांत लिहून ठेवला आहे. *सम्राट कनिष्क राजाच्या काळापासून पेशावर हे मध्य आशिया आणि दक्षिण आशिया भागाचे व्यापारी, राजकीय आणि धार्मिक केंद्र होते. इथूनच बौद्ध धर्माची महायान शाखा स्वातच्या खोऱ्यातून गिलगिट, तिबेट, चीन, अफगाणिस्तान, मध्य आशिया, मंगोलिया आणि पूर्वेकडील देशात गेली. काशप्य मातंग हा पेशावर इथूनच पहिल्या शतकात चीनमध्ये प्रसारासाठी गेला. महायान पंथातील काही संस्कृत साहित्य इथेच लिहिले गेले.*

सम्राट कनिष्काच्या काळात जी धम्मसंगति भरविली होती त्या संगतित झालेल्या निर्णयांचा ताम्रपटात उल्लेख करून तो पेशावर येथील कनिष्काच्या स्तूपात ठेवला गेला. त्याच सुमारास सम्राट कनिष्क राजाने बोधगया वरून बोधिवृक्षाची फांदी आणून पेशावर येथे रुजविली. _शेकडो वर्षांनीं चिनी प्रवासी भिक्खू हुएनत्संग हे दुसरे चिनी यात्रेकरू सुनगून यांचे सोबत इथे आले होते, तेव्हा सुनगून याने लिहिले आहे की तो बोधिवृक्ष एवढा मोठा आहे की त्या खाली उभे राहिले असता आकाश दिसत नाही, एवढा तो झाकोळलेला आहे. पसरलेला आहे. तसेच वृक्षाखाली १७ फूट उंचीच्या ध्यानमुद्रा अवस्थेतील चार बुद्धमूर्त्या आहेत._ *सम्राट कनिष्कने रुजविलेला बोधिवृक्ष हजारो वर्षे तग धरून होता असे दिसते.* कारण *मुघल बादशहा बाबर जेव्हा पेशावर येथे सन १५०४ मध्ये आला होता तेव्हा त्याने हा प्रचंड वृक्ष बघितल्याचे नमूद केले आहे. तसेच संन्यासी, जोगी आणि हिंदू लोक येथे येऊन मुंडण करतात अशी प्रथा पाहिल्याचे नमूद केले गेले आहे. अशी ही पवित्र जागा सद्यस्थितीत पेशावर शहरात 'पिपल मंडी' म्हणून प्रसिद्ध आहे.* दुर्दैवाने हा पुरातन वृक्ष आता नष्ट झाला असून सद्यस्थितीत तेथेच वृक्षाच्या फुटलेल्या फांद्या आहेत. व आजूबाजूस व्यापारी लोकांचे गाळे झाले आहेत. आणि तेथील कोणालाही याचे गम्य नाही.

तसेच *चिनी प्रवासी फाइयान जेव्हा येथे आला होता तेव्हा त्यांनी पेशावर येथे बोधिवृक्षाच्या बाजूला असलेल्या विहारात बुद्धांचे भिक्षापात्र बघितल्याचा उल्लेख केला आहे. खरेतर याचसाठी सम्राट कनिष्काने तेथे स्तूप आणि विहार बांधले होते.* कारण त्याचा एक गजराज तेथे असलेल्या भिक्षापात्रास नजरेआड होऊ देत नव्हता. *त्यावेळी जवळजवळ ७०० भिक्खू भगवान बुद्धांच्या भिक्षापात्राची काळजी घेत असत. व फुले वाहून पूजा-अर्चा करीत असत. सम्राट कनिष्क राजाने बांधलेला स्तुप, विहार आणि बोधिवृक्ष ही पेशावर शहरामधील धम्माची मोठी सांस्कृतिक खूण होती. मुघल राजवटीत पेशावर शहर पसरू लागले. तेव्हा हा स्तूप जुन्या पेशावर किल्ल्याजवळील गुंजगेटपाशी होता. येथील नक्षीकाम केलेले अनेक दगड, सुंदर मुर्त्या, शिल्पे आजूबाजूच्या लोकांनी बांधकामासाठी पळवून नेल्या.* _ब्रिटिश राजवट येईपर्यंत एवढ्या मोठ्या प्रचंड स्तुपाची छोटी टेकडी झाली होती. ब्रिटिश अधिकारी स्पूनरने हा स्तुप खोदून अस्थि करंडक शोधून काढला. आज हा करंडक पेशावर म्युझियममध्ये असून त्यातील बुद्धधातू म्यानमार देशात मंडाले शहरात आहेत._

पाकिस्तानातील पेशावर शहरा येथे स्तुप नाही. विहार नाही. तसेच भगवान बुद्धांच्या भिक्षापात्राचे काय झाले याची माहिती नाही. मात्र बोधिवृक्ष अद्याप तेथे तग धरून आहे.

"बुध्दांची पहिली मुर्ती".

कनिष्क यांच्या आधी बुध्द प्रतिक म्हणून हत्ती, धम्म चक्र, बौद्धी वृक्ष, खाली आसन, त्रिरत्न, पद्चिन्ह , स्तूप आदी थेरवादा प्रमाणे पुजल्या जात होत्या, ह्या काळा पर्यंत महायान पंथाचा उदय झालेला नव्हता, *मूर्ति पुजा अजून अस्तित्वात नव्हती,* _कनिष्क गादीवर बसल्यानंतर त्यांनी चौथी धम्म संगीत भरवली याच संगीती मध्ये "महायान" पंथाचा उदय झाला व इथूनच खर्या अर्थाने मूर्ती पुजेला प्रारंभ झाला._

महायान पंथाने मूर्ती पूजेचा स्वीकार केला.

या आधी मिलिंद राजे यांनी आपल्या नाण्यांवर "धम्म चक्र" अंकित करून घेतले होते. तर 'कदाफिस कुष्णाने सत्य धर्माचा अनुयायी म्हणजे बौध्द धम्माचा अनुयायी' हा लेख आपल्या नाण्यावर कोरून घेतला होता.

कनिष्क यांच्या काळात धम्माला व महायान पंथाला पूरक असे वातावरण तयार झाले होते , _कनिष्क यांनी सर्वात आधी आपल्या नाण्यावर *तथागत गौतम बुद्धांच्या प्रतिमेचे मानवी रूपात अंकन केले व ग्रीक भाषेत "बोडो" (BODDO) हा लेख लिहिला*. या वेळे पासून हीनयान (थेरवाद) पंथातील प्रतीक पुजा मागे पडली व मुर्ती पुजेला प्रारंभ झाला,_ *कुषाण काळात मथुरा हे प्रमुख कला केंद्र होते या केंद्रात बनविलेल्या काही मूर्त्या "विदर्भात" उत्खनन करतांना सापडल्या आहेत.*

महत्त्वाचे म्हणजे आजपर्यंत मिळालेल्या बुध्द मूर्तीमध्ये एकही कनिष्काच्या काळापूर्वीच्या नाही.

बुध्दांची पहीली मुर्ती ही त्यांच्या महापरिनिर्वाणाच्या ५०० वर्षा नंतर घडवली गेली व ती कनिष्क यांच्या राज दरबारी असलेल्या ग्रीक कलाकाराने घडवली त्याचे नाव "Angelo's" असे होते, जी पहीली मुर्ती बनवून घेतली गेली ती अस्सल सोन्याची होती.

_*मोग्गलिपुत्त तिस्स*_

दुतीय संगितीच्या वेळी भारतात १२ लाख भिक्खु होते, त्यातून वैशालीचे १०,००० (दहा हजार) भिक्खु बुद्ध शासणातून निष्कासित केल्या गेले होते. त्यांनी पुन्हा हळूहळू डोके वर काढण्यास प्रारंभ केला आणि समाजात आपली धाक पण जमविणे प्रारंभ केले. त्यामुळे वैचारिक भिन्नता निर्माण झाली व ह्याची परिणती म्हणून भिक्खु संघ कितितरी तुकड्यात वाटला गेला. *त्यालाच पुढे निकाय म्हटल्या गेले.* त्या निकायाने आपापले नवे त्रिपिटक रचले, त्यात आपल्याच विचाराप्रमाणे सुत्त आणि धम्माचे सिद्धांत बनविले जे शास्ताच्या धम्मानुकूल नव्हते. पुढे पुढे त्यांनी आपली पद्धतच वेगळी बनविली.

दिपवंस या ग्रंथात लिहिले आहे की - _*"नाम, लिंग, परिक्खार अकप्पकरणियानिच पकतिभाव जहेत्वा तञ्च अञ्ञं अकसुते||*_ अर्थात _त्यांनी आपली वेशभूषा, नाव, परिष्कार, चिवरांचे रंग आणि वापरण्याची पद्धती पण परावर्तित केली आणि त्यातच पुन्हा भर पडली ब्राह्मणवादी दुसऱ्या मतांची._ कारण महाराज नदीवर्धन आणि त्यानंतरच्या म्हणजे अशोकापर्यंत बौद्ध धम्माला राजाश्रय मिळालेला होता, त्यामुळे बौद्ध संघात दुसऱ्या मताचे (धर्माचे) लोकपन स्वतःला बौद्ध म्हणू लागले आणि आम्ही बौद्धच आहोत म्हणून राज्याकडून मिळणाऱ्या सुविधेचा लाभ उचलू लागले.

त्यामुळे तथागताच्या खऱ्या मताला जाणणे फारच कठीण होऊ लागले. त्यामुळे बौद्ध संघ अनेक संप्रदायात वाटला गेला व महाराज नदीवर्धन ते अशोकापर्यंतच्या काळात बौद्ध धम्माचे व भारतीय भिक्खु संघाचे हळूहळू अठरा निकाय बनले आणि कोणता निकाय वास्तविक बुद्धमताचा आहे हे कळणे कठीण झाले.

खरं पाहू गेलं असता अठरा निकाय दोनच निकायातून निर्माण झाले आहेत - १) स्थविरवादी (थेरवादी) आणि २) महासांघीक. ह्याचेच पुढे अठरा निकाय झाले.

अठरा निकायांनी धार्मिकतेच्या नावावर हूडदंड माजविला आणि बुद्धाच्या वास्तविक उद्देशाला नष्ट करण्याचे मोठे षडयंत्र रचले, सम्राट अशोकाच्या धम्म प्रवृत्तीचा उलटा फायदा उचलण्याचे कार्य केले. हे जेव्हा अशोकाच्या नजरेस आले तेव्हा त्याने ठरविले की, ह्या सगळ्या षडयंत्रकारी संघटनेला मोडून काढले पाहिजे. तेव्हाच राज्यात हीन-दिनाचे भले होईल आणि धम्माचे सार्थक होईल. *त्यासाठी अशोकाने विद्वान भिक्खु म्हणजे भदंत मोग्गलिपुत्त तिस्स स्थविर यांना आपल्या राज्यात आणण्याचे ठरविले. पण भदंत मोग्गलिपुत्त तिस्स स्थविर हे अहो गंग पर्वतावर जाऊन एकांतात ध्यानभावना करण्यासाठी निघून गेले होते.

भदंत मोग्गलिपुत्त तिस्स स्थविर पाटलीपुत्रातील ब्राह्मण कुटुंबात जन्मले होते, त्यांच्या वडिलांचे नावच मोग्गली होते. म्हणून भदन्तास मोग्गलिपुत्त म्हणजे मोग्गलीचे पुत्र म्हणत असत. जेव्हा ते आठ वर्षाचे झाले, तेव्हा त्यांना आयुष्यमान सिग्गव नावाच्या स्थविराने प्रव्रजित केले आणि विनयाची शिकवण पण दिली. लवकरच त्यांनी सुत्त, विनय आणि अभिधम्म म्हणजे मातिका आयुष्यमान चण्डवज्जी स्थवीरांच्या मार्गदर्शनात शिकले व त्यांना तेथेच उपसंपन्न करून त्यांचे नाव "तिस्स" ठेवले. तेव्हा आत्ता त्यांना कोणता तिस्स? तर मोग्गलिपुत्त तिस्स म्हणू लागले आणि पुढे चालून ते मोग्गलिपुत्त तिस्स या नावानेच प्रसिद्ध झाले. ते सर्वगुणसंपन्न होते. म्हणून लवकरच ते पाटलीपुत्रातील भिक्षु संघाचे प्रमुख झाले. सम्राट अशोकाने त्यांना फारच सन्मानाने वागविले, आदराचे स्थान दिले.

भदंत मोग्गलिपुत्त तिस्स स्थविरांच्या उपाध्यायत्वातच अशोकाने आपला मुलगा महेंद्र ह्यास प्रव्रजित करून भिक्खु बनविले होते. त्यानंतरच भदंत मोग्गलिपुत्त तिस्स स्थविर ध्यानासाठी एकांतात अहो गंग पर्वतावर गेले होते. सात वर्षे ते तेथे होते. राज्यात एवढी धार्मिक बंडाळी माजली होती. ती मोडून काढण्यासाठिच सम्राट अशोकांनी भदंत मोग्गलिपुत्त तिस्स स्थविरास राज्यात परत आणण्यासाठी म्हणून एक दूत पाठविला व त्यांना परत आपल्याच राज्यात यावे एवढीच विनंती केली होती, पण भदंत मोग्गलिपुत्त तिस्स स्थविरांनी राजदूतास येण्यास नकार दिला. नंतर अशोकाने दुसरा राजदूत पाठवून त्याच्या जवळ संदेश दिला की, *"आपण आत्ता धम्मासाठी येण्याचे कष्ट करावे, धम्म धोक्यात आहे"* त्यांनी तो संदेश पाहून पाटलीपुत्रास परत येण्यासाठी होकार दिला. त्यावेळी सम्राट अशोक गंगेच्या किनाऱ्यावर स्वतः येऊन स्थवीरांची वाट पहात होता, जेव्हा स्थवीरांची नाव किनाऱ्यास लागली तेव्हा अशोकाने स्वतः पुढे जाऊन भदंत मोग्गलिपुत्त तिस्स स्थविरास आपल्या हाताने त्यांच्या भुजास धरून वर उचलून नावेतून खाली उतरविले व पाटलीपुत्राच्या अशोकारामात त्यांना घेऊन गेले, तेथे त्यांच्या राहण्याची सुव्यवस्था केली.

सम्राट अशोकाने दुसऱ्या दिवशी भदंत मोग्गलिपुत्त तिस्स स्थविरास राजदरबारातील अतिथी गृहात नेऊन, यथायोग्य आसन देऊन आपण स्थविराच्या चरणाजवळ बसून राज्यातील धार्मिक बंडाळीचे संपूर्ण कथन केले आणि त्यावर काय उपाय करावयास पाहिजे ह्यावर खूपच चर्चा झाली. भदंत मोग्गलिपुत्त तिस्स स्थविरांनी चर्चेत निश्चित केले की, ह्यासाठी धम्म संगती घेतली पाहिजे आणि त्यात खऱ्या-खोट्याचा निवाडा केला पाहिजे. ह्यासाठी निश्चित झाले की, लवकरात लवकर एक *स्थविरवादी भिक्खु संघाची सभा बोलवावी आणि त्यात संगीतिचा ठराव करून पारित करावा व संगितीची तिथी निर्धारित करावी.*

लवकरात लवकर भिक्खु संघाची एक बैठक बोलविण्यात आली आणि त्यात निश्चित झाले की १००० स्थवीरांना निमंत्रित करून त्यांनी धम्माचा निवाडा करावा आणि बुद्धवचनाचे सुत्तविनय आणि मातिका यास निश्चित करावे. तसेच ही संगीति पाटलीपुत्र नगरातील अशोकारामात व्हावी, यासाठी सर्व व्यवस्था व सुरक्षा आयुष्यमान महेंद्र स्थविराने करावी.

*तिस्साच्या अध्यक्षतेखालील ह्या संगीतीतच धर्मप्रचाराची महत्त्वाकांक्षी योजना आखली जाऊन त्यासाठी एक हजार भिक्षूंना धर्मप्रचाराचे योग्य ते शिक्षणही दिले. 'त्रिपिटका' च्या संकलनाचे कामही ह्या नऊ महिने चाललेल्या संगीतीतच पूर्ण झाले. तिस्साचा कथावत्थु पकरण हा प्रमाणभूत ग्रंथ म्हणून ह्या संगीतीने मान्य केला. त्यात पाखंडवादाची मार्मिक चिकित्सा करून तो साधार खोडून काढला आहे.*

त्यांनी केलेली प्रमुख कामगिरी अशी -

१) भिक्खुसंघामध्ये सामील झालेल्या ऐतखाऊ वृत्तींच्या इतर मतवाद्यांची संघातून हकालपट्टी करण्यात आली त्यामुळे अबौद्ध मते बुद्धधम्माच्या नावावर खपविली जात होती त्यावर पायबंद बसला. *अशा ६०,००० भिक्खुंची हकालपट्टी करण्यात आली.*

२) धम्मसंगीतिचे आयोजन झाले व धम्माच्या शुद्धीकरणास फारच मोठे साहाय्य झाले.

३) सम्राट अशोकाने दिलेल्या राजाश्रयाचा जो आधार मिळाला, त्याचे योग्य चीज करावयास स्थविर तिस्स यांची खूपच महत्वाची मदत मिळाली.

४) सम्राट अशोकाने त्यांच्यामुळे स्वतःच्या मुलास व मुलीस धम्मकार्यास वाहून टाकले. राजपुत्र महेंद्र व राजकन्या संघमित्रा यांनी प्रव्रज्या ग्रहण करून, श्रीलंकेस जाऊन तेथे धम्माचा प्रचार-प्रसार केला.

५) इतर देशांमध्ये भिक्खुंना पाठवून धम्माचा प्रसार राजाश्रयाद्वारे करावयास स्थविर तिस्स यांची मोठीच मदत मिळाली.

भविष्याचा विचार करून, मध्यदेशाच्याही बाहेर धम्म प्रस्थापित होईल या गोष्टीचे भान ठेवून कार्तिक महिन्यात स्थवीरांनी विशिष्ट प्रदेशात पाठविण्याचे कार्य केले. *त्याकाळी पूर्वेस भागलपूर, पश्चिमेस गांधार, उत्तरेस हिमालय तथा दक्षिणेस विंध्य पर्वत यामधील प्रदेशाला मध्यदेश म्हणत असत.*

थेरं कस्मिरगंधार मज्झन्तिक मपेसयि| *अपेसेसि महादेवत्थेरं महिसमंडल ||*

अर्थ : _काश्मीर आणि गांधार देशांत (त्यांनी) मज्झन्तिक नांवाच्या स्थविराला पाठविले. महादेव स्थविराला महिषमंडळास पाठविले._

वनवासिं अपेसेसि थेरं स्वखतनामकं | *तथा परन्तकं योनधम्मरक्खितनामकं ||*

अर्थ : _वनवासी प्रदेशाला रक्खित नावाच्या स्थविराला पाठविले त्याचप्रमाणे योनधम्मरक्खित नावाच्या स्थविराला उपरन्तिल प्रदेशाला पाठविले. *महारट्ठं महाधम्म रक्खितथेरनामकं |* *मदारक्खित त्थेरं तु योनलोकपेसपि ||*

अर्थ : _महाराष्ट्र देशात महाधम्मरक्खित स्थविराला पाठविले आणि महारक्खित स्थविराला यवन लोक प्रदेशाला रवाना केले.

पेससि माज्झिमं थेरं हिमवंतपदेसकं | *सुवर्णभूमिं थेरे द्वे सोणमुत्तरमेवच ||*

अर्थ : _मझ्झिम स्थविराला हिमालय प्रदेशात पाठविले. सुवर्णभूमी (ब्रह्मदेशाला) सोण आणि उत्तर या दोन स्थवीरांना पाठविले._

_*"सुप्रिया"*_

भगवान बुद्धांचे वाराणसी मृगदाव वनात वास्तव्य असतानाची घटना आहे.

वाराणसीत सुप्रिया नावाची एक उपासिका राहत होती. पति व पत्नी दोघेही बुद्धांचे उपासक होते. ते दोघेही भिक्खुंची सुश्रुशा करण्यात धन्यता मानित आसत.

एके दिवशी सुप्रियेला एक वृद्ध भिक्खु आजारी असलेला दिसला. तीने भिक्खूंकडे जाऊन विचारणा केलि असता भिक्खुनि सांगितले की "मला आजार आहे, मला वैद्याने मांसाचा काढ़ा पिण्याच्या सल्ला दिला आहे !"

तद्नंतर सुप्रिया आपल्या नोकराला मांस आणण्यासाठी शहरात पाठवते मात्र नोकर रिकाम्या हाती परततो व सुप्रियेस कळवतो की, "वाराणसीत एकहि प्राण्याची हत्या आज झाली नाही, त्यामुळे मला मांस घेवून येणे शक्य झाले नाही !"

सुप्रिये समोर प्रश्न उभा ठाकतो की, आजारी भिक्खुला मांसाचा काढ़ा कुठून द्यावा? तिच्या डोळ्यासमोर वृद्ध भिक्खुचे आजारपणाने व्हिवळने तरंगु लागते. करुणाभावाने तिचे मन हेलावुन जाते.

सुप्रिया दासिला सूरी अनावयास सांगते. आपल्या मांडीचा काही भाग कापते व दासीला देवून त्याचा काढ़ा बनवून आजारी भिक्खुला देण्यास सांगते. काहि वेळाने तिचा पति स्वगृही परततो, सुप्रिया रक्ताच्या थारोळयात पडलेली पाहुन, सदर बाबतीत सुप्रियेस विचारणा करतो. सुप्रिया घडलेल्या हकीकतीचे आपल्या पति समोर कथन करते. तिच्या पतीचे अश्रु अनावर होतात. आपल्या पत्नीचा त्याग पाहुन त्याला तिचा अभिमान वाटतो. तो तिच्या जखमेवर औषध लावतो व सूती कपड्यात तिची जखम गुंडाळतो. सुप्रिया आपल्या पतीकडून सदरच प्रकार कुणालाही न सांगन्याचे वचन घेते.

दुसऱ्या दिवशी भगवान सुप्रियेच्या घरी चारिके दरम्यान जातात तेंव्हा उपासिका सुप्रिया ही प्रवचनास हजर नसल्याचे पाहून भगवान तिच्या पतीस त्या बाबत विचाराना करतात, त्या वेळेस सुप्रियाचा पति चाचरत उत्तर देतो की, "भगवंत ! सुप्रिया आजारी आहे तीला जागेवरुण उठवत नाही, म्हणून ती प्रवचनास हजर नाही !" भगवान बुद्ध

हे "सर्वज्ञ" होते. सुप्रियेच्या पतीचे चाचरने त्यांनी ओळखले होते. भगवंत सुप्रियेच्या पतीस म्हणाले_"माझी उपासिका आजारी आहे त्यामुळे मला तिला भेटावे लागेल, आपण मला तिच्या कड़े घेवून जावे."_ त्यावर सुप्रियेचा पति भगवंतांना सुप्रिया कड़े घेवून जातो. त्याठिकानि सुप्रिया वेदनेने व्हिवाळत पडलेली तसेच तिची जखम पाहुन भगवंत सदर बाबतीत सत्य काय आहे याची सुप्रियेकडे विचारणा करतात. त्यावर सुप्रिया घडलेला प्रकाराचे भगवंतांजवळ जवळ कथन करते. बुद्धास घडलेल्या घटनेचा उलगडा होतो.

सदर घटनेचा वृतांत कळल्यावर बुद्ध व्यथित होतात. बुद्ध त्या वृद्ध भिक्खुकडे जातात व घडलेल्या प्रकाराबाबत विचारणा करतात. भगवान बुद्ध आजारी भिक्खुला संबोधतात की,

"हे मोघपुरुषा (मुर्ख माणसा) ! माहित न करता तू मांस ग्रहण केलेस? तू मनुष्याचे मांस ग्रहण केले आहेस ! मनुष्यचे मांस ग्रहण करने वर्ज्य आहे !"

भगवंतांनी सुप्रियेस श्रद्धावान उपासिका म्हणून गौरव केला !

*बुद्ध काळातील सुप्रिया सारख्या त्यागी उपासक उपासिकांमुळे बौद्ध धम्माचे स्थान जनमानसात उंचावले.*

बुद्धाच्या काळात भिक्खूच्या मांस खाण्याच्या इच्छेसाठी स्वतःचे मांसाचे भोजनदान देणारी आदर्श उपसिका ! ⁎"उपासिका असावी तर सुप्रिया सारखी !"⁎

महाभिज्ञा यशोधरा

कोलीय देशाच्या दंण्डपाणीची यशोधरा ही अत्यंत लावण्यसंपन्न व गुणवती कन्या होती. तिचे *माहेरचे नाव गोपा असे होते.* स्वयंवरानुसार तिने सिद्धार्थाच्या गळ्यात माळ घातली. त्यावेळी ती पंधरा वर्षांची होती व सिद्धार्थ सोळा वर्षांचा.

सिद्धार्थाने गृहत्याग केल्यामुळे तिला अत्यंत दुःख होणे स्वाभाविकच होते. परंतु *सिद्धार्थाच्या तपश्चर्येबद्दल आणि देहदंडनेबद्दल जसजशी बातमी तिला मिळत असे, तसतशी तीदेखील स्वतःचे केशवपन करून उपासतापास करीत असे व अत्यंत साधेपणाने राहून बाळ राहुल आणि सासुसासरे यांची सेवा करीत असे.*

जेव्हा *भगवंतांनी कपिलवस्तूस आगमन केले तेव्हा तिने आपला पुत्र राहुल यास त्यांच्याकडे पाठवून वारसा हक्काची मागणी करविली व सातच वर्षे वय असलेल्या राहुलास श्रमणत्वाची दीक्षा देण्यात आली. येणेप्रमाणे आपल्या एकमात्र पुत्रास यशोधरेने धम्मकार्यास समर्पित केले.*

भिक्षुनी संघाची स्थापना करावयास पाचशे कुमारिकांना घेऊन महाप्रजापती भगवंतांकडे गेली त्यावेळी यशोधरेने देखील प्रव्रज्या ग्रहण केली. *कठीण साधना आणि शिलपालन करीत करीत तिने महाभिज्ञा प्राप्त केली.* आणि भिक्षुनी संघात *महाथेरी कात्यायनी, (भद्दा कच्चाना) या नावाने विख्यात झाली*

आपल्या पतीची ती खरी अनुगामिनी झाली. धन्य ती यशोधरा !

🌕🙏🌷 *धम्म प्रभात* 🌷🙏🌕

इच्छितं पत्थितं तुव्हं खिप्पमेव समिज्झतु *सब्बे पुरेन्तु चित्तसंकप्पा चन्दो पन्नरसो यथा ||*

☸️ *ती फक्त बुद्ध मुर्ती नाही.....,* *ती एक प्रगत संस्कृती आहे..!* ☸️

आज आपण आपल्या घरात, विहारात, लेणीत जी बुद्ध प्रतिमा, मुर्ती, शिल्प बघतो ते आपल्यापर्यंत कसे आले याचा विचार कधी केलाय का आपण..?

तथागत भगवान गौतम बुद्ध यांच्या महापरिनिर्वाण नंतर ते सम्राट कनिष्क याच्या काळापर्यंत धम्मात स्तुप, चैत्य, बुद्ध पद (पाऊले), धम्म त्रिरत्न, धम्म चक्र, बोधीवृक्ष, हत्ती, कमळ पुष्प या प्रतिकांना बुद्धाचे प्रतिक म्हणून वंदन केले जात होते. त्या प्रतिकांना बुद्ध माणून बुद्ध धम्म, बुद्ध विचार आत्मसात केले जायचे... नंतर बुद्ध रूप म्हणून बुद्ध शिल्प निर्माण झाले, ते एका रात्रीत निर्माण झाले का... तर नाही, त्याला शेकडो वर्षे लोटली, आज आपण जी बुद्ध मुर्ती बघतो ती बुद्धानंतर अडीच हजार वर्षांचा प्रवास करून आपल्या समोर आहे. लेण्यांमधे शिल्प घडवण्यासाठी शेकडो-हजारो वर्षे लागली, शेकडो पिढ्या यात खपल्या... तेंव्हा कुठे बुद्ध शिल्प आज आपल्याला बघायला मिळतात, त्याचाच आधार घेऊन बनवलेली मुर्ती आज आपल्या घरात आपल्याला बुद्ध मुर्ती म्हणून परिचित आहे... मग ते बुद्ध शिल्प घडवणाऱ्या त्या शेकडो पिढ्या, अनेक राजघराणे मुर्ख होते का?

*लेण्यामधे जे शिल्प असतात ते फक्त बुद्धाचे शिल्प असतात का? तर नाही.. तिथे स्तुप असतात, विविध वेषभूषा, केशरचना, अलंकार परिधान केलेले बुद्ध अनुयायी असतात, नृत्य करणाऱ्या नृत्यांगना, विविध वाद्य वाजणारे वाजयंत्री असतात, विविध प्रकारचे नक्षीकाम असते, बुद्धाच्या आयुष्यातील विविध प्रसंग कोरलेले असतात, विद्याधर (उच्च विद्याविभूषित असा), कुबेर (गडगंज संपत्ती असलेला) देशविदेशातील राजे बुद्धासमोर नतमस्तक झालेले दिसतात... (हे कुठेही बुद्धाच्या अंगा खांद्यावर किंवा डोक्यावर बसले नाहीत) हे सगळे बुद्ध अनुयाई आहेत व ते बुद्ध विचाराचे पाईक आहेत. म्हणून ते प्रसंग झालेले आहेत हे ते शिल्प दर्शवितात... याला तुम्ही मूर्ती पूजा म्हणतात का...? ही मूर्ती पूजा नाही... ही एक संस्कृती आहे...!

विषय फक्त बुद्ध देव नाही हे दाखवण्यासाठी दाखवलेल्या फ्रेमचा नाही, तर विषय आहे... ज्या बुद्ध रूप किंवा शिल्पाद्वारे बुद्ध विचार आणि धम्म आपल्यापर्यंत पोहोचवलेला अडीच हजार वर्षांच्या आस्थेचा आणि श्रद्धेचा...! आस्था आणि श्रद्धेचा अर्थ तुम्ही वेगळाच लावता... तथागत भगवान गौतम बुद्ध यांच्या हायतीत राजा बिंबिसारणे चंदनाच्या लाकडापासून बुद्ध मूर्ती तयार करून घेतली होती, ती कशासाठी... बुद्ध देव आहे म्हणून का? तेव्हा तर बुद्ध हयातीत होते... मग?... राजा बिंबिसाराला बुधःचा सहवास लाभावा म्हणून...! ही झाली राजा बिंबिसाराची बुद्धांप्रती आस्था आणि श्रद्धा...!

बुद्ध शिल्प तयार झाल्यापासून ते आजपर्यंतचा प्रवास कधी सुवर्णकाळ तर कधी खडतर काळ असा राहिलेला आहे, प्रतिक्रांतीनंतर सुद्धा ते शिल्प आज आपले स्वतंत्र अस्तित्व टिकवून आहे, कसे काय... कारण ते फक्त एक शिल्प किंवा मूर्ती नाही तर ती अडीच हजार वर्षे उन पावसाळे बघितलेली आणि बुद्ध विचार वाहून आणणारी एक संस्कृती आहे...!

तथागत गौतम बुद्ध ते बुद्ध मूर्ती हा प्रवास आणि ही संस्कृती इतक्या कमी शब्दांत मावणारी नाहीये... ती अफाट सागरासारखी आहे फक्त ती समजून घेण्याचे सामर्थ्य आपल्यात असले पाहिजे.

दि. १४ सप्टेंबर.

१४ सप्टेंबर १९५६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी पंतप्रधान पंडीत जवाहरलाल नेहरू यांना "Buddha And His Dhamma" या अनमोल ग्रंथाची टंक लिखित प्रत भेट दिली होती. आणि हा ग्रंथ सरकार तर्फे छापण्यात यावा अशी सूचना केली, परंतु सरकार तर्फे लाखो रुपये कुंभमेळ्यासाठी देणाऱ्या नेहरुने ग्रंथ छापणे ही खर्चिक बाब आहे म्हणून छापण्याचे नाकारले होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दि. २४ ऑक्टोबर १९५१ रोजी सकाळी ७ वाजता "Buddha And His Dhamma" हा आपला जीव की प्राण असलेला अनमोल ग्रंथ इंग्रजी मधून लिहिण्यास सुरूवात केली.

दि. ५ डिसेंबर १९५६ या दिवशी "Buddha And His Dhamma" या अनमोल ग्रंथाची प्रस्तावना लिहून पूर्ण केली.

म्हणजे 'बुद्ध आणि त्यांचा धम्म' लिहायला बाबासाहेबांना ५ वर्षे १ महिना व ११ दिवस लागले.

जगात जेवढे म्हणून धर्माच्या बाबतीत विचारवंत होऊन गेले आहेत, त्यांनी सर्वांनी मिळून जेवढी धार्मिक पुस्तके वाचली असतील त्यांच्यापेक्षा अधिक पुस्तके बाबासाहेबांनी वाचली आहेत. तसेच त्या त्या धर्माच्या धर्मपंडीता

बरोबर धार्मिक विचारांच्या बाबतीत समोरा समोर चर्चा करण्याची बाबासाहेबांची तयारी होती. एवढे त्यांचे सर्व धर्मांचे संदर्भासहीत अफाट ज्ञान होते.

बौध्द धम्माच्या बाबतीत सुध्दा बाबासाहेबांचे तर मॅट्रीक पासूनच वाचन सुरू केले होते. त्यांनी जगातील बुध्द धम्माचे जे उपलब्ध साहित्य होते त्रिपीठकासह ते सर्व वाचून काढले होते. त्यांचे चिंतन मनन करुन व त्या सर्वांचा अर्क काढून एक शुध्द ग्रंथ लिहिला. त्यासाठी त्यांनी आपल्या जीवाची, तब्बेतीची काळजी न घेता जो अनमोल ग्रंथ लिहिला व जो आपला जीव की प्राण असलेला ग्रंथ आहे तो म्हणजे "बुध्द आणि त्यांचा धम्म" होय.

बाबासाहेबांनी लिहिलेल्या अनेक अप्रतिम ग्रंथांपैकी ही त्यांची शेवटची रचना होती. हा ग्रंथ लिहितांना त्यांच्या समोर संपूर्ण त्रिपीटक होते. सुत्त पिटक, विनय पिटक आणि अभिधम्म पिटक. प्रत्येक पिटकात आणखी 10-12 ग्रंथ तसेच या सर्व ग्रंथांवर आधारित अनेक अर्थ कथा होत्या, अनेक प्रकारचे बुद्ध चरित्र संबंधित साहित्य होते. बुद्धांसंबंधी जगात जेवढे म्हणून महत्वाचे साहित्य उपलब्ध होते या सर्व वांमयातून त्यांना एक अशा ग्रंथाची रचना करायची होती ज्यात संपूर्ण बुद्ध चरित्र त्यांची शिकवण समाविष्ठ होईल आणि त्याची भाषा सर्वसामान्यांना समजायला सोपी असेल.

हा ग्रंथ एकूण आठ कांडांत विभागला आहे. प्रत्येक कांडात 7-8 भाग आहेत. प्रथम कांड बुद्ध जीवन कथेनी व्याप्त आहे. उर्वरित कांडांत धम्म दिक्षा, त्यांचं आंदोलन, चांगला धम्म, वाईट धम्म आणि त्यांच्या समकालीन विचाराबद्दल लिहिण्यात आले आहे. "जे विचार बुद्धी संगत आहेत, जे विचार तर्क संगत आहेत, तेच बुद्ध विचार आहेत." अशी बुद्ध विचारांची अतिशय सोपी आणि समर्पक व्याख्या बाबासाहेबांनी या ग्रंथांत मांडली आहे.

मूळ इंग्रजी ग्रंथ सिद्धार्थ कॉलेज पब्लिकेशन मुंबई यांनी 1957 मधे प्रकाशित केला होता.

"Buddha And His Dhamma" या अनमोल ग्रंथाचे सर्वप्रथम इंग्रजी मधून हिंदी भाषेत अनुवाद डॉ. भदंत आनंद कौसल्यायन यांनी केले. सिद्धार्थ प्रकाशन मुंबई यांनी ते 1961 मधे प्रकाशित केले. त्याचे सर्वाधिकार पिपल्स एज्युकेशन सोसायटी मुंबई यांच्याकडे होते. त्यानंतर "Buddha And His Dhamma" या अनमोल ग्रंथाचे इंग्रजी किंवा हिंदी भाषेमधून सर्वप्रथम मराठी भाषांतर सुद्धा सिद्धार्थ प्रकाशन मुंबई यांनीच प्रकाशित केले. त्याचे सर्वाधिकार पिपल्स एज्युकेशन सोसायटी मुंबई यांच्याकडेच होते.

आता मात्र हा "Buddha And His Dhamma" या अनमोल ग्रंथ भारतातील आणि जगातील अनेक प्रकाशनाकडून व भारतातील आणि जगातील अनेक भाषांमध्ये भाषांतरीत झाला आहे, होत आहे आणि होत राहणार आहे.

गुरुनानक देव

जन्म : 15 एप्रिल 1469, मृत्यू : 22 सप्टेंबर 1539.

